म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
अ.क्र. १५९८१



IRBK-0115981

# बीजेची कोर


| | कथा | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ | पुनर्जन्म | .... | .... | १ |
| २ | निरगांठ | .... | .... | २१ |
| ३ | बीजेची कोर | .... | .... | ३६ |
| ४ | उथळ पाणी | .... | .... | ४९ |
| ५ | स्वप्न | ... | .... | ७० |
| ६ | प्रकाश | ... | .... | ८६ |
| ७ | गला दर्यापार | ... | .... | ९७ |
| ८ | काळे ढग | .... | .... | १०७ |


IRBK-0115981

म. ग्रं. सं.
वा. क्र. ९४५.८
दि. ७/१.१

आलेल्या आपल्या
आनंदानें, स्वाभिम
लिहिलेल्या "पुन
डाव्या कोंपऱ्यांत
टाकून ती मनाशी
वैवाहिक जीवनांत
ही कल्पना तिच्य
सुंदर चित्र रेख
मिळालें होतें.
नव्हती. अवघ
वाटतें. त्या व
तिच्या नजरेस
भास्करशीं ति
पान समारंभ
चहापानापेक्षां

ंत्र्य अबाधित राहणार

हिलें, तसं त्या मैत्रिणीनें
जगांत दुसऱ्या कुणा-
-म्हणजे तुझ्यासारखी
ऱ्याच्या प्रॅक्टीसबरोबर
या बायकोचं स्वातंत्र्य

स्वातंत्र्याचा उपभोग
नकोस हं.' तिसरीनें
डॉक्टर असणार सारा
स्वप्नसृष्टींत गुंगलेली.
ोर उभा असलेला,
स्टेथास्कोप्कडे बघत
नव्हतें. माझी प्रकृति

एक सखी म्हणाली,
तिका सुकून न जातां
म्हांला नवीन नवीन

पायबंद घालणारा
तो आपल्या काव्य-
असेंहि तिला वाटत
र वारंवार तिच्या

खवलें. गांवाबाहेर
ाकघर, कोठीची
शंटस् तपासायची

खोली, त्यांतच पार्टिशन् घालून बनविलेला छोटासा दवाखाना—त्याच्या मागोमाग दालनें ती ओलांडीत होती. पार्टिशन्‌जवळच्या पश्चिमाभिमुख दरवाजांत ती त्याच्याबरोबर येऊन उभी राहिली नि बाहेरच्या प्रशस्त कम्पाउंडमध्यें तिनें नजर टाकली. तिथें समोरच असलेल्या पत्र्याच्या छोट्याशा खोलीकडे तिची नजर वळतांच त्यानें म्हटलें, 'ही रोग्याची 'रेस्ट रूम' आहे. खेड्यांतले पुष्कळसे रोगी वेळीं—अवेळीं येतात, त्याच दिवशीं परत जाणें पुष्कळ वेळां त्यांना शक्य होत नाहीं. असे गरीब रोगी—'

पुढच्या दालनाकडे जाण्यासाठीं दारांतून दूर सरकून तिनें हंसून मध्येंच म्हटलें, 'म्हणजे गरीब रोग्यांसाठीं ही धर्मशाळा आहे असेंच ना?'

तो हंसला नि शेवटीं राहिलेल्या दालनाकडे—अभ्यासिकेकडे—वळला. हें दालन उत्कृष्ट तऱ्हेनें सजविलेलें होतें. सारीं कांचेचीं कपाटें, वैद्यकशास्त्रावरील मोठमोठ्या ग्रंथांनीं भरलेलीं होतीं. टेबलावरहि बरींच पुस्तकें पडलीं होतीं. टेबलासमोर भिंतीवर एका अत्यंत सुंदर, गुटगुटित गोंडस बालकाचा मोठा रंगीत फोटो टांगलेला होता. तेवढें एकच चित्र त्या खोलींत होतें. पलीकडे एका उंच टेबलावर 'मायक्रोस्कोप' दिसत होता. तिकडे पाहात तिनें विचारलें, 'कसलें संशोधन चाललेंय?'

त्यानें हंसून म्हटलें, 'जीवनांतलें मोठें 'संशोधन' नुकतेंच संपलें. आतां आपलं कसलं तरी किरकोळ करणार आहे झालं.'

त्याच्या म्हणण्याचा भावार्थ ती समजली. लज्जित झाली. आपणाला हवा होता तसा हा रसिक आहे हें पाहतांच तिचें मन सुखावलें.

कोचावर तिच्याबरोबर बसत त्यानें म्हटलें, 'राणीसरकारना घर पसंत पडलें ना?'

ती हंसत म्हणाली, 'घर सुंदरच आहे. पण त्यांत कांहीं सुधारणा करायला लागणार.'

'जरूर! आतांपर्यंत ब्रह्मचाऱ्याचें घर होतें. सुधारणा जरूरच कराव्या लागणार. आपला हुकूम व्हावा.'

तिनें हंसून म्हटलें, 'पहिली सुधारणा: पलिकडल्या दालनांतील दवाखाना तेथून हालवावा. औषधाच्या बाटल्या बघितल्या कीं माझें डोकें दुखूं लागतें नि कण्हणाऱ्या, कुंथणाऱ्या रोग्यांचीं वेडींवांकडीं तोंडें बघितलीं कीं माझी प्रतिभा करपून जाते.'

त्याच्या कपाळाला सूक्ष्म आठ्या पडल्या, पण तिच्या तें लक्षांत येण्यापूर्वींच तो हंसला नि म्हणाला, 'मीं एका कवयित्रीशीं लग्न केलंय हें लक्षांत आहे माझ्या. अच्छा! जशी उषाराणीची इच्छा! दुसरी सुधारणा?'

ती किंचित् लज्जित झाली नि त्याच्याकडे खालच्या मानेनें पहात तिनें म्हटलं, 'माझ्या काव्य-साधनेला भरपूर अवकाश मिळावा, ती निर्वेध करतां यावी म्हणून...म्हणून...सध्यां—पांचसहा वर्षं तरी—आपल्या संसाराची वाढ होतां कामा नये.'

तिच्या त्या शेवटच्या वाक्यानं तो दचकला. त्याची नजर समोरच्या बालकाच्या चित्राकडे गेली. चेहऱ्यावर गांभीर्य पसरलें. पण लगेच नाटकी हास्याच्या आवरणाखालीं आपल्या भावना लपवीत त्यानें म्हटलें, 'ठीक, ही पण सुधारणा अमलांत येईल.'

दुसऱ्या दिवशीं त्यानें घरचा दवाखाना हालवून गांवांतल्या आपल्या दवाखान्यांत मिळवून टाकला. घरीं येणारे रोगी परस्पर दवाखान्यांत जाऊं लागले. दवाखान्याच्या दालनाची,—मधलं पार्टिशन काढून—तिनं स्वत:साठीं सुंदर अभ्यासिका बनविली. कम्पाउंडांत सुंदर बगीचा बनविला. रोग्याच्या 'रेस्ट-रूम'सभोंवार हिरव्यागार वेली वेढून त्यांचें 'लतागृह' बनवलें. या नवीन व्यवस्थेमुळें भास्कराच्या पूर्वींच्या दैनंदिन कार्यक्रमांत बदल झाला. पूर्वीं तो साडेसात ते नऊ घरच्या दवाखान्यांत काम करून साडेनऊला हॉस्पिटलमध्यें जाण्यासाठीं बाहेर पडे. आतां साडेसात वाजतांच तो घरांतून बाहेर पडून आपल्या गांवांतल्या दवाखान्यांत जाई व तिथून परस्पर हॉस्पिटलमध्यें जाई. दुपारीं दोन वाजतां जेवायला घरीं येई. पुन्हां लगेच चार वाजतां दवाखान्यांत जाण्यासाठीं त्याला घराबाहेर पडावें लागे, तो रात्रीं दहा वाजतां घरीं परत येई; पण हॉस्पिटलमध्यें

ऑपरेशनच्या कामांत गुंतला अगर कुठें व्हिजिट्ला गेला तर केव्हां घरीं येईल त्याचा नेम नसे. सबंध दिवस नि अर्धी रात्र ती एकटीच असल्यामुळें तिच्या काव्यसाधनेला भरपूर वेळ नि हवा तेवढा निवान्तपणा मिळत होता. या साधनेचीं छोटीं फळेंहि मासिकांत मधूनमधून दिसूं लागलीं होतीं. अन् आज तर आम्रफळासारखें रसाळ—!

खरेंच, आज शुक्रवार ! वाङ्मयमंडळाचा दिवस ! आज तिथें आपलें अभिनंदन होईल. आतां दुपारीं भास्कर घरीं आल्यावर हा विचार येतांच विषादाची छाया तिच्या मनांत उमटली. त्याला ललित वाङ्मयाची बिलकुल आवड नाहीं हें तिला आतां गेल्या दोन वर्षांच्या अनुभवानें कळून चुकलें होतें. रोग, रोगी, ऑपरेशन्स याशिवाय दुसरें त्याला कांहीं रुचत नसे, सुचत नसे नि स्वतःच्या धंद्याशिवाय कांहीं दिसत नसे. घरीं अनेक ललितवाङ्मयीन मासिकें येत, पण तीं कधीं फारशीं तो उघडूनहि बघत नसे. तिची कविता कधीं छापून आली कीं ती सावकाश वाचून बघण्यासाठीं तें मासिक तो आपल्या अभ्यासिकेंत घेऊन जाई. पण दोन-तीन दिवसांनंतर उषा जेव्हां तें तिथून परत घेऊन येई तेव्हां तें त्यानें उघडूनहि बघितलें नसणार हें तिला मनांतून माहीत असे. अन् मग अशा वेळीं तिच्या मनांत अस्पष्टसा विषाद उमटे. पण लगेच 'जाऊं दे, त्याला काव्यदृष्टीच नाहीं. डॉक्टर लोकांत काव्यदृष्टीची अपेक्षा करणें म्हणजे पांढऱ्या चाफ्याच्या फुलांत सुवर्णचंपकाचा सुगंध शोधण्यासारखेंच नाहीं का ?' अन् मग तिच्या मनाचा विषाद कमी होई. नेहमींचें जाऊं दे. पण आज–आज आपण कवितेच्या चढाओढीत बक्षीस मिळवलंय, कवितेबद्दल नसलें तरी बक्षीस मिळवलंय त्याबद्दल तरी आपलें कौतुक करील.

दुपारीं दोन वाजतां तो घरीं आला तेव्हां मासिकाचा अंक पाठीमागें लपवीत ती धांवत बाहेर दिवाणखान्यांत आली नि तिनें म्हटलें, 'मी तुम्हांला आतां एक गंमत दाखवणार आहे. काय बक्षीस द्याल ?'

त्यानें हंसून म्हटलें, 'ही मूर्तिमंत सजीव गंमत माझ्यासमोर उभी आहेच कीं !'

'नका देऊं. आम्हांला बक्षीस आधींच मिळालंय.'

'हा कोण बुवा आमचा 'rival'!'

हंसून झटकन् तिनें त्याच्यापुढें मासिकाचें पान धरलें. त्यानें त्यावर नजर टाकीत म्हटलें, 'अरे वा: ! आज खास अंकानें उषा-राणीचा गौरव केलेला दिसतोय ! congrates !'

अंक चटकन् बंद करीत तिनें उत्फुल्ल स्वरांत म्हटलें, 'म्हणून म्हणतें कीं आज अगदीं खास वेळ काढून माझी ही बक्षिसाची कविता तुम्ही वाचायला हवी हं.'

'जरूर.'

जेवणानंतर विश्रांतीसाठीं तो वर शय्यागृहाकडे वळला तेव्हां तिनें त्याला आठवण केली. त्याच्या उशीजवळ वर्तमानपत्रांवर अगदीं अग्र-भागीं तिनें तो अंक ठेवला होता.

थोड्या वेळानें कामकाज उरकून ती वर शय्यागृहाकडे वळली. आपल्या काव्याचें तो रसपान करीत असेल अशा अपेक्षेनें तिनें आंत पाऊल टाकलें. तो वाचनांत अगदीं मग्न झाला होता—तिची कविता वाचण्यांत नव्हे—'मेडिकल बुलेटीन्'चा ताजा अंक वाचण्यांत ! त्याच्या एकंदर एकाग्रतेवरून तिनें ओळखलें कीं त्यानें वर्तमानपत्रांना अगर आपल्या मासिकाला अद्याप हातहि लावलेला नाहीं. मासिकाचा अंक त्याच्या उजव्या कुशींत बाजूला पडला होता नि खिडकींतून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळुकीनें त्याचीं पानें फडफडत होतीं. संतापानें तिचें मनहि तसेंच फडफडलें. त्याला काव्यदृष्टि नसेल. पण आपण एवढें सांगूनहि त्यानें आपलें मन राखूं नये ?

संताप आवरीत ती त्याच्या पलंगाजवळ गेली नि तिनें मुद्दामच म्हटलें, 'वाचलीत ना कविता ? कशी वाटली ?'

एकाग्रता एकदम भंग झाल्यामुळें तो एकदम गोंधळला. 'अं... अ...काय म्हटलंस ?...तुझी कविता...अरे हो. खरेंच...विसरलोंच.'

'मेडिकल बुलेटिन'चा अंक तसाच घाईघाईनें छातीवर उपडा ठेवून त्यानें बाजूचें मासिक उचलून उघडलें नि तिच्या कवितेवर ओझरती नजर टाकीत त्यानें म्हटलें, 'वा ! सुंदर ! सुरेखच !'

त्यानें अंक बंद करून तिच्या हातांत दिला नि पुन्हां छातीवरचें मेडिकल बुलेटिन तोंडासमोर धरलें. त्याला काव्यदृष्टि नाहीं हें तिला माहीत होतें, पण दुसऱ्याचें–दुसऱ्याचें नव्हे, प्रत्यक्ष बायकोचें–कौतुक करण्याचीहि त्याला दृष्टि नाहीं हें तिला आज प्रथम कळलें! लोकांनीं आपल्या गुणांचें कौतुक करावें अन् प्रत्यक्ष नवऱ्यानें, सांगून सवरूनहि त्या बाबतींत अगदीं उदासीन रहावें याचें तिला अति दुःख झालें. उत्साहभंग, निराशा, संताप विविध भावना तिच्या डोळ्यांवाटे झिरपूं लागल्या.

संध्याकाळीं ती वाङ्मय-मंडळांत गेली तेव्हां तिचें मन बरेंच शांत झालेलें होतें. मंडळांत तिच्या अपेक्षेबाहेर तिचें कौतुक झालें. अभिनंदनाच्या, कौतुकाच्या जलसिंचनानें तिचें कोमेजलेलें मन पुन्हां टवटवीत झालें.

एकानें म्हटलें, 'पण उषाबाई, असे नुसते कोरडे Thanks नकोत.' एका नवोदित कवीनें म्हटलें, 'मग कोरडे घसे ओले करायला चहाचीं Thanks हवींत काय?'

त्याच्या नवकल्पनेकडे दुर्लक्ष करून इतरांनीं म्हटलें, 'खरोखरच उषाबाई, या तुमच्या यशाबद्दल तुम्ही आम्हांला चहापार्टी दिलीच पाहिजे.'

उषानें ती गोष्ट मोठ्या आनंदानें मान्य केली. तितक्यांत एकीनं म्हटलें, 'हा बेत रविवारचाच ठेवा. म्हणजे आम्हांला तुमच्या या यशाच्या दुसऱ्या भागिदाराचें अभिनंदन करतां येईल.'

'दुसरा भागिदार?'

'पतीच्या प्रोत्साहनाशिवाय आणि कौतुकाशिवाय पत्नी इतकी प्रगति करूंच शकत नाहीं. तेव्हां डॉक्टरसाहेबांचें अभिनंदन करायला नको काय?'

उषेनें महत्प्रयासानें आपला चेहरा हंसरा ठेवला. सर्वानुमतें रविवारचा दिवस मुक्रर झाला. तितक्यांत सेक्रेटरीबंधूनें म्हटलें, 'माझी एक सूचना आहे. मला वाटतें या निमित्तानें इथें कॉलेजांत नुकतेच बदलून आलेले प्रोफेसर आणि महाराष्ट्राचे लाडके कवि मुकुल यांना या समारंभाचें आमंत्रण द्यावें आणि त्यांना आपल्या मंडळाचे सन्माननीय सभासद करून घ्यावें.'

सर्वांनीं ही उत्कृष्ट सूचना तत्काळ मान्य केली. आजपर्यंत ज्यांचें केवळ नांव ऐकत होतों, ज्यांच्या कविता वाचतांना आपलें भान हरपतें त्या कवीचा परिचय होणार या विचारानें उषेचा उत्साह द्विगुणित झाला.

रविवारीं विविध खाद्यपदार्थ बनवून घेण्यांत तिनें आपल्या सैंपाक्याला चांगलाच राबविला. अन् आपल्या घराचें स्वरूप उत्कृष्ट, शक्य तितकें कलात्मक दिसावें यासाठीं, सजावट-मांडणीसाठीं, बरेंच श्रम घेतले. हॉस्पिटलमधलें काम उरकून भास्कर दुपारीं घरीं आला तेव्हां सैंपाक-घरांतून येणारा खमंग वास घेत, दिवाणखान्यांत चौफेर नजर टाकून त्यानें हंसून म्हटलें, 'आज कांहीं विशेष बेत दिसतोय.'

तिनें कांहींशा अनिच्छेनें म्हटलें, 'वाङ्मयमंडळाची मंडळी फराळाला येणार आहेत...आज संध्याकाळीं तुम्हाला कुठें बाहेर जायचें नाहीं ना?'

'आहे तर! आज आमच्या 'मेडिकल बोर्ड'ची सभा आहे साडेचारला.'

'नाहीं गेलांत तर नाहीं का चालणार? येणाऱ्या मंडळींना तुमची ओळख करून द्यायची आहे. शिवाय आज कवि मुकुल...'

त्यानें हंसून मध्येंच म्हटलें, 'मुकुल, नकुल, सहदेव झाडून सारे कवि येईनात. अन् हें बघ डॉक्टरची ओळख कुणाला करून द्यावी लागत नाहीं. वेळ आली कीं ती आपोआप होते.'

अन् मग लगेच गंभीर होत त्यानें म्हटलें, 'खरोखरच आज मला गेलेंच पाहिजे. महत्त्वाची मीटिंग आहे. मी एक संशोधनात्मक पेपर वाचणार आहें. शिवाय...'

त्याचें पुढचें बोलणें ऐकण्याच्या भरीस न पडतां ती तिथून निघून गेली. हो, ऐकून तरी करायचं आहे काय? कितीहि महत्त्वाची मीटिंग असली तरी तास-अर्धा तास काय ती पुढें ढकलतां येत नाहीं? अन् म्हणे पेपर वाचायचा आहे! मागाहून वाचला तर तो पेपर कांहीं कुजून जात नाहीं कीं त्यांत केलेलें संशोधन क्लोरोफॉर्मसारखें उडून जात नाहीं! पण प्रत्येक गोष्टींत जिथेंतिथें बायकोचें मनच मोडायचें असतें, तिथें अधिक बोलण्यांत अगर बोललेलें ऐकण्यांत अर्थ काय?

पांच वाजतां वाङ्मयमंडळाची मंडळी आली तेव्हां पुढें व्हरांड्यांत जाऊन हास्यमुखानें तिनें सर्वांचें स्वागत केलें. सर्वांच्या मागून व्हरांड्याच्या पायऱ्या चढणाऱ्या कवि मुकुलची तिला ओळख करून द्यावी लागली नाहीं. त्याचे अनेक रुबाबदार फोटो बहुतेक मासिकांत वारंवार झळकत असत. दिवाणखान्यांत सर्व मंडळी बसल्यावर साहित्यचर्चा सुरू झाली. संभाषणाच्या संदर्भांत मुकुलकडे जेव्हां जेव्हां तिची नजर वळे तेव्हां तेव्हां तिच्या मनांत येई—त्यानें आपल्या काव्यांतले सारे नायक, आरशांतलें स्वतःचें प्रतिबिंब नजरेसमोर ठेवून तर रेखाटले नाहींत ना ? खाद्यपदार्थांचा समाचार घेतांना तिच्या कवितेचें रसग्रहण सुरू झालें. इतर खात होते. मुकुल बोलत होता. खाद्यपदार्थांच्या रसग्रहणापेक्षां काव्याचें रसग्रहण त्याला अधिक प्रिय आहे असें दिसत होतें. विद्वत्तापूर्ण, त्याच्या कवितांसारखेंच रसाळ, भावनातरंग उसळविणारें त्याचें वक्तृत्व ती मुग्ध मनानें ऐकत होती, अनिमिष नेत्रांनीं पाहात होती. तिच्या काव्याचें रसग्रहण करतांना तिला न सुचलेल्या ज्या कित्येक तरल कल्पना त्यानें सांगितल्या त्या ऐकून ती थक्क झाली. अशा प्रतिभावान् कवीची ओळख झाल्याबद्दल मनांतून तिनें स्वतःला धन्य मानलें.

तिच्या सुंदर बागेच्यांत बसून सुगंधित पवनलहरींचा नि गप्पांचा आस्वाद घेऊन सर्व मंडळींनीं तिचा निरोप घेतला. निरोपाचा नमस्कार करीत कवि मुकुलनें भावपूर्ण स्वरांत म्हटलें, ‘कल्पनाविलासाला पोषक असें इतकें रमणीय वातावरण नि इतका कलात्मक रीतीनें सजविलेला संसार मीं अद्याप इतर कुठें पाहिला नव्हता. या वातावरणांत पाऊल पडतांच रसिकाची प्रतिभा फुलावी, त्याचा पुनर्जन्म व्हावा.’

त्या अभिप्रायानें तिच्या हृदयांत आनंदोर्मि उसळल्या. तिनें आभार मानून हलकेंच म्हटलें, ‘आपण इथें अधूनमधून आलांत तर मला आनंद वाटेल. आपल्या ज्ञानाचा नि मार्गदर्शनाचा लाभ मिळेल.’

सर्व मंडळी दृष्टिआड झाल्यावर ती दिवाणखान्यांत येऊन बसली. गेल्या तीन साडेतीन तासांत तिच्यावर ज्या असंख्य स्तुतिसुमनांचा वर्षाव झाला होता त्याच्या भारानें तिचें मन तरल बनलें होतें. हृदय उत्फुल्ल

झालें होतें. सुवासिक झालें होतें. सुवासिक फूल नाकाजवळ धरून पुनः-पुनः हुंगावें तसें कौतुकाचे शब्द—विशेषतः मुकुलाचे शब्द—ती पुनःपुनः आठवीत होती. त्यानें निरोप घेतांना उच्चारलेले भावनापूर्ण शब्द तिच्या कानांत निनादत होते. त्याच्या वागणुकींतील अदब, बोलण्यांतील माधुरी, चालण्यांतील ऐट—सूर्यास्ताचा देखावा पाहून घरीं आल्यानंतर त्यांच्या विविध मनोहर छटा नजरेसमोर कितीतरी वेळ तरळत राहाव्यात तशा—संध्याकाळीं नजरेस पडलेल्या त्याच्या स्वभावाच्या अनेक मनोरम छटा तिच्या नजरेसमोर तरळत होत्या.

रात्रौ ९।। वाजतां भास्कर घरीं आला तेव्हां ती वर शयनगृहांत झोपली होती. तिला न उठवितां तो हलकेंच दारांतून परतला. रोजच्या प्रमाणें आंघोळ-जेवण उरकून तो शयनगृहांत आला. तिची झोप चाळवणार नाहीं अशा बेतानें हलकें पावलें टाकीत त्यानें पलंगाच्या दुसरीकडेला टेबल लँप ठेवला, तिला उजेडाचा त्रास होणार नाहीं अशा बेतानें दिव्याची शेड फिरविली, नि हलकेंच बाजूला झोपून त्यानें, ‘ मेडिकल जर्नल ’ उघडलें. तिच्या झोप चाळवण्याचा प्रश्नच नव्हता. तिचें मन वर कल्पनासृष्टींत फिरत होतें, पण कान खालीं पलंगावरच होते नि त्यांना सारी चाहूल लागतच होती. निरभ्र नील आकाशांत मध्येंच एखाद्या काळ्या ढगानें येऊन आकाशाची शोभा बिघडवून टाकावी तशी तो येतांच तिच्या मनाची अवस्था झाली. इतरांनीं—कवि मुकुलसारख्या अगदीं अपरिचित माणसानेंहि—आपल्यावर असंख्य स्तुति-सुमनांचा वर्षाव करावा, पण आपल्या नवऱ्यानें त्यांत एक पानहि टाकूं नये !...तिच्या भुवया संकुचित झाल्या.

दोन दिवसांनीं दुपारच्या वेळीं एक छोटेंसें पुडकें घेऊन कॉलेजचा पट्टेवाला जेव्हां दाराशीं येऊन अदबीनें उभा राहिला तेव्हां ती कांहींशी आश्चर्यचकित झाली. पुडक्यावरचें नीलकागदाचें नीटनेटकें आवरण तिनें घाईघाईनें उलगडलें. आंत मुकुलचे तीन कवितासंग्रह व एक निळ्या रंगाचें पाकीट होतें. पट्टेवाल्याला थांबायला सांगून ती पुडकें घेऊन

अनुक्रम 307-८८
आ.ग्र. ११
क्रमांक २०५६
3-7-51

आपल्या अभ्यासिकेंत गेली. पाकिटांतलें पत्र काढून तिनें अधीरतेनें वाचलें.

*‘ आपल्या अवलोकनार्थ माझे कांहीं काव्यसंग्रह पाठवीत आहे. आपलें मत कळावें अशी इच्छा आहे. वाचून झाल्यावर आपल्या सवडीनुसार प्रत्यक्ष चर्चा करूं.*

*— मुकुल ’*

माझें मत ? माझी तेवढी योग्यता तरी आहे का ? सूर्यानें काजव्याला विचारावें ? सूर्यप्रकाशानें डोळे दिपावे तशी तिनें आपल्या नेत्रांची उघड-झांप केली. नि मग चिठ्ठीचें उत्तर लिहिलें.

*‘ आपले काव्यसंग्रह मिळाले. आभार ! अमृतघट रिते करायला फार वेळ लागत नाहीं. चर्चेसाठीं आपण केव्हांहि–शनिवारीं संध्याकाळीं सवड असल्यास चहालाच–यावं.’*

*— उषा*

शनिवारीं तो आला. त्याच्या तोंडून त्याच्या कवितांचें रसग्रहण ऐकतांना तिच्या चित्तवृत्ति धुंद झाल्या, मन मोहरलें. अन् मग दर शनिवारीं काव्यचर्चा करायचें–त्याच्या रसवन्तीचें–तिला व्यसनच जडलें. रोज सकाळीं उठल्याबरोबर चहासाठीं जशी ती अधीर होई त्याच आतुरतेनं दर शनिवारीं संध्यांकाळीं ती घड्याळाकडे नजर लावून बसे. काव्यचर्चेतून स्नेह निर्माण झाला. हळूहळू तो वाढूं लागला तसें मुकुलचें येणेंहि वाढूं लागलें. तो अविवाहित असल्यामुळें काळवेळेचें कसलेंहि बंधन त्याला नव्हतें. केव्हांहि घरीं जावें, नोकरानें आणून ठेवलेल्या डब्यांतील थंडगार अन्न केव्हांहि घशाखालीं ढकलावें. पण गाढ परिचयानंतर हें उषेला कळल्यावर ती कधीं कधीं त्याला जेवायला घालूनच निरोप देई तर कधीं

कधीं चहाबरोबर इतकें खायला लावी कीं रात्रीं त्याला भूकच राहात नसे. त्याच्या आवडी-निवडी तिला आतां चांगल्या माहित झाल्या होत्या अन् ती त्या लक्षांत ठेवून कटाक्षानें पाळीत असे. पूर्वीं आपल्या अभ्यासिकेंत, दिवाणखान्यांत अगर बागेंत एकटीच बसत असे. आतां तिथें दोन डोकीं दिसूं लागलीं होतीं. रात्रीं भास्कर घरीं येण्याच्या वेळीं तो तिचा निरोप घेऊन गेला कीं तिला आपल्या भोंवतालचा प्रखर प्रकाशाचा विद्युद्दीप एकदम विझल्यासारखा वाटे अन् मग रात्रीं बिछान्यावर पडल्या पडल्या डोळे बंद करून तो दीप पुन्हां प्रकाशित करण्याचा ती प्रयत्न करी. मुकुलच्या बोलण्यांतले अनेक मधुर शब्द आठवण्याचा ती प्रयत्न करी.

त्या दिवशीं संध्याकाळीं बागेंतल्या फुलझाडांचें निरीक्षण करतांना त्यानें तिच्या कलात्मक संसाराचें कौतुक केलें तेव्हां तिनें म्हटलें होतें, 'इतकें कसें हो तुमचें बारीक लक्ष? या इतक्या सूक्ष्म गोष्टी दुसऱ्या कुणाच्याहि लक्षांत येणार नाहींत.'

तो हंसला नि तिरप्या नजरेनें तिच्याकडे पाहात त्यानें म्हटलें, 'जें न देखे रवि ते देखे कवि.'

आतां रात्रीं बिछान्यावर पडल्या पडल्या तें बोलणें तिला आठवलें. त्या वेळचा त्याच्या तिरप्या नजरेंतला भाव ती आतां मिटल्या डोळ्यांनीं शोधूं लागली. 'जें न देखेरवि...' रवि—म्हणजे भास्कर—म्हणजे त्याला असें तर सुचवायचें नव्हतें कीं भास्करला, तुझ्या नवऱ्याला जें दिसत नाहीं, तें मला दिसतें. तुझ्या नवऱ्याला जे गुण दिसत नाहींत ते मला दिसतात. जी कौतुकदृष्टि त्याला नाहीं ती मला आहे. सूर मारून पाण्यांत खोल खोल जावें तसें ती कल्पनासागरांत खोल खोल जाऊं लागली. अगदीं तळाला जाऊन तिनें एक कल्पना-रत्न हातांत पकडून वर आणलें. हो, अं—हो. आज नव्हे काल संध्याकाळींच नाहीं का त्यानें लिहायला घेतलेल्या एका नवीन काव्याची कल्पना तो आपणास सांगत होता. त्याच्या त्या तरल कल्पनाविलासानें मुग्ध होऊन तिनें म्हटलें, 'इतक्या सुंदर कल्पना तुम्हाला सुचतात तरी कशा?'

त्यानें उत्तर न देतां उलट प्रश्न केला, ' कवीला कल्पना कशा सुचतात सांगा पाहूं ? '

कॉलेज क्लासमध्यें प्रश्न विचारावा तसा त्याचा आविर्भाव नि गांभीर्य बघून तिला हंसूं आलें. तिनं म्हटलें, ' सौंदर्यदर्शनानें, सृष्टीचीं–निसर्गाचीं विविध रूपं... '

त्यानं मध्येंच म्हटलं, ' सौंदर्यदर्शनानें ना ? मग तोच नियम मलाहि लागूं आहे. इथल्या वातावरणांत उमटलेल्या सौंदर्याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला आहे. आणि– ' किंचित् थांबून तिच्या नजरेला नजर भिडवीत त्यानें पुढें म्हटलें, ' व्यक्तीच्या सौंदर्याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला आहे. '

स्तुतीचा कैफ मोठा विचित्र असतो. तिनें मानेला एक नाजूकसा झटका दिला, पण त्या निषेध-प्रदर्शनांत आपल्या हृदयाची सम्मति तिला लपवितां आली नाहीं. आतां निद्राधीन होतां होतां ती नजर तिला सुखवीत होती–गुंगी आणीत होती.

एक दिवस बोलतां बोलतां तिनें मुकुलला म्हटलें, ' कॉलेजमधून रोज तुम्हाला इकडे यायला उलट रस्ता पडतो नाहीं ? '

त्यानें हंसून म्हटलें, ' प्रेमाचा मार्ग नेहमीं उलटच असतो. '

आपलें मन जसें त्याच्यावर जडलंय तसें त्याचेंहि मन आपल्यावर जडलें असावें अशी जी शंका तिच्या मनांत अलिकडे वारंवार येत होती, त्यावरचें पटल एकदम दूर झालें. प्रेम एकमेकांजवळ व्यक्त झाल्यावर चर्चेचे इतर सामान्य विषय अव्यक्त होऊं लागले. आतां रोजच्या संभाषणाला वाङ्मयासारख्या विशाल विषयाची जरूरी नव्हती. मूठभर हृदयाचा विषय भरपूर होत असे. पूर्वीं ज्या ' रेस्ट-रूम ' मध्यें शारीरिक व्याधींनीं विव्हळ झालेले रोगी थोडा वेळ विसांवा घेत तिथें आतां मानसिक व्याधीनें विव्हल झालेले दोन प्रेमरोगी संध्याकाळच्या वेळीं विसावूं लागलें !

प्रीतीच्या मानसिक व्यथेंत नि प्रियकराच्या चिंतनांत आपण विवाहित आहोंत हेंहि ती विसरून जाई. भास्कर घरीं आला कीं त्याला पाहातांच सत्य परिस्थितीची तिला जाणीव होई. पण ती जाणीव तिला फारशी सुखावह वाटत नसे. पण सुखावह वाटली नाहीं तरी ती जाणीव कांहीं घालवितां येण्यासारखी नव्हती. मग अशा वेळीं ती मुकुल अन् भास्कर या दोघांची मनाशीं उगीचच तुलना करूं लागे. प्रेमी मनाच्या कल्पना कधींच स्थायी नसतात. त्या सारख्या बदलत असतात. आपल्या बदललेल्या नवीन कल्पना-चौकटींत ती दोघांना आलटून पालटून बसवून बघे. भास्करचा सुदृढ, धिप्पाड देह—शीः ! लांब रुंद वडाच्या झाडाला कुणी—अगदीं त्याच्या छायेंत बसणारा माणूस सुद्धां—सुंदर म्हणणार नाहीं. त्यापेक्षां मुकुलची मध्यम उंचीची सडपातळ बांदेसूद आकृति!—अन्—अन् भास्करमध्यें रसिकताच नाहीं तर ती त्याच्या पोषाखांत कुठून येणार ? तुलनेंत त्याचें पारडें इतकं खालीं झुके कीं बघतां बघतां तें अंधारांत लुप्त होई.

एके दिवशीं संध्याकाळीं लताकुंजांत ती मुकुलबरोबर वार्तालाप करीत बसली होती. बोलतां बोलतां त्यानें म्हटलें, ‘ उद्यांपासून आमच्या कॉलेजला रजा पडणार.’

‘ मग तूं—तूं--तुम्ही सुटींत आपल्या गांवीं जाणार कीं काय ? ’

तिच्या स्वरांतल्या भयार्ततेनें त्याच्या हृदयाला गुदगुल्या झाल्या. त्यानें विचारलं, ‘ तुला कसें वाटतें ? ’

तिनें हलकेंच म्हटलें, ‘ तुम्ही गेल्यावर मला करमणार नाहीं. तुमच्या सहवासांत माझा वेळ किती आनन्दांत जातो. रोज तुम्हांला निरोप देतांना माझें मन इतकें जड होतें—’

‘ आणि तुला सोडून जातांना माझें मन हलकें फुलासारखें होतें असें का वाटतें तुला ? उषा, तुझ्या विचारानें सबंध रात्र मी बिछान्यावर माशासारखा तडफडत असतों. क्लासमध्यें शिकवतांना पुष्कळ वेळ माझें चित्त विचलित होतें. तुझ्याशिवाय राहणें दिवसेंदिवस कठिण वाटूं लागलें आहे. प्रयत्न करूनहि माझें मन मला आवरतां येत नाहीं—’

बोलतां बोलतां त्याच्या साऱ्या भावना जणूं गळ्यांत गोळा झाल्या होत्या! त्याच्या सकंप स्वराबरोबर तिचें हृदय हेलावलें. जललहरींवर आपण तरंगतों आहोंत, लाटांबरोबर हेलकावे खातों आहोंत असें तिला वाटूं लागलें.

तिनं भावनावश होत म्हटलं, 'माझ्या हृदयाला तें कळत का नाहीं? मुकुल, तूं यापूर्वींच माझ्या जीवनांत यायला हवा होतास. आपण आधीं भेटायला हवे होतों. आतां—आतां—'

'आतां नाहीं नि मग नाहीं. जिथें भेटलों तिथून पुढें वाटचाल करूं! तुझें लग्न झालेलें आहे हें कळतंय मला. पण लग्न म्हणजे कांहीं वज्रलेख नव्हे. अगदीं साध्या शाईनें लिहिलेला लेख तो! सहज पुसून टाकतां येतो, उषा, तुझ्याशिवाय माझें जीवन व्यर्थ आहे. मला जगणेंच शक्य नाहीं—'

बोलतां बोलतां त्यानें तिचा हात आपल्या हातांत घेतला. उन्हाळ्याच्या उकाड्यांत थंडगार जिवाणूचा हाताला स्पर्श व्हावा तसें तिला वाटलें. स्पर्शानें शरीर सुखावलें! पण मन!—मनांत खोलवर असलेल्या संस्कारांना धक्का लागला. अन् ती दचकली. शरीर अन् मन यांच्या झगड्यांत ती असतांनाच त्यानें तिला आपल्याजवळ केव्हां ओढलें हें तिला कळलेंहि नाहीं! पण तेवढ्यांत भास्करच्या अभ्यासिकेंत दिवा लागला; त्याचा प्रकाश खिडकींतून थेट लताकुंजाच्या दाराशीं खालीं हिरवळीवर पडला. तो प्रकाश पाहातांच तिच्या डोळ्यांसमोर अंधारी आली. आतां या वेळीं—या वेळीं भास्कर घरीं! अन् आपण मोटारीचा आवाज ऐकला नाहीं कसा? 'डॉक्टर आलेयेत्. तूं आतां जा.' असं पुटपुटत तिनें त्याला बाजूला ढकललें नि अंधारांत वेगानें ती बंगल्याकडे निघाली. पण दहा-बारा पावलें ती गेली असेल नसेल तोंच बॅडमिंटन् कोर्टचा खांब पुरण्या-साठीं दोन दिवसांपूर्वीं खणून ठेवलेल्या खड्डयांत एकदम जोरांत तिचा उजवा पाय गेला. आर्त किंकाळी तिच्या तोंडून बाहेर पडली. त्याच वेळीं मुकुल तिच्याजवळून घाईघाईनें फाटकाकडें पळाला नि फाटक उघडून दृष्टिआड झाला. तेवढ्यांत व्हरांड्याचा लाइट लावून भास्कर पायऱ्यां-वरून धांवत तिच्या आवाजाच्या अनुरोधानें तिच्याजवळ आला. ती

डाव्या हातानें तोंड दाबून उजव्या हातानें खड्डयांतून पाय वर काढण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत होती.

तिच्याजवळ वांकून त्यानें घाबरून विचारलें, ‘ काय झालें उषा ? ’

पण प्रश्नाचें उत्तर येण्यापूर्वींच तिची अवस्था त्याच्या लक्षांत आली. अधिक कांहीं न बोलतां आपल्या बळकट बाहूंनीं तिला त्यानें अलगद उचललें नि फुलासारखें हलकेंच नेऊन दिवाणखान्यांत कोचावर ठेवलें. उजेडांत त्यानें तिचा पाय बघितला. हाड मोडल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं.

शुद्धीवर आल्यावर तिनें हलकेंच डोळे उघडले नि सभोंवार नजर टाकली. आपण हॉस्पिटलमध्यें आहोंत हें तिच्या लक्षांत आलें. किती वाजलेयत हें तिला कळेना. पण सकाळ होऊन गेलीय एवढा तिला अंदाज करतां आला. म्हणजे सबंध रात्र आपणांस झोंप लागली होती ? कीं गुंगीचें इंजेक्शन दिलें होतें ? आदली रात्र ती आठवूं लागली. भास्करनें उचलून नेल्यानंतर, छेः ! पुढचें कांहींच तिला आठवेना. तिची पायाकडे नजर गेली. रात्रीं प्राणांतिक वेदना देणारा तो पाय आतां प्लॅस्टरमध्यें असून अधांतरीं टांगलेला होता. यत्किंचित् हालतहि नव्हता, दुखतहि नव्हता. उशीवरच्या उशीवर तिनें चौफेर मान फिरवली. तिच्या छोट्या खोलीच्या दोन्ही बाजूंना कांचेच्या मोठाल्या खिडक्या होत्या. त्याच्या बंद तावदानांतून उजवीकडच्या स्त्रियांचा व डावीकडचा मुलांचा दोन्ही विस्तीर्ण ‘ सर्जिकल वॉर्ड ’ थेट टोकांपर्यंत दिसत होते. ती जागी झालेली पाहातांच तिच्या उशाकडच्या व्हरांड्यांतून कुठूनशी एक परिचारिका झटकन् पुढें आली नि कामाला लागली. दांत घासायच्या ब्रशावर पेस्ट देण्यापासून ती करीत असलेले सारे सोपस्कार उषा मूक वृत्तीनें करून घेत होती. बोलक्या नजरेनें हॉस्पिटलचें नवीन वातावरण निरखीत होती अन् उघड्या कानानें परिचारिकेचें बोलणें ऐकत होती. तिच्या बोलण्यावरून डॉक्टर भास्कर आपण झोंपेंत असतांनाच राउंडला येऊन गेल्याचें तिला कळलें.

परिचारिकेनें आपलें काम आटोपलें. तेवढ्या श्रमानें कीं रात्रीं दिलेल्या गुंगीच्या इंजेक्शननें-कशानें कोण जाणे-तिला अगदीं गळून गेल्यासारखें

वाटत होतें, डोळे भारावले होते. 'ओव्हलटाइन्' पिऊन होतांच ती डोळे मिटून स्वस्थ पडली. वॉर्डांत जिकडेतिकडे शांत होतें. त्या शांत वातावरणांत मिटल्या डोळ्यांनीं ती रात्रीचे नि संध्याकाळचे प्रसंग आठवण्याचा प्रयत्न करूं लागली. लताकुंज तिच्या नजरेसमोर आलें. तेवढ्यांत व्हरांड्यांत तिच्या उशाकडच्या खिडकीजवळ परिचारिका कुणावर तरी खेसकली. त्या आवाजानें तिच्या नजरेसमोर स्थिर होणारीं चित्रें एकदम हाललीं. परिचारिका कुणाला तरी म्हणत होती–'या. आंत अगदीं नीट डोकावून पाहा. सकाळपासून सगळ्या येऊन हें 'प्रदर्शन' बघून गेल्या, आतां तुम्हीच राहिल्या होतात शिल्लक.'

'कां, फारशी चढलीयेस? डॉक्टरनीं इथें तुला स्पेशल ड्यूटी दिली म्हणून वाटतें! बरें. कसा आहे ग तुझा पेशंट? ठीक ना?'

'अगदीं उत्तम. कांऽहीं त्रास नाहीं बघ. शांत पडून आहे. काम जरा अबोलच दिसतंय्. डॉक्टर कुठें आहेत ग?'

'ऑपरेशन-थिएटरमध्यें.'

'नाडीबिडी ठीक आहे ना त्यांची?'

दुसरी परिचारिका हंसली. 'खोटें नाहीं. रात्रीं खरोखरच त्यांची नाडी बघण्यासारखी होती! एवढे मोठे धैर्यवान् डॉक्टर, बायकोचें एवढेंसें fracture बघून कमालीचे नर्व्हस् झाले होते. अग, 'एक्स-रे' साठीं हिला टेबलावर ठेवली तेव्हां त्यांचे हात कांपत होते, खोटें नाहीं सांगत. मला भारी feel झालें बाई. एरवीं मोठे कडक असणारे हे डॉक्टर, आपल्या बायकोच्या बाबतींत इतके मृदु असतील ही कल्पना नव्हती.'

'अन् मी सकाळीं इथें ड्यूटीवर आलें तेव्हां त्यांनीं मला इतक्या बारीक-सारीक सूचना दिल्या–बायकोच्या आवडीनिवडीचा इतका बारीक तपशील त्यांनीं सांगितला कीं तो ऐकतांना मला मनांतून हंसूंच आलें! ते म्हणाले, 'औषधाचा एखादा भाग द्यायचा राहिला तरी चालेल, पण रोज सकाळ-संध्याकाळ फ्लॉवरपॉटमध्यें ताजीं सुंदर फुलें नि वाचायला पुस्तकें ठेवीत जा.' भारी प्रेम नि कौतुक दिसतेंय आपल्या बायकोचें—'

प्रेम नि कौतुक! ते शब्द ऐकतांच ती दचकली! एका धाग्यांतून

अनेक धाग्यांचें जाळें कोळ्यानें निर्माण करावें, तसें त्या एकाच शब्दांतून अनेक विचारधागे तिचें मन विणूं लागलें. प्रेम नि कौतुक! मुकुलचेंहि आपणांवर अपार प्रेम आहे—पण पण...खरेंच, आहे का? आदल्या सायंकाळचा प्रसंग तिच्या नजरेसमोर उभा राहिला. आपण खड्ड्यांत पडलों असतांना आपली आर्त किंकाळी ऐकून सुद्धां तो आपणांला तशीच टाकून आपणांजवळून झपाट्यानें निघून गेला. फुलाची पाकळी चुरगळली तरी ज्याचें हृदय दुखावतें अशा या कोमलहृदयी कवीचें मन त्याच्या प्रेयसीची आर्त किंकाळी ऐकून दुखावलें नाहीं—कसें दुखावलें नाहीं? त्याचें आपणांवर आत्यंतिक प्रेम जडलें होतें ना? त्या प्रेमाची क्षणाक्षणाला तो वाचेनें नि नजरेनें ग्वाही देत होता ना? 'तुझ्या प्राप्ती-साठीं मी भास्करशींच काय, जगाशीं सुद्धां टक्कर देईन. समाजाविरुद्ध बंड पुकारीन' असें छाती ठोकून सांगणारा हा कवि वेळ येतांच जीव मुठींत घेऊन पळून कां गेला? म्हणजे त्याचें हें खरें प्रेमच नव्हतें का? मग काय होतें तें? केवळ भूलभुलावणीच? तें सौजन्य, ती अदब, ते आर्जवी मधुर शब्द नि तें कौतुक—! प्रेमाचा—नव्हे मोहाचा—रोग स्तुतीच्या विषानें वाढतो. उंदीर चावतो तेव्हां कुठें कळतें माणसाला? तो म्हणे फुंकर मारून चावत असतो नि विष शरीरांत भिनतें. कसलें तरी विचित्र विष आपल्या अंगांत पसरलेंय असा तिला भास झाला. तिचें शरीर शहारलें. रात्रीं भास्करनें तिला खड्ड्यांतून एकदम वर उचललें होतें तेव्हांहि असेंच आपलें शरीर शहारलें होतें याची तिला एकदम आठवण झाली. त्याचा भयाकुल आवाज तिला आतां आठवला. आपणांला आंत बंगल्यांत नेण्यासाठीं लहान बालासारखें त्यानें छातीशीं धरलें होतें तेव्हां त्याच्या हृदयाची धडधड आपणांस कळत होती हेंहि तिला आठवलें.

अन् हें आठवतांच त्याच्या त्या धडधडत्या भयाकुल हृदयांत लपलेल्या अनेक गोष्टी तिला दिसूं लागल्या. 'आपलें तो कौतुक करीत नाहीं, गुणांचें चीज करीत नाहीं, असें आपणांला कां बरें वाटलें? तो बोलून दाखवीत नाहीं म्हणून का? पण लग्न होऊन आल्यादिवशींच आपल्या इच्छेप्रमाणें त्यानें घरचा दवाखाना हलवला. कशासाठीं? आपल्या

काव्यसाधनेला अवसर मिळावा म्हणूनच ना ? हें आपल्या गुणाचें चीज नव्हे का ! आपणांला अनिर्बंध स्वातंत्र्य मिळतेंय् तें कशाचें द्योतक आहे ? आपल्या काव्यगुणाचा विकास व्हावा म्हणूनच ना ? अन् त्या स्वातंत्र्याचा आपण किती दुरुपयोग केला ? म्हणजे त्यानें नव्हे–तर उलट आपणच त्याच्या गुणांचें चीज केलें नाहीं. त्याचें हृदय ओळखलें नाहीं. पाण्याच्या पृष्ठभागावर क्षणिक तरंगणारे बुडबुडे अगदीं मोत्यासारखे सतेज, सुंदर नि टपोरे दिसले तरी ते मोती नव्हेत. खरे मोती पृष्ठभागावर तरंगत नसतात–पृष्ठभागाखालीं खोलखोल असतात. आपण बुडबुड्यांना भुललों. अन्–अन् आतांपर्यंत जी काव्यसाधना केली, फुलें-निसर्ग-ऋतु-यांपुरतेंच जें काव्यजीवन जगलों, तें–तें या बुडबुड्यां सारखेंच नाहीं का ? निर्जीव जिवांत जीव आणणारा, रोगांनीं जर्जर झालेल्या अचेतन शरीरांत चेतना भरणारा भास्करसारखा डॉक्टर हाच खरा जिवंत कवि नव्हे का ? मग अशा या कवीचें आतांपर्यंत आपण किती कौतुक केलें ?...' उदबत्ती कणाकणानें जळते तशी ती पश्चात्तापानें, शरमेनें जळूं लागली.

त्या मानसिक श्रमनिद्रेंतून जागें होऊन जेव्हां तिनें डोळे उघडले तेव्हां भास्कर आपल्या कॉटजवळ खुर्चीवर बसल्याचें दिसलें. ती दचकली. त्याच्या नजरेला नजर देण्याचा तिला धीर होईना. त्याच्याकडे क्षणमात्र बघून क्षीण स्मितहास्य करीत तिनें नेत्र पुन्हां मिटले. त्यानें हलकेंच तिच्या कपाळावर हात ठेवून थोपटल्यासारखें करीत म्हटलें, 'उषा, अजून झोंप पुरी झाली नाहीं का ? कुंभकर्ण डोळ्यांत येऊन बसलाय कीं काय ? किती वाजले माहीत आहे ? डोळे उघड.'

तिनें डोळे उघडले. अन् त्यानें तिच्या नजरेसमोर धरलेल्या मनगटा-वरील घड्याळांत दोनवर सरकलेल्या कांट्याकडे नजर टाकून आजूबाजूला बघितलें. दोन्ही बाजूच्या कांचेच्या खिडक्यांवर पांढरे पडदे सरकवलेले होते. दोन्ही बाजूचे दरवाजे बंद होते. भास्करशिवाय खोलींत कुणी नाहीं ही जाणीव होतांच तिची छाती धडधडूं लागली. कांहींतरी बोलायचें म्हणून तिनें विचारलें, 'जेवलांत ?'

त्यानें हंसून म्हटलें, 'उषाराणीला सोडून मी कधींतरी एकट्यानें जेवतों काय ? आणि तूं सकाळपासून ओव्हलटाइनशिवाय कांहीं एक घेतलें

नाहींस असें नर्स सांगत होती. Fracture म्हणजे आजार नव्हे पथ्य पाळायला. जेवणार ना? मी इथेंच आपणां दोघांचा डबा आणायला सैंपाक्याला सांगितलें आहे. आतां तो घेऊन येईलच. मीं तुझ्यासाठीं आज काय बनवायला सांगितलेंय, माहीत आहे?'

थेंबाथेंबांनीं 'पर्जन्यपात्र' भरावें तसें त्याच्या शब्दागणिक तिचें हृदय भरून आलें नि डोळ्यावाटें वाहूं लागलें! त्यानें घाबरून विचारलें, 'हें काय? पाय फार दुखतोय का?'

उत्तर न देतां तिनें म्हटलें, 'मला घरीं घेऊन चला.'

'घरीं गेल्यानें दुखायचें कमी होणार आहे का? वेडी कुठची! अशा स्थितींत घरीं कसें नेणार?'

खरें होतें तें. ती स्तब्ध राहिली. त्यानें म्हटलें, 'इथें तुझी कांहीं एक अडचण होणार नाहीं. तुझी नर्स हुशार आहे. तुझ्या इच्छेप्रमाणें सर्व व्यवस्था ठेवील तुला ज्या सुधारणा हव्या असतील—'

'तसें नाहीं. इथली व्यवस्था उत्तम आहे.' थोडा वेळ स्तब्ध राहून तिनें हलकेंच म्हटलें, 'मी एक सांगूं का? माझी एक इच्छा आहे.'

'काय?'

'माझीं पुस्तकं तुमच्या अभ्यासिकेंत आणून ठेवलीं तर—तर—आपणां दोघांची अभ्यासिका एक असली तर चालेल?'

'आपण दोघे दोन का आहोंत? चालेल म्हणजे? एकदम चालेल.'

तिनें थांबून हलकेंच म्हटलें, 'अन्—अन् पूर्वीं होता तसा दवाखाना घरीं आणा. पूर्वींप्रमाणें रोग्यांची 'रेस्टरूम' करा—अन्—पूर्वीं होतें—'

मृत्यूच्या दाढेंत गेलेल्या रोग्याला उतार पडूं लागला म्हणजे डॉक्टरच्या चेहऱ्यावर जो आनंद झळकतो तसा आनंद त्याच्या चेहऱ्यावर उमटला. त्यानें मृदु स्वरांत म्हटलें, 'पण आजच काय हा विचार?'

सद्गदित स्वरांत तिनें म्हटलें, 'माझा—माझा आज पुनर्जन्म झालाय्.'

तिचे अश्रु पुशीत त्यानें म्हटलें, 'वेडी आहेस. जीवनांत अपघात हे व्हायचे! आजार हे यायचेच!!...'

★

दोन

# निरगांठ

◇ ◇ ◇

**प्रभाकर** आपल्या शेतकी कचेरींतून बाहेर पडला तेव्हां सात वाजून गेले होते. म्हणून आपल्या घराकडे न वळतां तो परस्पर माधवरावांच्या 'विधाता' बंगल्याकडे वळला.

'ब्रिज'ची मंडळी आपली वाट पाहात बसली असेल या विचारानें तो भरभर पावलें टाकूं लागला. माधवरावांच्या बंगल्यांत 'क्लब' भरत असे. पुण्यापासून पंचवीस मैलांवर असलेलें हें देवगांव तालुक्याचें ठिकाण होतें. गांव लहानसें असलें तरी बागायतीसाठीं प्रसिद्ध होतें. लोकवस्तीच्या मानानें व्यापारहि चांगला चालत असे. शहर सुधारणेचीं पुष्कळशीं लेणीं देवगांवच्या अंगोपांगांवर चढूं लागलीं होतीं. पण सभोंवार जिकडे तिकडे पसरलेल्या बागा नि मळे यामुळें या ग्रामदेवतेच्या शरीराभोंवतीं लपेटलेल्या हिरव्यागार ग्रामीण साडीचा रंग बदलला नव्हता. गांवाला अलिकडेच रेल्वे स्टेशन झालें होतें, पण गांवांत अद्याप वीज खेळूं लागली नव्हती.

'विधाता' बंगल्यांत राहाणारे माधवराव साठ वर्षांचे पेन्शनर एंजिनिअर होते. वृद्ध असूनहि मोठे हौशी नि उत्साही होते. या वयांतहि ते आपल्या मळ्यांत नि शेतांत जातीनिशीं देखरेख करीत असत. दहा वर्षांपूर्वीं त्यांनीं हा बंगला बांधला होता नि जमीन खरेदी केली होती. पेन्शन घेतल्यावर ते इथें राहायला आले होते. मूळ कांहीं ते या

देवगांवचे नव्हते. पण पुण्याजवळ असणारें हें गांव त्यांना खूप आवडलें आणि निवृत्तीनंतरच्या आयुष्यक्रमाची त्यांनीं इथें आगाऊ तरतूद करून ठेवली होती. नोकरीनिमित्त ते अनेक गांवें नि विविध शहरें फिरले असल्यामुळें त्यांच्यांत एक प्रकारचा बहुश्रुतपणा नि सुसंस्कृतपणा आलेला होता. वाचनाची त्यांना खूप आवड होती, त्यामुळें ते वरीचशीं वर्तमानपत्रें नि मासिकें घेत असत. नाविक दलांत अधिकारी असलेला मोठा मुलगा त्यांना इंग्रजी मासिकें नि पुस्तकें पाठवीत असे. त्यांच्या प्रशस्त दिवाणखान्यांत छोटीशी लायब्ररी होती. पुस्तकांच्या कपाटांना कुलुपें असलीं तरी जिज्ञासु वाचकाला वाटेल तें पुस्तक वाटेल तेव्हां वाचायला मिळत असे.

त्यांच्याकडे रेडिओ होता. बंगल्याच्या पुढच्या बाजूच्या मोकळ्या जागेंत बॅडमिंटनचें कोर्ट होतें. सर्व सुखसोयींनीं युक्त असलेल्या त्या सुंदर बंगल्यांत सध्यां फक्त ते आणि त्यांची पत्नी मनोरमाबाई हीं दोघेच राहत असत. त्यांचा मोठा मुलगा नाविक दलांत अधिकारी होता. दुसरा गेल्याच वर्षीं एंजिनिअरिंगच्या उच्च अभ्यासासाठीं अमेरिकेला गेला होता. धाकटी एकोणीस वर्षांची मुलगी पुण्याला कॉलेजमध्यें शिकत होती. एकंदरीत हें मोठें आदर्श नि समाधानी कुटुंब होतें. त्यांच्या बंगल्यांत चालू करमणुकीचीं सगळीं साधनें असल्यामुळें आणि दोघेहि पतिपत्नी आदरातिथ्यशील असल्यामुळें गांवांतली निवडक प्रतिष्ठित आणि सुशिक्षित मंडळी रोज त्यांच्याकडे गप्पा मारण्यासाठीं एकत्र जमत असे. त्यांचाच पुढें क्लब बनला. कामाधंद्यानिमित्त अगर नोकरीनिमित्त बदली होऊन येणाऱ्या सुशिक्षित माणसाला ‘ विधाता ’ बंगला हें एक सांस्कृतिक स्थान वाटे. क्लबांत वृद्ध मंडळीपेक्षां तरुण लोकच जास्त होते. प्रभाकरची शेतकी-अधिकारी म्हणून दीड वर्षांपूर्वींच इथें नेमणूक झाली होती, आणि अद्याप तो सडा फटिंग असल्यामुळें ‘ विधाता ’ बंगला हें त्याचें चार घटका करमणुकीचें आणि विसांव्याचेंहि स्थान बनलें होतें.

प्रभाकर दिवाणखान्यांत गेला तेव्हां घाणेकर वकील, जोशी हेड-मास्तर आणि माधवराव पत्त्यांचे जोड मध्यें ठेवून आरामांत लोडाला टेकून बसले होते नि गप्पा मारीत होते. उजव्या बाजूच्या कोपऱ्यांत

असलेल्या रेडिओजवळ बसून पद्माकर सराफ ‘ कार्यक्रम ’ पुस्तक चाळण्यांत गुंतला होता आणि श्रीधर साठे रेडिओची कांडी फिरवून सगळीं स्टेशनें चांचपून पाहात होता. प्रभाकरनें जातां जातां श्रीधरला म्हटलें, ‘ कांहीं विशेष कार्यक्रम आहे का ? ’

‘ प्रेमाचा त्रिकोण ’ ही श्रुतिका आहे. ऐकणार का ? ’

‘ मग रेडिओ बंद कर. दुपारीं एक प्रेमाचा त्रिकोण वाचलाच आणि–’

वाणेकरांनीं हंसून म्हटलें, ‘ तुम्हीहि त्या ‘ त्रिकोणांत ’ सांपडूं लागला आहांत कीं काय ? ’

प्रभाकरनें न हंसतां गंभीर मुद्रेनें म्हटलें, ‘ नाहीं. पण माझ्या एका मित्राची त्या त्रिकोणांतून सुटका करण्याचा प्रयत्न करतों आहें.’

‘ पण सुटका करण्याचा प्रश्नच उद्भवतो कुठें ? कारण त्रिकोण झाल्यानंतर त्यांतला एक कोन आपोआपच ‘ कट ऑफ् ’ होतो. ’

‘ पण भलताच कोन कापला जाऊं नये यासाठीं मी धडपड करतों आहें.’

रेडिओवर चांगला कार्यक्रम न सांपडल्यामुळें श्रीधरनें रेडिओ बंद केला आणि त्यानें म्हटलें, ‘ या काटकोनी भाषेंत बोलण्यापेक्षां तूं सरळ शब्दांत काय तें सांगावें अशी सर्वांच्या वतीनें मी तुला विनंति करतों.’

प्रभाकरनें म्हटलें, ‘ गेल्या मे महिन्यांत इथें माझा एक प्रोफेसर मित्र आला होता—’

‘ ते अविनाश आंबेकर मुंबईच्या कॉलेजमध्यें असतात ते ना ? ’

‘ हो, तोच. आतां सहा महिनेच झाले, मुंबईच्या कॉलेजांत बदली होऊन ! त्यापूर्वीं तो बेळगांवला होता. मे महिन्यांत इथें तो आला होता तेव्हां त्याचें लग्न ठरलेलें होतें. बेळगांवच्या एका मुलीशीं त्यानेंच आपलें लग्न ठरविलेलें होतें. अर्थात् दोघांच्या घरच्या मंडळींची संमति होती. लग्न ठरलें नि त्याची बदली मुंबईला झाली. मुंबईला गेल्यावर जागा शोधूं लागला, आणि मग एक दिवस—’

श्रीधरनें मध्येंच म्हटलें, ‘ एक दिवस त्यानें आपल्या वडिलांना कळविलें कीं इथें माझें एका मुलीवर प्रेम आहे नि मी तिच्याशीं लग्न

करूं इच्छितों. पूर्वी ठरलेलें लग्न मोडा. काय प्रभाकर, कथेचा हा शेवट बरोबर आहे ना ?'

प्रभाकरनें म्हटलें, 'बरोबर आहे, पण हा शेवट इष्ट आहे असें तुम्हां सर्वांना वाटतें काय ?'

जोशी मास्तरनीं म्हटलें, 'इष्ट नसलेल्या अनेक गोष्टी नित्य घडत असतात, त्यांतलीच ही एक आहे. या गोष्टींत एवढेंच म्हणतां येईल कीं तुमच्या मित्रांत निष्ठेचा सम्पूर्ण अभाव आहे.'

घाणेकर म्हणाले, 'पण लग्नापूर्वी निष्ठेचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं.'

प्रभाकरनें आश्चर्यानें म्हटलें, 'म्हणजे काय ? प्रेमाची प्रतारणा, ही फसवणूक तुम्हाला योग्य वाटते ?'

त्याचा आवेश पाहून घाणेकर हंसले नि म्हणाले, 'तुम्ही वापरलेला प्रेम हा शब्द योग्य वाटत नाहीं. कारण प्रेमाचा जन्मच मुळीं निष्ठेंतून होतो. तुम्ही आपल्या या मित्राच्या ज्या 'प्रेमावर' संतापतां आहां तें प्रेम नव्हे, तें आकर्षण आहे. आणि आकर्षण हें बुडबुड्यासारखें नेहमींच क्षणभंगुर असतें, आणि त्याचा परिणाम असा होणें अपरिहार्य आहे.

प्रभाकरचा आवेश कमी झाला नव्हता. त्यानें म्हटलें 'मला नाहीं तुमचें म्हणणें पटत! माझ्या मतें प्रेमाची सुरुवात आकर्षणानेंच होते. आणि त्याची परिणति निष्ठेंत होते—नव्हे झालीच पाहिजे. मला माझ्या या मित्राचें वर्तन यत्किंचितहि पसंत नाहीं.'

माधवरावांनीं हंसून म्हटलें, 'मग काय करणार तुम्ही ?'

'त्याला हें खरमरीत पत्र लिहून त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करणार आहें.' बोलतां बोलतां त्यानें खिशांतून जाड पाकीट काढून दाखविलें नि पुन्हां खिशांत ठेवीत म्हटलें, 'दुपारपासून आतांपर्यंत हें पत्र लिहीत होतों.'

माधवरावांनीं म्हटलें, 'पण यांत तुमचा मित्र दोषी आहे असें मला नाहीं वाटत.'

प्रभाकर आश्चर्यानें उद्गारला. 'म्हणजे? काय म्हणतां तुम्ही काका? एवढें करूनहि माझा मित्र दोषी नाहीं? मुलीला फसवून—'

'दैवाच्या हातांतलें खेळणें बनणाऱ्या माणसाला किंवा दैवानें आपल्या हातांतलें खेळणें बनविलेल्या माणसाला दोषी ठरवून तरी काय उपयोग?'

'दैव? दैव काय प्रेमाचे चाळे करा म्हणून सांगतें? माणसाला काय दैव निष्ठाहीन बनवतें? काका, दैव माणसाच्या हातांत असतें. माणूस दैवाला वांकवूं शकतो.'

'मला तसें वाटत नाहीं.'

'तुमच्यासारख्यांनीं असें म्हणावें याचें मला आश्चर्य वाटतें. मनोभंग झालेल्या त्या मुलीनें आतां काय करावें असें तुम्हांला वाटतें?'

'आपली लग्नगांठ तुमच्या मित्राशीं बांधलेली नव्हती असा सूज्ञ विचार करून, लग्नगांठ बांधलेला ईश्वरनिर्मित पति पुढें येईपर्यंत दुसऱ्या कुठच्याहि चांगल्या उद्योगांत तिनें आपलें चित्त गुंतवून ठेवावें.'

प्रभाकरनें तावातावानें म्हटलें, 'लग्नगांठ माणूसच बांधतो ना? कीं या लग्नगांठी कुठें आकाशांत बांधल्या जातात?'

'लग्नगांठी परमेश्वर बांधतो. तो आकाशांत बसून बांधतो कीं पाताळांत बसून हा उद्योग करतो हें कुणालाच ज्ञात होणें शक्य नाहीं. पण लग्न ही एक योगायोगाची गोष्ट आहे.'

प्रभाकरनें निराशेनें म्हटलें, 'काका, तुम्ही इतके दैववादी असाल, असें मला मुळींच वाटलें नव्हतें.'

'तसा अनुभव आला कीं माणूस आपोआपच दैववादी बनतो. लग्न ही ईश्वरानें–ईश्वरावर तुमची श्रद्धा नसेल तर कुठच्या तरी अदृष्टानें, नियतीनें, कुठचाहि शब्द तुम्ही वापरा–पण त्या कुणीतरी–बांधलेली निरगांठ आहे. आपण कुणाच्या घरीं जन्माला यावें हें जसें माणसाच्या हातीं नसतें तशीच लग्नगांठ त्याच्या हातीं नसते.'

माधवराव अशा कांहीं गंभीरपणें बोलत होते कीं त्यांच्या आयुष्यांतला एकादा प्रसंग त्यांच्या नजरेसमोर तरळत असावा असें त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें. त्यांच्याहि जीवनांत प्रेमाचा त्रिकोण येऊन गेलाय् कीं काय असा विचार एकदम सगळ्यांच्या मनांत चमकून गेला. पण त्यांचें जीवन, त्यांचा संसार, अत्यंत आदर्श नि सुखी दिसत होता. उणीव

काढायचीच झाली तर या पतिपत्नीच्या वयांत मात्र बरेंच अंतर होतें. माधवरावांच्या मानानें मनोरमाबाई तरुण, चाळीस वर्षांच्या दिसत होत्या. हें त्यांचें दुसरें लग्न आहे कीं काय हें कुणालाच माहीत नव्हतें. कदाचित् त्यांचा प्रेमभंग झाल्यावर फार उशीरां त्यांनीं हें लग्न केलें असावें असा तर्क आतां सगळ्यांच्या डोक्यांत उमटूं लागला.

घाणेकर वकिलांनीं म्हटलें, 'काका आम्ही तसें खोलांत शिरणें अगर आपल्या खाजगी आयुष्यांत डोकावणें योग्य नाहीं, पण आपण जें आतां विधान केलेंत त्याला आपणांजवळ स्वतांचा पुरावा आहे का? जन्ममरण माणसाच्या हातांत नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे, पण लग्न ही गोष्ट सर्वस्वी माणसाच्या हातांतली आहे असें आम्हां सर्वांनाच वाटतें.'

माधवरावांनीं हंसून म्हटलें, 'वा! अगदीं वकील शोभतां खरे. खाजगी आयुष्यांत शिरणें योग्य नाहीं म्हणत पुरावा मागतां आणि या पुराव्याच्या आधारें खाजगी आयुष्यांत शिरूं पाहातां.'

माधवराव इतक्या खिलाडूपणें बोलत होते कीं ते आतां आपल्या आयुष्यांतला एकादा 'रोमहर्षक' प्रेम-प्रसंग सांगतील असें सर्वांना वाटलें.

तेवढ्यांत नोकर चहा व खाद्यपदार्थांचा ट्रे घेऊन आला, नि नित्य-क्रमाप्रमाणें मनोरमाबाईहि त्याच्या मागोमाग बाहेर आल्या. त्या गहूं वर्णाच्या, रेखीव चेहऱ्याच्या नि नीटस बांध्याच्या होत्या. त्यांची प्रौढ पण रेखीव मूर्ति पाहाणाराच्या मनांत आदर उत्पन्न करणारी होती. त्या गप्पांत नि ब्रिजच्या खेळांत भाग घेत असत. त्या येऊन बसल्या नि चहाचे कप भरूं लागल्या. पत्नीकडे पाहात माधवरावांनीं म्हटलें, 'आमच्या सौभाग्यवतीची परवानगी असेल तर हा पुरावा सांगायला हरकत नाहीं.'

'कसला पुरावा?' त्यांच्या पत्नीनें विचारलें.

'माणसाच्या लग्नाची निरगांठ परमेश्वर बांधतो, लग्न ही एक योगा-योगाची गोष्ट आहे असें मी म्हणतों आहें; त्याला हे वकीलसाहेब पुरावा दाखल करा म्हणताहेत.'

त्या हंसल्या. त्यांच्या प्रौढ चेहऱ्यावर लज्जेची चमक चमकून गेली. त्यांनीं म्हटलें, 'पुराव्याशिवाय कुठचीच गोष्ट सत्य मानायला वकील लोक तयार नसतात.

त्यांची ही संमति आहे असें पाहून माधवराव म्हणाले, 'पुरावा दाखल करायचा म्हणजे माझें जीवनचारित्रच आज तुम्हांला सांगावें लागणार.'

त्यांनीं असें म्हणतांच श्रीधर, पद्माकर रेडिओजवळून उठून त्यांच्या-जवळ बैठकीवर येऊन बसले. सगळ्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकता उमटली. माधवरावांनीं सुरुवात केली.

'त्या वेळीं मी पुण्याला एंजिनिअरिंग कॉलेजमध्यें पहिल्या वर्षांत शिकत होतों. दिवाळीच्या रजेंत बुलढाण्याला मी माझ्या मावशीकडे गेलों होतों. माझा मावसभाऊ अनंत माझ्याच वयाचा असल्यामुळें दोघांनीं मिळून भटकण्यांत, गप्पा मारण्यांत आमचा वेळ मोठा मजेंत जात होता.

एक दिवस शेजारच्या खेड्यांत कसलासा उत्सव होता, त्यानिमित्त तिथें दरवर्षीं मोठी जत्रा भरत असे. आम्हाला कांहींच उद्योग नसल्या-मुळें आम्ही दोघें जत्रेला गेलों. एका नदीच्या किनारीं वसलेलें तें खेडें मोठें निसर्गरम्य होतें. नदीच्या किनाऱ्यांवरील मैदानांत जत्रा भरली होती. जत्रेंतून आम्ही दोघें खूप भटकलों. दुपारीं उन्हानें डोकें आणि भुकेनें पोट तापलें. तेव्हां मग एकादी छाया असलेली निवान्त जागा शोधूं लागलों. नदीच्या खालच्या बाजूला एक टेकडी दिसत होती. त्यावर एक छोटें मंदिर नि पिंपळाचा पार दिसत होता. ती निवान्त जागा बघून आम्ही तिकडे गेलों. पारावर एक जटाधारी साधु बसलेला होता. आम्ही त्याच्यापासून दूर मागच्या बाजूला पारावर बैठक मांडली आणि जत्रेंत खरेदी केलेले खाद्यपदार्थांचे पुडे सोडले. जत्रेंतले कांहीं लोक त्या साधूला भविष्य विचारीत बसले होते. आमचें खाणें नि गप्पा चालल्या होत्या. मधून मधून त्या साधूच्या भविष्यकथनाकडेहि लक्ष देत होतों. आमचें खाणें नि गप्पा संपल्या, तेव्हां मग झाडाच्या बुंध्याचा लोड करून आम्ही विश्रांति घेत खालीं सभोंवार पसरलेल्या जत्रेकडे डोळ्याच्या दुर्बिणींतून पाहात स्वस्थ बसलों.

मीं जरा डोळे मिटले. तेवढ्यांत अनंतला काय लहर आली कोण जाणे ! त्यानें मला हलवून म्हटलें, 'अरे चल. आपणहि त्या साधूची जरा गंमत करूं या. ते एकटेच डोळे मिटून ध्यानस्थ बसले आहेत.'

'जाऊं दे रे ! त्याच्या वाटेला कशाला जातोस ? बसूं दे बिचाऱ्याला स्वस्थ ! लोक येऊन त्याला आधींच त्रास देताहेत, त्यांत आणखी आपली भर कशाला ?'

पण माझ्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून तो उठला, नि माझा हात धरून ओढीत त्यानें म्हटलें, 'चल रे, जरा भविष्य विचारूं या.'

'माझा भविष्यावर विश्वास नाहीं. माणसाचें भविष्य त्याच्या तळहातावर नसून मनगटांत असतें. मी दैववादी नाहीं. मला—'

'तें व्याख्यान मग घरीं जातां जातां रस्त्यानें ऐकेन. माझाहि ज्योतिषशास्त्रावर विश्वास नाहीं. पण जरा गंमत म्हणून विचारूं या.'

आम्ही दोघे साधूजवळ गेलों. अनंतानें एकाद्या भाविक भक्ताचा आव आणून, 'साधूमहाराज' अशी हांक मारून त्या साधूला ध्यानमग्नावस्थेंतून जागें केलें आणि नम्रपणें म्हटलें, 'महाराज, आम्ही थोडें भविष्य विचारूं इच्छितों.'

साधूनें त्याच्याकडे स्थिर नजरेनें पाहात म्हटलें, 'अच्छा !'

अनंतानें म्हटलें, 'साधुमहाराज, या माझ्या मित्राचा लग्नयोग केव्हां आहे ?'

मी अनंताला चिमटा घेतला. साधूनें माझ्याकडे आपादमस्तक पाहिलें नि तो गालांतल्या गालांत हसला. त्यानें म्हटलें, 'भाऊ हा मित्रासारखाच असतो. यांच्या लग्नाचा योग उशीरां आहे. आजपासून चौदा वर्षांनीं.'

अनंतानें आश्चर्य दर्शवून म्हटलें, 'चौदा वर्षांनीं ? म्हणजे चौतीसाव्या वर्षीं याचें लग्न होणार ?' आणि माझ्याकडे पाहून त्यानें डोळे मिचकावून म्हटलें, 'तुझ्या भविष्यांत पुनर्विवाह करण्याचा योग आहे असें हे साधुमहाराज म्हणतात. तुमच्या पुण्याला विधवांची ती एक कुठचीशी संस्था आहे ना ? तिथें—'

साधूनें मध्येंच आपल्या गंभीर आवाजांत म्हटलें, 'यांची लग्नगांठ एका कुमारिकेशींच बांधलेली आहे. पण आज ती चार वर्षांची बालिका

आहे. आणखी बारा वर्षांनीं ती लग्नाला योग्य होईल, त्या वेळीं या तुमच्या भावाचें लग्न होईल.'

हें भविष्यकथन ऐकून मला हंसूं आलें. पण गांभीर्य धारण करून मीं उठत म्हटलें, 'या भविष्याबद्दल मी आपला फार आभारी आहें.' भावाला म्हटलें, 'चल रे ऊठ. जाऊं या.'

गंमत करण्याच्या उद्देशानें अनंत आला होता, त्याच्या हातीं ही आयतीच गंमत आली; तेव्हां तो कशाला उठतो? त्यानें म्हटलें, 'वा ! काय अचूक भविष्य आहे आपलें साधुमहाराज! महाराज, आपण हिमालयांतून आम्हां अज्ञ जनांसाठीं इथें आलेले दिसतात. बरें महाराज; माझ्या मित्राची ही बालपत्नी सध्यां जगाच्या कुठच्या भागांत वास्तव्य करते आहे हें आपण आपल्या दिव्यदृष्टीनें बघून आम्हांला सांगाल तर आमच्यावर कृपा होईल.'

अनंताच्या बोलण्यांत त्याचा टिंगलपणा स्पष्ट दिसत होता. पण तो साधु हंसला. त्याच्या स्थितप्रज्ञ अवस्थेला अनुसरून तो हंसला कीं त्याची ती एक विशिष्ट लकब होती कोण जाणे! त्यानें म्हटलें, 'तें योग्य वेळीं कळेलच.'

अनंतानें म्हटलें, 'नाहीं नाहीं. साधुमहाराजांच्या दिव्यदृष्टीच्या साक्षात्काराचा कृपाप्रसाद आम्हांला आतांच मिळाला पाहिजे.'

साधु थोडा वेळ स्तब्ध राहिला. नंतर त्यानें समोर जत्रेकडे नजर लावली आणि अनंताला म्हटलें, 'तीं समोर मोठमोठ्या खेळण्यांचीं रांगेनें दुकानें आहेत–'

भविष्यकथनाचा धागा सोडून हा मध्येंच खेळण्याच्या दुकानांत कुठें शिरला हें आम्हांला कळेना. आम्ही दोघें एकदम उद्गारलों, 'हो, दिसताहेत. पण त्यांचें काय?'

दुकानांवरची नजर न हलवतां त्यानें म्हटलें, 'तें मधलें दुकान दिसतें आहे. तांबडें लुगडें नेसलेली बाई बसली आहे, तिच्याजवळ ती जी छोटी बालिका दिसते आहे तीच याची पत्नी होणार आहे.'

हा साधु निश्चित वेडसर आणि गांजेकस असला पाहिजे याविषयीं आम्हांला आतां शंका उरली नव्हती. नाहींतर असा साक्षात्कार दुसऱ्या

कोणाला होणार? झाली एवढी गंमत पुरे वाटून आम्ही उठलों आणि टेकडी उतरून नदीच्या बाजूला भटकायला गेलों.

सूर्य खालीं उतरूं लागला तसे आम्ही नदीवरून परतलों आणि घरीं जाण्यासाठीं जत्रेच्या बाजूला वळलों. संध्याकाळ होत आल्यामुळें लोक घरीं परतण्याच्या धांदलींत होते. जत्राहि उठण्याच्या तयारींत होती. त्या पारावर तो साधु आतां दिसत नव्हता. अभावितपणें आमची नजर त्या बाईच्या दुकानाकडे गेली. साधूनें निर्देश केलेली ती बालिका हातांत एक खेळणें घेऊन पेटीवर बसली होती.

अनंतानें मला डिवचून म्हटलें, 'माधव, त्या साधूची भविष्यवाणी खरीहि व्हायची. कांहीं नेम नाहीं. कारण माझी आई म्हणते, साधुर्ध्यांच्या आशीर्वादांपेक्षां त्यांचे शापच खरे ठरतात.'

मीं चिडून म्हटलें, 'मग त्याला डिवचायला, धडपडायला तूं गेला होतास कशाला?'

मी चिडलेला पाहून त्यानें हंसून म्हटलें, 'अरे तो असें माथेफिरू-सारखें कांहीं बोलणार आहे हें मला कळतें तर तुझें भविष्य मींच सांगितलें असतें कीं! जाने दो'

साधूनें माझी हेटाळणी केली होती हें उघड दिसत होतें, ती सुद्धां मी अगदीं स्वस्थ बसलों असतांना. त्याला चिडवणारा अनंत राहिला बाजूला आणि माझी निष्कारण हेटाळणी? त्या साधूची मला आतां विलक्षण चीड आली. अनंताचाहि राग आला. मी झटकन् खालीं वांकून लिंबाएवढा एक दगड उचलला आणि नेम धरून पेटीवर खेळणें घेऊन बसलेल्या त्या छोट्या बालिकेला जोरांत मारला. कां मारला तें मला कळलें नाहीं. आजहि इतक्या वर्षांनंतर त्या माझ्या कृतीचा मला उलगडा होत नाहीं. त्या दुकानाभोंवतीं गर्दी जमलेली नि आरडा-ओरड होत असलेली आम्हीं पाहिली. आम्ही दोघे लगबगीनें सायकली ठेवल्या होत्या तिकडे गेलों आणि सायकलस्वार होऊन घर गांठलें.

ज्योतिष्यांविषयीं माझें मत फारसें चांगलें नव्हतें आणि या प्रसंगानंतर तें अगदींच कडू बनलें. सुटी संपल्यावर मी पुण्याला परत आलों आणि

तो प्रसंग विसरून गेलों. माझा शिक्षणक्रम उत्कृष्ट तऱ्हेनें पार पडला, आणि पास झाल्याबरोबर मला नोकरीहि मिळाली. मुलगा मिळवता झालेला पाहून माझे आईवडील वधूसंशोधनाला लागले. बऱ्याच पत्रिका आणि मुलींचे फोटो बघितल्यावर शेवटीं त्यांनीं बेळगांवची एक मुलगी पसंत केली. मलाहि ती पसंत होती. देणेंघेणें सर्व ठरलें. पण मुहूर्त ठरण्यापूर्वींच ती टायफॉइडनें आजारी पडली आणि त्यांतच तिचा अंत झाला. माझ्या पत्रिकेंत खडतर मंगळ तर नाहीं ना, अशी इतर वधू-पित्यांनीं शंका प्रदर्शित केली. हो! नाहींतर लग्नापूर्वींच नियोजित वधूचा मृत्यु कां व्हावा?

त्यानंतर वडिलांच्या पोटाच्या ऑपरेशनमुळें आणि आईच्या दुखण्या-मुळें दोन वर्षें माझ्या लग्नाचा विषय घरांत पुन्हां निघालाच नाहीं. दोघेहि प्रकृतीनें पूर्ववत् झाल्यावर आमच्या घरांत पुन्हां मुलींच्या पत्रिका आणि फोटो येऊं लागले. या खेपेला नाशिकच्या एका वकिलाच्या मुलीचे ग्रह बलवत्तर ठरले. ही मुलगी बेळगांवच्या मुलीपेक्षां रूपानें चांगली होती. सर्वांना—अर्थात् मी धरून—पसंत पडली. हुंडा, मानपानाचा वज्रलेख तयार झाला. मुहूर्तहि ठरला. पत्रिका छापायला टाकायच्या त्याच दिवशीं नेमके वडिलांचे मुंबईला असणारे एक स्नेही आमच्याकडे आले. लग्नाची बातमी अर्थातच त्यांना कळली. हे गृहस्थ अगदीं स्पष्टवक्ते होते आणि फटकळपणाबद्दल प्रसिद्ध होते. त्यांनीं मागचा पुढचा विचार न करतां ताडकन् वडिलांना विचारलें, ‘काय रे, मुलगी डोळे उघडून नीट बघितली आहेस ना?’

वडिलांनीं घाबरून विचारलें, ‘कां? काय झालें? मुलगी आम्ही सर्वांनींच बघितली. तिच्यांत कोठेंहि खोड काढायला जागा आहे असें आम्हांला दिसलें नाहीं.’

‘झाकल्या जागेवरचें कोड तुम्हाला कसें दिसणार?’

अंगावर पाल पडावी तसें आई भयानें किंचाळली, ‘कोड? कोड आहे मुलीला? अग बाई! अन् तें कुठें? काय बाई तरी माणसें! मेल्यांनीं कांहींच कळूं दिलें नाहीं आम्हांला.’

मित्रवर्य म्हणाले, 'मुलीच्या गुढग्याखालीं दोन्ही पायांवर कोड आहे.'

झालें! कोडाचा हा मोठा खोडा घातल्यावर लग्न कसें पार पडणार? मीं आईला माडीवर नेऊन हलकेंच म्हटलें, 'आई मुलीला कोड असलें म्हणून बिघडलें कुठें?'

तिनें चिडून म्हटलें, 'कोडाची मुलगी घरांत आणूं? अन् मग पुढें तुझीं मुलें कोडवालीं होतील ना?'

तिच्या त्या उद्गाराचा मला राग आला. मीं चढ्या आवाजांत म्हटलें, 'मला कोड झालें असतें तर मी लग्नाशिवाय राहिलों असतों का? अन् मग माझीं मुलें नसतीं का कोडवालीं झालीं?'

आई त्राग्यानें म्हणाली, 'माधव, तूं लग्नासाठीं उतावळा झालायस् म्हणून काय कोडवाली मुलगी जाणून बुजून गळ्यांत बांधून घेऊं? तुझें वाशिंगत्रळ खडतर त्याला कोण काय करणार ? ती मुलगी तुझ्या मनांत भरली असेल, पण तिच्यापेक्षां दुसरी चांगली मुलगी मिळेल. या योगायोगाच्या गोष्टी असतात. जरा धीरानें घे.'

कांहीं न बोलतां मी कपडे चढवून बाहेर निघून गेलों. मला आईचा संताप आला होता. अनेक कारणांसाठीं तिची चीड आली होती. पहिली गोष्ट म्हणजे मी लग्नासाठीं बिलकुल उतावीळ झालों नव्हतों. ती मुलगी माझ्या मनांत भरली होती कीं नाहीं तें निश्चित सांगतां येत नाहीं, पण तिच्याविषयीं आतां अनुकंपा मात्र वाटूं लागली होती, आणि म्हणूनच मीं तिच्याशीं लग्न करण्याचा आग्रह धरत होतों. पण माझ्या हेतूचा असा विपर्यास खुद्द माझ्या आईनें करावा याचा मला सन्ताप आला.

शेवटीं तें लग्न मोडलें. या एकंदर प्रकारानें माझें मन उद्विग्न झालें होतें. मीं खटपट करून एकदम दूर सिंधमध्यें माझी बदली करून घेतली आणि लग्नाच्या प्रकरणावर पडदा टाकला. दर दोन तीन वर्षांनीं रजा घेऊन घरीं आलों कीं आईवडिल मुलगी बघण्याची गोष्ट काढीत. मी कटूपणें आईला म्हणे, 'आई, लग्नासाठीं मी उतावीळ झालों नाहीं. जी कोणी मुलगी माळ घेऊन वाट पाहात उभी आहे ना ती माझ्या दाराशीं येईपर्यंत लग्नाच्या भानगडींत पडायचें नाहीं असा मीं निश्चय केला आहे.'

अनुक्रम
विभाग
क्रमांक

# निरगांठ

माझा वाक्प्रहार तिला कळे नि ती गप्प बसे. पण दुसरे दिवशीं पुनः म्हणे, 'हे फोटो आले आहेत, ते तर नजरेखालीं घाल!'

माझ्या वाक्प्रहारानें झालेल्या तिच्या जखमेवर फुंकर घालण्यासाठीं मी हंसून थट्टेनें म्हणे, 'अग आई, ती मुलगी तुझ्यापुढें प्रत्यक्ष उभी राहिल्यावर फोटो बघण्याची काय जरुरी? जरा धीरानें घे.'

माझ्या या बोलण्यामुळें आईला अलीकडे असें वाटूं लागलें होतें कीं सिंधमध्यें कोणातरी मुलीवर माझें प्रेम बसलें आहे. पण आपली ही शंका ती बोलून दाखवीत नसे.

असें होतां होतां सात वर्षें उलटलीं. आणि मग एके दिवशीं—'

एवढें बोलून माधवराव थांबले. वेगांत तालावर चाललेली गाडी धक्का देऊन मध्येंच एकदम थांबावी तसें त्यांच्या भोंवतालीं जमलेल्या मंडळींना वाटलें. प्रभाकरनें उतावीळपणें म्हटलें, 'मग पुढें काय झालें? एके दिवशीं...पुढें?'

माधवराव हंसले आणि म्हणाले, 'जरा धीरानें घ्या.' आणि आपल्या सौभाग्यवतीकडे दृष्टि टाकून त्यांनीं म्हटलें, 'पत्नीची स्तुति तिच्या तोंडावर करूं नये असा एक सूज्ञ दण्डक आहे, पण ती पाळी तुम्ही आतां माझ्यावर आणणार.'

मनोरमाबाई हंसल्या. सलज्ज झाल्या आणि कसल्यातरी कामाचें निमित्त सांगून त्या उठून घरांत गेल्या.

माधवरावांनीं कथा पुढें सुरू केली; 'एक दिवस मी आजारी पडलों. सिव्हिल सर्जनची ट्रीटमेंट चालू होती. ते नुकतेच सहा महिन्यापूर्वीं बदली होऊन तिथें आले होते. परप्रान्तांत, स्वप्रान्तीयांना एकमेकांविषयीं विशेष आपलेपणा वाटतो. त्यामुळेंच माझा नि डॉक्टरांचा स्नेह वाढला. त्यांच्या घरीं मी जाऊं लागलों. ते मला धाकट्या भावासारखे वागवीत. त्यांचे दोन मुलगे नोकरीनिमित्त मुंबईला होते. एका मुलीचें लग्न झालेलें होतें, दुसरी मुंबईला शिकत होती. धाकटा दहा वर्षांचा मुलगा, १६-१७ वर्षांची भाची आणि डॉक्टर पतिपत्नी, असें त्यांचें छोटेंसें कुटुंब होतें. त्यांच्या भाचीला पाहून वेगळेच भाव माझ्या मनांत निर्माण होऊं लागले.

पण माझ्यासारख्या ३४-३५ वर्षांच्या प्रौढ प्रथम वरानें एवढ्या लहान मुलीचा विचार करणें गैर आहे असेंहि मनाला वाटूं लागलें. पण कुठलीतरी विचित्र ओढ मनाला अस्वस्थ करूं लागली. रात्रंदिवस त्या मुलीची मूर्ति अकारण नजरेसमोर राहूं लागली. डॉक्टरांच्या घरचें जाणें येणें कमी केलें. पण ओढ कमी होण्याऐवजीं वाढूं लागली. एक दिवस डॉक्टरनीं स्वतःच आपल्या भाचीच्या लग्नाची गोष्ट माझ्याजवळ काढली तेव्हां मला आश्चर्य वाटलें आणि मी अत्यंत आनंदित झालों. पण मीं विचारपूर्वक म्हटलें, 'आपण मुलीची संमति घेतलीत का ? कारण वयांत फार अंतर पडतेंय. मी प्रौढ—'

त्यांनीं हंसून म्हटलें, 'मुलीनेंच हें सुचविलें आहे. तिचें आपल्यावर मन जडलें आहे असें वाटतें.'

सगळें निश्चित झाल्यावर मी आईवडिलांना तार करून बोलावून घेतले आणि मग सर्वांना पसंत पडलेली हुशार, चतुर, गुणी मुलगी मनोरमा, माझी गृहिणी बनून माझ्या बंगल्यांत राहायला आली.

मनोरमेची प्रत्येक गोष्ट मला आवडे, अर्थात् अजूनहि आवडते. पण पूर्वीं ती ज्या विशिष्ट पद्धतीनें केंस वळवीत असे तें वळण तिच्या चेहऱ्याला शोभत नाहीं असें मला वाटे. ती केसांची पट्टी कपाळावर विशेषतः डाव्या बाजूला खूप खालीं भुवईपर्यंत घेई. त्यामुळें आधींच अरुंद असलेलें तिचें कपाळ अधिकच चिंचोळें वाटे. एक दिवस मीं हें माझें मत तिला बोलून दाखविलें.

तिनें म्हटलें, 'इथें डाव्या बाजूला कपाळावर जखमेचा मोठा वण आहे, तो वाईट दिसतो ना म्हणून मी मुद्दाम असें वळण घेतें.'

बोलतां बोलतां तिनें केंस वर सरकवून तो वण दाखवला. मीं त्या वणाकडे पाहात हंसत म्हटलें, 'पण तुला आतां एकदां पसंत केलीच आहे. तुझ्या चेहऱ्याचें सौंदर्य कमी करणारी ही खूण दिसली म्हणून आतां माझ्या प्रेमांत उणेपणा येणार नाहीं. पण काय ग ? तूं तशी कांहीं धडपडी नाहींस, अगदीं शांत वृत्तीची आहेस. मग ही एवढी मोठी जखम तुला झाली कशी ?'

'लहानपणीं एका व्रात्य मुलानें मला दगड भिरकावून मारला होता. मला आठवत नाहीं, पण ज्यांच्याकडे मी मोठी झालें त्यांनीं मला हें सांगितलें. माझी कहाणी माझ्या मामांनीं तुम्हांला कधीं सांगितली नाहीं का?'

'कसली कहाणी?'

'माझ्या लहानपणीं रेल्वेगाडीला भयंकर मोठा अपघात झाला होता. त्यांत माझे आईवडील मृत्यु पावले. मी त्या वेळीं दोन वर्षांची होतें. त्या हलकल्लोळांत एका भल्या बाईनें मला आपल्या घरीं नेलें आणि माझा सांभाळ केला. मला फक्त मामाच होते. मी हरवल्यापासून त्यांनीं माझा सतत शोध चालवला होता. अन् मी आठ वर्षांची झालें तेव्हां त्यांना माझा शोध लागला. तेव्हांपासून मी त्यांच्याकडेच आहे. मला सांभाळणारी बाई अतिशय प्रेमळ नि भली होती. ती फळांचा व्यापार करीत असे. एकदां आमच्या गांवच्या जत्रेंत तिनें मला आपल्याबरोबर दुकानांत नेलें होतें. मी तेथें बसलें होतें. संध्याकाळीं जत्रा संपण्याच्या वेळीं कुणीतरी व्रात्य पोरानें दगड मारला. तिनें हंसून पुढें म्हटलें, 'त्या गर्दींत तो पळून गेला. पण माझ्या कपाळावर कायमचा वण ठेवून गेला.'

मीं हंसत म्हटलें, 'छेः! तो जातोय कुठें? तो व्रात्य मुलगा तुझ्याच समोर बसला आहे.'

माधवराव थांबले तसें प्रभाकरनें आपल्या खिशांत ठेवलेलें तें जाडजूड पाकीट काढलें आणि त्याचे तुकडे करून कोंपऱ्यांतल्या टोपलींत टाकले.

(कल्पना किंचित् परकी)

★

तीन

# बीजेची कोर

◇ ◇ ◇

तसें पाहिलें तर चंद्रकान्त कुळकर्णींचें स्थळ इतर सर्व दृष्टींनीं छानच होतें. दादरला स्वतःचा ब्लॉक अडीचशें रुपयांची वाढत्या पगाराची कायमची नोकरी. स्थळ खरेंच छान होतें; पण त्यांत दोन मोठीं वैगुण्यें होतीं. पहिलें वैगुण्य तो बिजवर होता नि दुसरें वैगुण्य त्याला दोन वर्षांची पाहिली एक मुलगी होती.

स्थळाचें वर्णन करतांना ताराच्या वडिलांनीं म्हटलें, ' अग, नांवालाच नुसता बिजवर. वय अवघें अठ्ठावीस वर्षांचें आहे. पंचविसाव्या वर्षी पहिलें लग्न झालें नि लागलीच दोन वर्षांनीं बायको वारली. त्याला झालें एक वर्ष–म्हणजे अठ्ठाविसावें वर्ष चालू. तसें बघितलें तर आजकाल प्रथम वरच मुळीं एवढ्या वयाचे असतात.'

वडिलांनीं पटकन् सोडवून दाखवलेलें त्याच्या वयाचें गणित अगदीं बरोबर होतें. वरच्या वर्गावर गणित शिकवणाऱ्या हेडमास्तरांचें गणित चुकेल कसें! पण गणितांत नुसत्या उत्तराला मार्क नसतात; रीतहि बरोबर लागते. अन् बिजवराची ही रीत ताराला अगदीं पसंत नव्हती. वय लहान असलें म्हणून काय झालें? बिजवराचा डाग तर लागलेला आहे ना? डागानें आकाशांतल्या चंद्राला शोभा येत असली तरी त्यानें वैवाहिक जीवनाला विद्रूपता येते. अन् समजा, तोहि डाग चालवून घेतला असता;

पण सापत्य बिजवर—ॲसिडचा दाहक डाग! साऱ्या जन्मभर ही दाहकता कशी सहन करायची? आपल्यासारख्या सुशिक्षित पदवीधर कन्येला सापत्य बिजवर? शीः! पण बाबांना मुलगी उजवून टाकायची झालीय् घाई, तेव्हां आपल्या भावनांकडे बघायला वेळ आहे कुठें त्यांना! त्यांचें मन धावतेंय व्यवहारामागें!

तिचें मन आंतल्या आंत सारखें धुसफुसत होतें. पण तिला बघायला आलेल्या चंद्रकांतला तिनें जेव्हां पाहिलें तेव्हां तिचा राग बराच शांत झाला. तिच्या शोधक, चोखंदळ दृष्टीलाहि बिजवराचा डाग किंवा त्याची छाया ओझरतीसुद्धां चंद्रकान्तांत कुठें दिसली नाहीं. एक वैगुण्य पुसट झालें. पण दुसरें? अन् त्याचीच तर दाहकता जास्त होती. पहिलें वैगुण्य लपलें होतें, पण दुसरें छपविण्यासारखें नव्हतें. त्याचा डाग उघडा नि अढळ होता. सावत्र मुलगी! तिच्या कपाळाला आठ्या पडल्या पण—! पण सोडलें तर तिला प्रथमदर्शनींच पसंत पडलेला तरुण हातचा जात होता; नि धरलें तर सावत्र मुलीचा—त्या वैगुण्याचा डंख—भाल्याचें तीक्ष्ण टोक—टोचत होतें.

पण मग शेवटीं चंद्रकान्तची द्वितीय पत्नी म्हणून तिनें त्याच्या संसारांत पदार्पण केलें. गृहप्रवेश करतांना मनाचा एक कोपरा काजळलेला होताच. प्रेमळ सासूनें दारांतच नव्या सुनेचें स्वागत केलें. सुनेच्या स्वागतार्थ सारी जय्यत तयारी होती. संसाराची घडी बसलेलीच होती. अगदीं सुरेख नि सुसज्ज!

तिची सावत्र मुलगी—छोटी लता—ठाण्याला आपल्या आजीकडे होती. लग्नांत आली नसल्यामुळें तारानें तिला अद्याप पाहिलें नव्हतें. तिसऱ्या दिवशीं चंद्रकांत तिला घेऊन आला. दंवबिंदूंनीं टवटवलेल्या गुलाबपुष्पासारखा सतेज गुलाबी वर्ण, भिरभिरणारे काळेभोर डोळे, गुबगुबीत गाल, एवढीशी नाजुक जिव्हणी नि गोंडस शरीर—सारें कौशल्य खर्चून चित्रकारानें काढलेलें चित्रसुद्धां एवढें सुंदर नसेल. कौतुकाचीं फुलें तिच्या मनांत गोळा झालीं. पण आपली ही सावत्र मुलगी आहे याची दुसऱ्याच क्षणीं तिला जाणीव झाली. दिवाणखान्यांत चंद्रकान्ताच्या पहिल्या

बायकोचा मोठा रंगीत फोटो टांगलेला होता, त्याचीच छोटी प्रतिकृति आपल्यासमोर उभी असल्याचें तिला स्पष्ट दिसलें नि कौतुकाच्या फुलांचे क्षणांत तीक्ष्ण काटे झाले. मत्सराची लाट हृदयांत उसळली. पाठ फिरवून कपाळाला आठ्या घालून तिनें कामांत गुंतल्याचा बहाणा केला.

लतूनें काळ्याभोर डोळ्यांनीं नवीन व्यक्तीला नीट न्याहाळलें नि आजीच्या कुशींत शिरून विचारलें, 'आजी, कोण आलेंय् ग! कोण ग त्या बाई?'

आजीनें तिला कुरवाळीत म्हटलें, 'ती किनई, तुझी नवीन आई आहे. आई म्हणायचें हं तिला.'

लतू विचारांत पडल्यासारखी दिसली. तितक्यांत तारानें कपाळाला आठ्या घालून फणकाऱ्यानें म्हटलें, 'मी नाहीं कुणाची आई! मला नाहीं आई म्हणायचें!'

सासूबाईनें चमकून तिच्याकडे पाहिलें नि शान्तपणें म्हटलें, 'मग माई म्हणूं दे का?'

स्वरांतला कडवटपणा वाढवून तिनें म्हटलें, 'मी सावत्र आई आहें हें जगाला माहीत आहे. माई म्हणून सारखा डंका नको वाजवायला याचा.'

कटु बोलांची नि वाद घालण्याची संवय नसलेल्या सासूबाई गप्प बसल्या. नवीन सुनेच्या स्वभावाची ही विशिष्ट तऱ्हा बघून त्या अस्वस्थ झाल्या. आतांपर्यंत घरांत नांदत असलेली शान्ति, प्रसन्नता नष्ट होणार कीं काय अशी नसती शंका त्यांच्या मनांत डोकावून गेली.

अन् तारा तरी कुठें प्रसन्न होती? तिच्या दृष्टींत मत्सर दाटत होता, मनावर असूयेची काजळी चढत होती. घरांत, शेजारींपाजारीं लतूचें कौतुक होई. गोड, खेळकर, सुंदर मुलांचें कौतुक नेहमींच होत असतें. पण त्या कौतुकांतून भलतांच ध्वनि तिच्या मनांत निनादे. लतू मातृमुखी आहे, नाक कसें रेखीव, डोळे कसे सुंदर, सारें सारें थेट अगदीं आई-सारखें आहे, असें कोणीं म्हटलें कीं आपल्या सौंदर्यातलें वैगुण्य लोक टिपून दाखविताहेत असा उगीचच ताराला भास होई नि मत्सराची लाट मनांत उसळे. जगांतली सारी कटुता नि कांटेरीपणा सापत्न भावांत

सामावलेला असतो. सावत्र मुलाच्या जन्माला येणें पाप, सौंदर्यवान् असणें महापाप नि सुंदर आईचें साम्य घेऊन येणें तर भयंकर शाप !

वडील माणूस या नात्यानें सासूबाई शांतपणें संसाराची जबाबदारी सूनबाईला समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत. संसाराची जबाबदारी म्हणजे घरांतल्या साऱ्यांची जबाबदारी, सावत्र पोरीच्या खस्ता हाच जर अर्थ त्या उपदेशांतून निघूं लागला तर तिच्या सारख्या सुशिक्षित स्वतंत्र विचाराच्या मुलीला तें कसें पटावें ? ज्याच्या गळ्यांत तिनें माळ घातली होती फक्त त्याचाच संसार ती करावयास तयार होती. तो एकटाच तिला हवा होता. कोमल भावपुष्प, प्रेमाचा वर्षाव फक्त त्याच्यासाठींच होता.

गृहप्रवेश केल्याबरोबर नवऱ्याच्या पहिल्या संसाराच्या खुणा तिनें शक्य तितक्या पुसून टाकल्या होत्या. भरतकामाचे उत्तम नमुने असलेलीं कुशनकव्हरें, टेबलक्लॉथ्स्, पडदे, सर्व जुन्या पद्धतीचीं दिसतात या सबबीवर नाक मुरडून तिनें सारें काढून अडगळीच्या कपाटांत कोंबून टाकलें होतें. पूर्वीच्या सजावटींत कलात्मकताच नाहीं या सबबीवर घराचें स्वरूप बदलून टाकलें होतें. नवीन पत्नीला आनंदांत ठेवण्यासाठीं झटत असलेला चंद्रकान्त तिच्या मनासारखें करीत होता, तिला करूं देत होता. पहिल्या संसाराच्या साऱ्या खुणा तिनें पुसून टाकल्या, पण सावत्र मुलीची ही सजीव खूण ती कशी दृष्टीआड करणार ? चंद्रकान्तला मुलगी जराहि दृष्टीआड झालेली चालत नसे. त्याचें तें कन्यावेड पाहून ती मत्सरानें वेडी होई. सुरुवातीला मत्सर छुपा होता. मग हळुहळू इतरांच्या दृष्टोत्पत्तीस येण्याइतका उघड होऊं लागला. प्रत्येक कृतींत, बोलण्यांत सापत्न भाव स्पष्ट दिसूं लागला. घरांतली शांति कायम टिकावी म्हणून सासूबाई शक्यतों तिच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करीत. पण पुष्कळ वेळां मर्यादेबाहेर जाई अन् मग सासू-सुनेचे खटके उडत. हे खटके दुपारीं चंद्रकांतच्या पश्चात्, तो ऑफिसमध्यें असतांनाच उडत. संध्याकाळीं त्याच्या येण्याच्या वेळीं वातावरण शांत असे. पण लढाईच्या खुणा लढाई संपल्यावरहि दिसतात. संध्याकाळीं तो घरांत पाऊल टाकी तेव्हां त्या शांत, निस्तब्ध वातावरणांत, मनाला उदास, बेचैन करणारी विचित्र गूढता भरल्याची त्याला जाणीव होई. नेहमीं जिन्यावरून हाक मारतांच,

आवाजासरशी धाव घेऊन ' पप्पा ' ' पप्पा ' म्हणून त्याला अत्यानंदानें बिलगणारी लता कोपऱ्यांत कुठें तरी केविलवाणें तोंड करून मुसमुसत बसलेली दिसे. पत्नीच्या तोंडाला मुरड नि कपाळावर आठ्याचें जाळें उमटलेलें असे. आईच्या नेहमींच्या शांत चेहऱ्यावर उदास गांभीर्य पसरलेलें दिसे. मग तो लतेला कोपऱ्यांतून उचलून कुरवाळून विचारी, ' काय झालें लतू ? '

' माझ्याशीं ताई भांडली नि मला मारलें ' मायेच्या उबेनें दुःखाचे कढ बाहेर पडत. तिचे टपोरे डोळे पाण्यानें भरून येत. ते अश्रु पाहतांच त्याच्या हृदयांत कालवाकालव होई. बायकोला बोलण्यासाठीं कठोर शब्द गळ्याजवळ गोळा होत. पण लगेच ते गिळून, लतूचे डोळे पुसून, हंसून लतूची समजूत घालीत तो म्हणे, ' ताई ना ? वेडी आहे अगदीं. मी तिला रागावेन हं. आपण तिला चॉकलेट द्यायचेंच नाहीं.'

त्या बाल मनाची समजूत पांच मिनिटांत पटे. पण पत्नीच्या ओठांची मुरड नि आठ्यांचें जाळें घालवायला पांच तासहि पुरत नसत. निद्रादेवीला दूर ढकलून आपल्या देवतेला जवळ घेऊन तिची आराधना करण्यांत अर्धी रात्र निघून जायची. अन् कानांजवळ चाललेली चहाड्यांची गुणगुण ऐकण्यांत कधींकधीं पहांट व्हायची. एकदां असेंच चहाड्यांचे डास गुणगुणत असतां त्यानें म्हटलें, ' तारा, तूं तशी शहाणी, समजूतदार, शिकलेली आहेस. घरांत रोज उठून अशीं भांडणें नि धुसफूस असणें चांगलें का ? माझ्याशीं तूं किती प्रेमानें वागतेस ? मग तुला लतूशीं तसें कां बरें वागतां येऊं नये ? लतू आपलीच मुलगी ना ? '

' शहाण्या, शिकलेल्या मुलींनाहि भावना असतात हें मान्य आहे ना तुम्हांला ? ' अंधारामुळें तिचा चेहरा दिसत नव्हता, पण तिच्या स्वरांतला उपहास चांगलाच उमगून येत होता.

त्यानें म्हटलें, ' बरें मग ? '

' मग मी तुम्हाला असें विचारतें, तुमच्याशीं माझा पुनर्विवाह झाला असता, मला पहिली मुलगी असती, तर आज तुम्ही लतूवर जसें प्रेम करतां तसें माझ्या मुलीवर केलें असतें का ? '

प्रश्न भावनेला धक्का नि विचारांना चालना देणारा होता खरा !

तो बिनतोड प्रश्न विचारल्यापासून घरांतील तक्रारींकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन बदलला. ‘ कुणाची बाजू खरी ? ’ असा पूर्वी मनाचा सारखा गोंधळ उडायचा तो आतां थांबला. पत्नीची बाजू सूर्यप्रकाशा-इतकी स्वच्छ दिसूं लागली. पण त्या सूर्यप्रकाशांत ग्रीष्माचा ताप असल्याचा त्याच्या आईला भास होऊं लागला. पुढें पुढें त्या तापाची प्रत्यक्ष झळ लागूं लागली. पूर्वी ‘ आई की पत्नी ? ’ अशा दोलायमान स्थितींत असलेला न्यायाचा काटा पत्नीच्या पारड्याकडे प्रमाणाबाहेर झुकूं लागला. भक्तीपेक्षां प्रणयाचें पारडें नेहमींच जड असतें.

अन् एक दिवस चांगला भडका उडाला. कारण तसें कांहीं मोठें नव्हतें. रविवार होता त्या दिवशीं. आई स्वैपाकांत गुंतली होती. तितक्यांत लतू संडासांत जाऊन आली. चपात्या लाटतां लाटतां सासूबाईंनीं सुनेला हांक मारली.

‘ जरा लतूला धू ग.’

‘ शी: ! मी नाहीं धूत, मला घाण वाटते.’

पोळपाट बाजूला सारून न्हाणीघराकडे जात त्यांनीं म्हटलें, ‘ उद्यां तुला मुलें झालीं म्हणजे धुशील कीं नाहीं ? ’

नवऱ्याचा पाठिंबा मिळाल्यापासून ताराचे शब्द नि स्वर बदलले होते. तिनें उद्धटपणें म्हटलें, ‘ तें माझें मी बघेन ! ’

सासूबाईंनीं म्हटलें, ‘ मुलांची एवढी घाण वाटते तर लग्न कशाला करावें ? ’

‘ दुसऱ्याच्या मुलांच्या खस्ता खाण्यासाठीं नि त्यांना धुण्यासाठीं लग्न केलें नाहीं मीं.’

‘ दुसऱ्याची ? लतू कांहीं शेजारच्यांची नाहीं. चन्द्रकान्तचीच मुलगी आहे ती. त्याला मुलगी आहे हें माहीत होतें ना ? लग्न करण्यापूर्वीं विचार करायचा होतास. ’

बाहेर दिवाणखान्यांत चन्द्रकांतच्या कानीं हें बोलणें पडत होतें. तो चटकन् आंत आला नि त्रासिकपणानें म्हणाला, ‘ आई, निष्कारण वाद

काय वाढवतेस ? एवढ्या क्षुल्लक गोष्टींत ही कसली खिसखिस ? तिला नसतील कांहीं गोष्टी करायला आवडत. नाहीं तरी लतूच्या बाबतींत ताराकडे बघण्याची तुझी दृष्टीच दूषित झालेली आहे. दुसऱ्यांच्या भावनांचा विचार करीत नाहींस तूं. सावत्रपणाचा अनुभव तुला कुठें आहे ? तुला सावत्र मूल असतें म्हणजे कळलें असतें.'

मुलाचें भाष्य त्यांनीं निमूटपणें ऐकून घेतलें. दीर्घ निःश्वास टाकून त्यांनीं म्हटलें, 'खरें आहे बाबा तुझें म्हणणें !'

अन् मुकाट्यानें हात पुसून त्यांनीं पोळपाट पुढें ओढला. बाहेर दिवाणखान्यांत जातांजातां त्यानें म्हटलें, 'असेच रोज तुमचे वाद होऊं लागले तर तुमचें दोघींचें एकत्र राहणें किंवा जमणें मोठें कठीण जाणार.'

हें शेवटचें वाक्य त्यांच्या जिव्हारीं लागलें. त्यांतून ध्वनित होणारा अर्थ त्यांना स्पष्ट कळला. मुलाचें कठोर बोलणें उभ्या आयुष्यांत आज प्रथम त्या ऐकत होत्या. त्यांना जेवण गोड लागेना, रात्रीं झोंप येईना. पण त्यांच्या स्वभावानुसार त्यांनीं आपल्या चेहऱ्यावरची शांति अगर गांभीर्य ढळूं दिलें नव्हतें. चारपांच दिवसांनंतर मुलगा खुशींत आहे असें पाहून त्यांनीं म्हटलें, 'चंदू, नाशिकला थोडे दिवस जाऊन यावें म्हणतें मी. रामभाऊची तिथें बदली झाल्यापासून सारखा बोलावतो आहे ना तो ?'

गोष्ट खोटी नव्हती. गेल्या सहा महिन्यांत त्यांच्या भावाचीं तीनचार पत्रें आलीं होतीं. त्यांनीं पुढें म्हटलें, 'बऱ्याच वर्षांत तो भेटलेला नाहीं. त्याची भेट होईल नि अनायासें यात्राहि होईल. लतूलाहि दोन दिवस बदल होईल.'

दोन दिवस जाऊन येतें असें त्यांनीं म्हटलें खरें; पण प्रवासाची तयारी दीर्घ काल मुक्कामाची दिसत होती. ती तयारी पाहून ताराचें मन सुखावलें होतें अन् त्यांना पोंचवायला चंद्रकान्तबरोबर स्टेशनवर ती मोठ्या उत्साहानें गेली. कधींहि दूर न झालेल्या आईला निरोप देण्याचा चंद्रकान्तचा हा पहिलाच प्रसंग होता.

त्यांनी म्हटलें, ‘ तारा, चंदू, जपून सांभाळून राहा–’ पुढचे शब्द गळ्यांत अडकले. दाटलेले अश्रु लपविण्यासाठीं त्यांनीं लतूचा फ्रॉक नीट करण्याच्या निमित्तानें खालीं मान घातली.

घरीं परततांना चंद्रकान्तचें चित्त कांहींसें जड नि उदास झालें होतें. ताराचें आनंदानें तरल बनलें होतें. आतां एकट्याच्या मालकीचें घर, अनिर्बंध सत्ता, संपूर्ण स्वातंत्र्य, मनगमतें वातावरण. वसंत ऋतूंत बागडणाऱ्या फुलपांखरासारखी ती त्याच्या भोंवतींभोंवतीं असायची. सुख नि शांति दोन्ही त्याला आतां भरपूर प्रमाणांत मिळत होतीं.

एक दिवस त्याला कसलीशी रजा होती. सबंध दिवसाचा कार्यक्रम दोघांनीं रात्रीच नक्की करून टाकला होता. कार्यक्रम ‘ तूं अन् मी ’ ना शोभेसा सुंदरच होता. पण सौंदर्याला कुठें तरी गालबोट लागावें तसें झालें. नेमकें त्याच दिवशीं तिच्या एका मैत्रिणीच्या पहिल्यावहिल्या मुलीचें बारसें निघालें. अन् जेवणाचें आमंत्रण तिला नाकारणें शक्यच नव्हतें. पण जेवण उरकून ती झटकन् दोन तासांत परत येणार होती. त्याचें जेवण उरकल्यावर ती मैत्रिणीकडे गेली. अन् ती येईपर्यंतचा वेळ घालविण्यासाठीं तो पुस्तक घेऊन आरामखुर्चींत पडला. माणूस एकटें असलें, कीं मन वाचनापेक्षां विचारांतच जास्त गुंततें. पुस्तकांतल्या शब्दांच्या ओळींत स्मृतिचित्रांच्या रांगा दिसूं लागतात. अशाच एका स्मृतिचित्रांत त्याला लतूच्या बारशाचा समारंभ दिसला. त्याच्या मागचे पुढचे प्रसंग नजरेसमोरून सरकले. पुस्तकावरून त्यानें नजर काढली ती सहज समोरच्या कॅलेंडरकडे गेली. आईला नि लतूला जाऊन बरोबर दीड महिना झाला होता. गेल्या दीड महिन्यांत सुख नि शांति त्याला भरपूर प्रमाणांत मिळालीं होतीं. पण त्या सुखशांतीच्या समाधानांत खोल कुठें तरी असमाधान होतें. लतूच्या गोड बोलांची, बाललीलांची त्याला आठवण होई, अवतींभंवतीं भास होई. पहांटे जाग आली, कीं सैंपाकघरांत आईची चाहूल नि स्टोव्हची फुरफुर ऐकूं आल्यासारखी वाटे. दुसऱ्या लग्नानंतर निर्माण झालेल्या अशान्त वातावरणाचा तो विचार करूं लागला. गेल्या दीड महिन्यांत हे विचार मधूनमधून त्याच्या मनांत येत अन् दर

वेळीं सापत्नभावाची स्वाभाविकता त्याला पटे. तो विचारांत मग्न असतांनाच बाहेर दारावरच्या घंटेचें बटन कुणीं तरी दाबलें. त्यानें दार उघडून पाहिलें, पोस्टमन दारांत उभा होता.

त्यानें दिलेला लखोटा चंद्रकांतानें घेतला नि त्यावर नजर टाकली. आईकडून आलेला पाहतांच तो आश्चर्यचकित झाला. दरवाजा बंद करून लखोटा फोडला नि खुर्चीवर बसून तो वाचूं लागला:—

चि. चंद्रकांत यास अनेक आशीर्वाद,

गेल्या आठवड्यांत खुशालीचें पत्र पाठवलें आहेच. आज हें पत्र!

इतिहासाची पुनरावृत्ति होते म्हणतात. निदान माझ्या आयुष्यांत ती झाली आहे. ती झाली नसती तर आज हें पत्र लिहिण्याचा प्रसंग माझ्यावर आला नसता. चंदू, त्या दिवशीं तूं म्हणालास, 'सावत्रपणाचा अनुभव तुझ्या हृदयाला कुठें आहे? तुला सावत्र मूल असतें म्हणजे कळलें असतें!' तुझे ते शब्द बाणासारखे माझ्या काळजांत घुसले, मर्मस्थानांत रुतले अन् जीवनांतला जो एक प्रसंग गेलीं अठ्ठावीस वर्षें हृदयांत खोल दडवून ठेवला होता त्यावरच नेमका आघात झाला. वेदना वाढली. ती जखम आज मी तुझ्यापुढें उघडी करणार आहें.

अठ्ठावीस वर्षांपूर्वींची गोष्ट. त्या वेळीं आम्ही पुण्याला होतों. हे तिथें ओव्हरसिअर होते. गांवच्या सीमेवर असलेल्या मोठ्या बंगल्यांत हे, मी अन् अडीच वर्षांची छोटी शरयू अशीं तीनच माणसें राहात होतों; पण संपत्ति नि प्रीति भरल्या हातानें नि हंसतमुखानें घरांत वावरत असल्यामुळें बंगला भरल्यासारखा वाटे. माझ्यावरचें यांचें अपार प्रेम पाहून माझीच आमच्या प्रेमाला दृष्ट लागेल कीं काय म्हणून भीति वाटायची. दिवस पळत होते. लग्नानंतर दीड वर्षांनीं शरयूचा जन्म झाला. हळूहळू त्यांच्या ऑफिसच्या कामाचा व्याप वाढला. शरयूनंतर अडीच वर्षांनीं मंदाकिनीचा जन्म झाला, तेव्हां तर ऑफिसच्या वाढत्या कामाबरोबरच यांची फिरतीहि सुरू झाली. रात्रीं घरीं यायला कधीं अकरा तर कधीं बारा व्हायचे नि महिन्यापंधरा दिवसांनीं एकदोन दिवसांची फिरती निघायची. हळूहळू फिरती वाढूं लागली. मी पुष्कळ वेळां चिडे. त्यांच्यावर

नव्हे, त्यांना इतकें काम देणाऱ्या साहेबावर नि त्यांच्या खात्यावर. मी चिडलें म्हणजे ते हंसून म्हणत, 'त्या साहेबाला बिचाऱ्याला मृदंगासारख्या दोन्हीकडून थपडा. सुरुवातीला सारा दिवस घरीं राहात होतों. तेव्हां म्हणत होतीस, कीं साहेब कांहीं कामच सांगत नाहीं का तुम्हांला ? अन् आतां करकुरतेस कीं साहेब वेळ देत नाहीं. ठीक ! '

अन् मग प्रेमभरानें म्हणत, 'आतां मला वरची मोठी जागा मिळणार आहे ना ? मग त्याप्रमाणें जबाबदारी, कामाचा व्याप वाढणारच !'

खरें होतें त्यांचें म्हणणें. मला सारें समजत होतें. पण हवा असलेला सहवास अगदीं अल्प काळ लाभायचा. मन असंतुष्ट झालें कीं चिडे. अर्थात् राग तात्पुरतां नि लटकाच असे. अलीकडे तेहि थोडेसे चिडखोर नि त्रासिक झाले होते. पण तें स्वाभाविक होतें. कामाच्या त्रासामुळें माणसाचा स्वभाव तसा बनतो.

एका खेपेची त्यांची फिरती खूप लांबली. सात दिवसांनीं स्वारी घरीं आली. येतांना दोन दिवसांची रजा घेऊन आले म्हणून ठीक; नाहींतर चांगलीच चिडणार होतें मी. रात्रीं निवांतपणें गप्पा मारतांमारतां मीं त्यांना म्हटलें, 'माझ्यावरचें तुमचें प्रेम अलीकडे कमी झालेंय. खरें ना ?'

ते एकदम दचकले. पण लगेंच हंसून म्हणाले, 'म्हणजे ? काय म्हणतेस तूं ?'

मीं हंसून म्हटलें, 'मी असें म्हणतें कीं पूर्वीसारखें संसारांत तुमचें चित्त आतां कांहीं रमत नाहीं. तुमचें चित्त उडालेंय.'

'कुणीं सांगितलें तुला ?'

बऱ्याच दिवसांनीं गप्पा मारायला मिळाल्यामुळें थट्टा करण्याची माझी लहर अनावर झाली होती. मीं म्हटलें, 'सांगायला नको कुणीं. पुरावा आहे माझ्याजवळ. दाखवूं ?' असें म्हणत मीं पोलक्याच्या खिशांत हात घातला नि म्हटलें, 'दुपारीं धोब्याला तुमचे कपडे देतांना तुमच्या कोटाच्या खिशांत हा पुरावा मिळाला.'

मी रेल्वे तिकिटें काढून हातांत धरून हंसत म्हटलें, 'संसाराचा वीट आल्याशिवाय कोणी पंढरपुरची वारी करतें वाटतें ? तुमच्या फिरतीच्या

भागांत पंढरपूर कांहीं येत नाहीं मला माहीत आहे. इश्श ! मला तरी बरोबर न्यायचें होतेत, म्हणजे जोडप्यानें दर्शन घेतलें असतें.'

तिकीट पाहातांच ते एकदम दचकले. त्यांचा चेहरा खर्रकन् उतरला. एकदम स्तब्ध झाले नि त्यांनीं खालीं मान घातली. कुठून चेष्टा केली असें झालें मला. मीं हलकेंच म्हटलें, ' रागावलांत ? '

त्यांनीं माझ्याकडे न बघतां नुसती मान हलविली. थोड्या वेळानें ते म्हणाले, ' उमा, माझ्या हातून एक अक्षम्य गुन्हा घडला आहे. मोठें पाप घडलेंय्.'

ते किती पापभीरू होते तें मला माहीत होतें. मीं म्हटलें, ' अस्स. कसलें एवढें पाप तें तरी कळूं दे.'

ते गंभीरच होते. विचारांत गढले होते. थोड्या वेळानें त्यांनीं म्हटलें, ' कसें सांगूं तुला, तुला कळलें तर तूं माझा तिरस्कार करशील.'

' तुम्ही कसेहि असलांत तरी माझे पति आहांत नि मला प्रिय आहांत. सांगा ना काय तें लवकर.'

ते स्तब्धच होते. कुठून कशी सुरुवात करावी या विचारानें ते गोंधळून गेले असावेत. इकडे माझी उत्सुकता पराकोटीला पोंचली होती. बऱ्याच वेळानें त्यांनीं म्हटलें, ' गेल्या वर्षीं माझ्या एका मित्राबरोबर–जोशीबरोबर–त्याची बहीण आपल्याकडे आली होती. आठवतें तुला ? '

मीं आठवण करून म्हटलें, ' कोण शकुन्तला ? '

त्यांनीं मान हालविली. नंतर म्हटलें, तिच्या मोहपाशांत मी सांपडलों नि शेवटीं भलत्याच मोहास बळी पडलों.'

तुटक रेषांवरून सुद्धां चित्राची कल्पना चांगली येते. त्यांच्या त्या तुटक वाक्यांवरून मी काय समजायचें तें समजलें. मनाला धक्का बसला. पण शांतपणें विचारलें, ' तिच्या भावी आयुष्याचें काय? ही जबाबदारी तुमच्यावर आहे.'

' गेल्या महिन्यांत पंढरपूरहून तिचा भाऊ तिला नागपुरला घेऊन गेला. पुढच्या आठवड्यांत जमशेदपूरला तिचें लग्न झालें. मीं अडीच हजार रुपये दिले.'

' मूल कुठें आहे.'

' पंढरपुरला अनाथाश्रमांतच.'

' काय आहे? '

' मुलगा.'

रात्रीं मी बिछान्यावर पडलें, पण डोळा लागेना. डोक्यांत विचारांचें काहूर उठलें होतें. कामाच्या सबबीखालीं यांचें रात्रीं-अपरात्रीं घरीं येणें, अवेळीं फिरत्या निघणें—सारा प्रकार आतां लक्षांत आला, हृदयाला जखम झाली. पण अशा जखमा मत्सरी विचारांनीं चिघळूं देण्यापेक्षां संयमानें दाबून सुकूं देण्यांतच शहाणपण असतें. माझें चित्त अनाथाश्रमांतल्या अर्भकाकडे लागलें. मन त्याचा विचार करूं लागलें. प्रत्यक्ष त्याचा पिता हयात असतांना त्यानें बेवारशासारखा सारा जन्म कां काढावा? माझें मातृहृदय अस्वस्थ झालें. मीं मनाशीं बेत केला. त्यांना सांगितला. सद्गदित होत ते म्हणाले, ' उमा, उमा, तूं दयेची देवता आहेस! '

मीं म्हटलें, ' मी कांहीं कुणावर उपकार का करतें आहें? तुमचा मुलगा तो माझा मुलगा नव्हे का? '

रात्रीं दोघांनीं बेत केला. दुसऱ्या दिवशीं पंढरपूरला जाऊन मुलाला घेऊन आलों. ' माझ्या मैत्रीणीचा मुलगा. बिचारी एकाएकी वारली. ' हें ठराविक वाक्य, कारुण्यपूर्ण स्वरांत मी चांभारचौकशी करणारांना सांगत होतें दोन महिन्यांचा मुलगा पण अगदींच अशक्त. अंगावरच्या दुधाशिवाय कसा सुधारावा? मंदा त्या वेळीं दहा महिन्यांची, चांगली सशक्त होती. तिचें पिणें तोडून मीं मुलाला पाजणें सुरू केलें. त्याच्या जोपासनेला रात्र अपुरी पडूं लागली. सुदैवानें लवकरच महिन्याच्या आंत आमची मुंबईला बदली झाली. मुंबईला पोंचल्यावर मात्र मुलाचें मातृत्व माझ्याकडे घेतलें. मंदाचें वय थोडें वाढवावें लागलें. शेजारणी म्हणत, ' भारीच बाई तुमचा पाळणा तोकडा अन् मुलगा नाहीं म्हणून सारें कोडकौतुक त्याचेंच. बिचारी मंदा राहते बाजूला. '

त्यांचें म्हणणें खरें होतें. वात्सल्याचा जेवढा वर्षाव करतां येईल तेवढा मी त्या मुलावर करीत होतें. पुढेंपुढें मंदा-शरयूपेक्षांहि त्याच्याकडे माझा

ओढा जास्त आहे असें मला वाटूं लागलें. होताहि मोठा गोड नि लाघवी. डोळे नि जिव्हणी बघितली, कीं एकदांच बघितलेली शकुंतला साकार नजरेसमोर उभी राही. चंदू, तूं यांच्या प्रेयसीचा मुलगा म्हणजेच माझा सावत्र मुलगा. पण असें मीं तुला कधीं तरी भासूं दिलें का?

चंदू, तूं म्हणतोस शिक्षणानें भावना विशाल होतात. कोण जाणे! पण कित्येक मुलींच्या बाबतींत त्या उलट संकुचित होतात. बुद्धीची खोली वाढते, पण भावनांची विशालता कमी होते. आजकाल जिकडे तिकडे प्रेम ऐकूं येतें, तें खरें प्रेम नसतें. खरें प्रेम घनदाट विशाल वटवृक्षासारखें असतें. ज्या प्रेमांत हृदयाची विशालता नाहीं, त्यागाची सखोलता नाहीं, उच्च विचारांची निर्मलता नाहीं तें कसलें प्रेम? प्रेम म्हणजे प्रणय नव्हे—वासनांचा गाळ सांचलेलें लहानसें डबकें नव्हे. ताराला तूंच दिसतोस; फक्त तूंच हवास. अशा तरुणींचें प्रेम बीजेच्या कोरीसारखें असतें. बीजेची कोर मोठी सुंदर दिसते, नाजूक असते, विलोभनीय वाटते पण सृष्टीला तजेला देण्याचें, उज्ज्वल करण्याचें सामर्थ्य त्यांत नसतें. तें पौर्णिमेच्या चंद्रांतच असतें, अन् जें प्रेम सारें जीवन उज्ज्वलित करतें तेंच खरें प्रेम!'

चंद्रकान्तला तें पत्र पुढें वाचवेना.

★

## चार

# उथळ पाणी

◇ ◇ ◇

**चहाबरोबर** गरमागरम साखरपोह्यांची भरलेली प्लेट शुभानें त्याच्यापुढें आणून ठेवली तेव्हां लोणकढ्या तुपांत तळलेल्या त्या पदार्थांचा खमंग वास खोलींत दरवळला. दिवसभराच्या श्रमानें त्याचें थकलेलें मन एकदम प्रसन्न झालें. असें खाणें अनपेक्षित पुढें आलें म्हणजे, बायको खूष आहे असें नसून, नवऱ्याला खूष करण्यासाठीं तिचा हा सारा खटाटोप असतो हें कुठल्याहि सूज्ञ नवऱ्याला सांगावें लागत नाहीं. दीर्घ श्वास घेऊन त्या खमंग सुगंधाचा शेखरनें आस्वाद घेतला. चमचाभर पोहे तोंडांत टाकून त्यानें हंसून म्हटलें, 'मागणी फार मोठी दिसते.'

ती हंसली : 'इश्श ! कांहींतरीच ! मागणी कसली असणार ?'

'तेंच मी तुला विचारतों आहें.'

'पण मी कांहीं मागणार आहें हें कशावरून ?'

प्लेटकडे दृष्टिनिर्देश करीत त्यानें म्हटलें, 'देवापुढें नैवेद्य ठेवला कीं त्याच्या पाठोपाठ गाऱ्हाणें आलेंच. आणि नैवेद्य जेवढा मोठा नि देवांच्या खास आवडीचा तेवढें मागणेंहि मोठें.'

तिनें हंसून पतिराजांकडे पाहिलें नि म्हटलें, 'मोठें नाहीं नि लहान नाहीं. दुपारीं वाण्याकडे सामान आणायला गेलें होतें. तिथें किनई सुरेख पांढरे पोहे दिसले. तुम्हांला साखरपोहे फार आवडतात...'

त्यानें मध्येंच म्हटलें, ‘साखरपोहे फार आवडतात, पण लांबलचक प्रस्तावना बिलकुल आवडत नाहीं. काय असेल तें आपलें चटकन् सांगून टाकावें.’

थोडा वेळ स्तब्ध राहून तिनें हलकेंच म्हटलें, ‘सांगू? हें पाहा–’

‘पाहणें दोन वर्षांपूर्वीच संपलेंय. आतां ऐकतों आहें. बोल काय तें.’

तिनें जरा भीतभीत लाडिकपणानें म्हटलें, ‘मी कॉलेजांत जाऊं का?’

त्यानें एकदम आश्चर्यानें तिच्याकडे पाहिलें.–प्रश्न अगदींच अनपेक्षित होता.–अन् मग विस्मयानें म्हटलें, ‘कॉलेजांत? म्हणजे हें कॉलेजचें वेड कुठून शिरलें तुझ्या डोक्यांत?’

त्याच्या प्रश्नापेक्षांहि त्या स्वरांत जो तीव्रपणा भरला होता त्यामुळें ती एकदम वरमली. तिनें म्हटलें, ‘वेड कसलें? माझ्या हौशीखातर का मी शिकायचें म्हणतें आहें? शिकून नोकरी केली तर–तर संसाराला मदत होईल. सध्यां खर्चाची किती ओढाताण होते आहे संसाराचा गाडा तुम्हांला एकट्याला ओढावा लागतो आहे. तेव्हां...’

त्यानें मोठ्यांदा हंसून चेष्टेनें म्हटलें, ‘तेव्हां हा भारावलेला गाडा ओढायला तूं मला मदत करणार आहेस? कांहीं वाईट नाहीं. उत्तमच! संसारगाडा ओढायला एका बाजूला एक बैल आणि दुसऱ्या बाजूला एक गाय . .’

तिनें चिडून मध्येंच म्हटलें, ‘पुरें झाली तुमची चेष्टा! बायको मिळवती असली तर अगदीं–’

त्यानें मध्येंच म्हटलें, ‘तर अगदीं फारच उत्तम! मिळवती बायको हें आजच्या पुरुषाचें भूषण आहे. मुलगी एक वेळ रूपगुणांनीं कमी असली तरी चालेल पण ती मिळवती असली पाहिजे, अशी विवाहेच्छु पुरुषाची प्रमुख अट असते. आपला प्रेमविवाह झालाय म्हणून. नाहींतर तूं मिळवती नाहींस या सबबीवर तुला नापसंत करणार होतों मी. शुभे, तूं आपल्या रूपगुणांनीं मला मोह पाडून माझें मोठें नुकसान केलेंयस बघ.’

आपल्या सौंदर्याच्या स्तुतीनें ती खुलली. पण थट्टा करतां करतां तो मूळ मुद्द्यापासून दूर जातो आहे असें पाहातांच मान उडवून फुरंगटून तिनें म्हटलें, ‘स्तुति पुरे झाली हं. नीट काय तें सांगा ना?’

उथळ पाणी

‘ तूंच ... हे शक्य आहे का ?’

‘ कां ? ... विचार करून पाहा ना ! संसार सांभाळून बायका शिकत ... हीत वाटतें ! मी कां शक्य नाहीं ? संसार सांभाळून शिकेन. तुमची यत्किंचितहि अडचण होऊं देणार नाहीं.’

‘ माझी अडचण राहूं दे ग. पण कॉलेजच्या खर्चाची अडचण कशी सोडवणार तूं ? ’

‘ मी केलाय त्याचा विचार. ती नको काळजी तुम्हांला. सध्यां माझे दागिने मोडून कॉलेजचा खर्च भागवायचा अन् मग मला नोकरी मिळाली कीं त्या पैशांत पुन्हां दागिने करतां येतील.’

तो मोठ्यांदा हंसला नि मान डोलावून त्यानें म्हटलें, ‘ छान ! फारच छान ! शिक्षणासाठीं दागिने मोडायचे नि दागिन्यासाठीं नोकरी करावयाची. विळा मोडून खिळा नि खिळा मोडून...वा ! काय अर्थशास्त्र आहे तुझें ! अर्थमंत्र्यांच्या जागा यापुढें तुम्हां बायकांनाच दिल्या पाहिजेत.’

त्या चेष्टेनें त्याचा नकार तिला स्पष्ट दिसत होता. ज्या आर्थिक अडचणीचा आपण एवढ्या गंभीरपणें विचार करतों आहोंत त्याची याला बिलकूल फिकीर नाहीं याचा तिला विषाद वाटला. तिनें संतापानें म्हटलें, ‘ मी जाणून होतेंच—तुम्ही कधीं कधीं हो म्हणणार नाहीं. जुनाट मतें आहेत तुमचीं. बायकोनें नोकरी करणें तुम्हांला कमीपणाचें वाटतें. बायकोनें नोकरी केली तर तुमच्या पुरुषी अहंकाराला धक्का बसतो. तुम्ही स्वतः दैन्यावस्थेंत राहाल अन् बायकोलाहि जन्मभर त्याच अवस्थेंत ठेवाल. पण तिला शिकवून कधीं नोकरी करूं देणार नाहीं. कळलें तुमचें मन...’

बोलतां बोलतां निराशेनें तिचा कंठ दाटला, डोळे भरून आले.

त्याचे मन तिला कळलें होतें कीं नाहीं कोण जाणे पण तिचें मन मात्र त्याला या क्षणीं स्पष्ट कळून आलें. ती संसारांत सुखी नाहीं, संतुष्ट नाहीं, अतृप्त आहे; याची याला आज प्रथमच जाणीव झाली. अन् ही जाणीव त्याच्या हृदयाला टोंचली. त्यानें सभोंवार नजर टाकली. एका तीन मजली बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावरच्या सात नंबरच्या खोलींत तो राहत होता. दोन छोट्या खोल्यांचा तो ब्लॉक काहीं अगदींच वाईट नव्हता.

खोल्या लहान होत्या ही गोष्ट खरी. पण एवढी जागा तरी आजकाल मुंबईत मिळते आहे कुणाला ? त्या जागेंत गेलीं वीस वर्षे राहत असलेला त्याच्याच ऑफिसांत असलेला एक कारकून पेन्शन घेऊन आपल्या गांवीं गेला म्हणून, सुदैवानें अन् त्या कारकून महाशयांच्या कृपेनें ही एवढी जागा तरी त्याला मिळाली. अन् दोन माणसांच्या संसाराला जागा तरी केवढी हवी ? समोर भिंतीच्या कडेला एक लोखंडी कॉट होती. त्यावरच्या गाद्यांवर आंथरलेली निळ्या पांढऱ्या चौकटीची चादर, मोठी सुबक, स्वच्छ नि अगदीं नितळ होती. कॉटखालीं कपड्यांनीं भरलेल्या तीन मोठ्या बॅगा होत्या. गॅलरीच्या दाराकडे डाव्या बाजूच्या मोठ्या खिडकीखालीं एक टेबल नि दोन खुर्च्या होत्या. टेबलाच्या डोक्यावर, भिंतीवर, पुस्तकांनीं भरलेलें एक लोखंडी शेल्फ होतें. पलीकडे एक कांचेचें छोटेसें कपाट होतें. सैंपाकघरांत भांडीं, डबे, कांच सामान, पाकसिद्धीची रोजची गरज भागविणारें जरूर तें सर्व साहित्य होतें. लग्नानंतर शुभानेंच तें आपल्या आवडीप्रमाणें निरखून पसंत करून घेतलें होतें. महिना १९० रुपये पगार मिळविणाऱ्या तरुणाच्या संसारांत यापेक्षां अधिक तें काय असणार ? आणि इंटर सायन्स झालेल्या तरुणाला—तो कितीहि हुशार, बुद्धिमान् नि तडफदार असला तरी—सुरुवातीला यापेक्षां जास्त पगार कोण देणार ? आपलें शिक्षण, आपला पगार, आपली स्थिति कशी आहे याची पूर्ण माहिती शुभाला होती आपल्या प्रेमांत पडल्यामुळें तिची विचारशक्ति जर त्या वेळीं पांगळी झाली असेल अन् आपली स्थिति उघड असूनहि प्रेमामुळें तिला दिसली नसेल तर तो कांहीं आपला दोष नाहीं, असें त्याला वाटे.

तसें पाहिलें तर—तर खरोखरच आपल्या संसारांत काय कमी आहे ? आजूबाजूच्या लोकांपेक्षां आपला संसार, आपली राहणी कितीतरी चांगली आहे. आपणाला मिळणाऱ्या पगारांत खाणेंपिणें, कपडालत्ता, जीवनाला आवश्यक असणाऱ्या साऱ्या गरजा सुलभ तऱ्हेनें भागविल्या जाताहेत. आपल्या ऐपतीप्रमाणें आपण तिची प्रत्येक हौस पुरी करीत आहोंत. आपणाकडून तिला शक्य तितकें सुखी करण्याचा, तिला आनन्दांत ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत असतों. पण एवढें करूनहि ती सुखी नाहीं,

अतृप्त आहे, हें आतां कळतांच त्याला दुःख झालें; त्याचा उत्साहभंग झाला. त्याच्या मनांत आलें, अतृप्ति आणि असमाधान वृत्ति ही स्त्रीची नैसर्गिक प्रवृत्तिच असावी. स्त्रीला आपला संसार परिपूर्ण आहे असें कधींच वाटत नाहीं. मग ती या अशा चाळींत राहणारी असो किंवा मलबार हिलवरच्या बंगल्यांत राहणारी असो. संसाराच्या तिच्या अपेक्षा सतत वाढत असतात. तिला कितीहि मिळालें तरी 'अजून कांहीं तरी कमी आहे', 'अजून कांहीं तरी हवंय्' ही भावना स्त्रीच्या मनांतून कधीं जातच नाहीं.

लढाईमुळें वाढलेल्या महागाईचा आपल्या संसारावर थोडाबहुत परिणाम झाला आहे आणि कित्येक बाबतींत काटकसर करावी लागते आहे ही गोष्ट खरी आहे. शुभाचा स्वभाव जात्याच खर्चिक, तसाच विभवेच्छु नि डामडौलप्रदर्शक असल्यामुळें ही काटकसर तिला जाणवत असावी हें सुद्धां कबूल. पण महागाईचा परिणाम काय आपल्या एकट्याच्याच संसारावर झाला आहे? आणि ही महागाईची परिस्थिति का कायमची राहणार आहे? शिवाय आपणाला नोकरीला लागून नुकतीच कुठें सहा वर्षें झालींत. सुरुवातीला पगार कमी असला तरी नोकरी वाढत्या पगाराची आहे. कंपनी चांगली आहे. हळूहळू पगार वाढेल. वरची जागा मिळेल. नोकरी करून कॉलेजांत नांव घालण्याची त्याचीहि इच्छा होती. पण सध्यां कंपनीच्या लॅबोरेटरींत तो काम करीत होता अन् त्या कामावर त्याला सकाळीं नऊ वाजतां जावें लागे. शिवाय कामहि अतिशय दगदगीचें होतें. पण पुढें खातें बदललें तर पुढचें कॉलेज शिक्षण घ्यायची आशा त्यानें मनाशीं बाळगली होती. पण सध्यां आहे ही स्थिति त्याला मोठी बिकट अगर ओढगस्तीची वाटत नव्हती.

संसारी स्त्रीनें नोकरी करूं नये अशा मताचा कांहीं तो नव्हता. पण तशीच खास गरज पडली अगर तशीच आर्थिक बिकट परिस्थिति निर्माण झाली तरच करावी असें मात्र त्याचें मत होतें. आणि तशा तऱ्हेची बिकट परिस्थिति, तितकी निकड स्वतांच्या संसारांत त्याला कुठें दिसेना. पण त्याला दिसली नाहीं तरी शुभाला दिसत होती ना?

पुरुषाची मतें कितीहि प्रखर प्रज्वलित असली तरी पत्नीच्या अश्रुस्पर्शानें तीं थंडगार पडतात. तिच्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रु पाहातांच तो चटकन् उठला. स्वतःची मनःस्थिति लपवून तिला जवळ घेत त्यानें समजावणीच्या स्वरांत म्हटलें, ' शुभा, वेडे, एवढा त्रागा कशासाठीं? अग, जरा गंमत केली तुझी. तुला कॉलेजांत जायची हौस आहे ना? जा. खरेंच जा तूं.'

तिनें साश्रु नजरेनें त्याच्याकडे पाहिलें नि म्हटलें, ' पण तुम्हांला आवडत नाहीं ना? '

तिचे डोळे पुशीत त्यानें म्हटलें, ' तुझ्या डोळ्यांतले हे अश्रु बघायला नाहीं आवडत; बाकी सगळें कांहीं आवडतें. आणि वेडाबाई, नवऱ्याला सुखी करण्याचा, त्याला मदत करण्याचा नि आपला संसार अधिक वैभव-पूर्ण करण्याचा मार्ग बायकोनें शोधून काढला तर तें कुठल्या नवऱ्याला आवडणार नाहीं? '

त्या शब्दांनीं तिच्या चेहऱ्यावरची निराशा लुप्त झाली, अन् तिथें प्रसन्नता पसरली. तिच्या अतृप्तीचें शल्य क्षणापूर्वी त्याच्या हृदयाला टोचलें होतें, पण आतां तिच्या चेहऱ्यावर पसरलेल्या इच्छापूर्तीच्या समाधानानें तें शल्य बोथट होऊन गेलें; विषाद नाहींसा झाला. ती उल्हसित मनानें बोलूं लागली तेव्हां त्याच्या मनांतील उरले सुरले विरोधी विचारहि वावटळीसारखे उडून गेले. कारंजांतून उडणाऱ्या तुषारासारखें तिचें लाडिक, लाघवी बोलणें ऐकतांना त्याच्या चित्तवृत्ती प्रसन्न झाल्या.

तिनें म्हटलें, ' मी पत्र पाठवून पुण्याहून ' मा 'ला बोलावून घेणार' आहे हं. घेऊं ना? घरांत कुणीतरी पाहिजे, नाहीं का? '

आपल्यासाठीं सासूला निष्कारण त्रास द्यावा हा विचार त्याला पसंत नव्हता. शिवाय घरांत एक माणूस वाढलें कीं तितकाच खर्चहि वाढणार. पण पुन्हां हें सर्व सांगून बायकोला नाराज करण्याचा त्याला धीर होईना म्हणून म्हटलें, ' हें बघ, तुला योग्य वाटेल तें कर. तुझ्या गृहराज्यव्यवस्थेंत मी कशाला ढवळाढवळ करूं? त्यांना त्रास होणार नाहीं एवढें पाहा.'

' तिला मुळींच त्रास वाटणार नाहीं. सुनेजवळ राहण्यापेक्षां लाडक्या मुलीजवळ राहणें तिला जास्त आवडेल.'

अनुक्रम 30.9.6
दिनांक
क्रमांक 2396

## उथळ पाणी

पांचसहा दिवसांनीं शुभाची आई आली. लेकीच्या पत्रांतल्या संदिग्ध मजकुरांत तिला कसलीशी गोड चाहूल लागली होती. असेल सासू नाहीं; अशा वेळीं पोरीजवळ कुणी तरी वडील माणूस हवेंच; कुणाकुणाचे डोहाळे भारी जीव घेणारे असतात—या विचारांनीं ती पत्र मिळतांच आली. पण येऊन ठेपल्यावर कांहीं वेगळाच रंग पाहिल्यावर तिचा कांहीं अपेक्षाभंग झाला. तिनें मुलीला धमकावून विचारलें, 'शुभे, सोन्यासारखा संसार करायचा सोडून आतां कसलें शिकतेस? काय नडलेंय शिकायचें? आणि शेखर, तुम्हीहि तिच्या नाचण्यानें काय नाचतां?'

शेखरनें हंसून म्हटलें, 'तिच्या नाचण्यानें नाहीं नाचलों तर उद्यां तुम्हीच म्हणाल जांवई मुलीला छळतो.'

जांवयाचा विनोदी स्वभाव आणि खेळकर वृत्ति सासूबाईंना अपरिचित नव्हती. त्यांनीं म्हटलें, 'रीतीच्या गोष्टीला कुण्णी कांहीं म्हणत नाहीं. लग्नाला आतां दोन वर्षे होऊन गेलीं पण अजून—'

तो हंसला, 'सध्यां पंचवार्षिक योजना चालू आहेत ना जिकडे तिकडे. तेव्हां आम्ही—'

शुभानें डोळे वटारून त्याच्याकडे पाहिलें, तसे पुढचे शब्द त्यानें गपकन् गिळून टाकले. अन् मग तो म्हणाला, 'मा, शुभाला शिकण्याची हौस आहे तर शिकेना. आणि तिनें खूप शिकावें अशी मलाहि हौस आहे.'

सासूबाईंनीं म्हटलें, 'मिया बिबी राजी...' अन् त्या हंसल्या.

कॉलेज सुरू व्हायच्या आदल्या दिवशीं तो नेहमींप्रमाणें सकाळीं ऑफिसमध्यें जायला निघाला तेव्हां तिनें कॉटखालच्या बॅगेंतून तांबडी चौरस मखमली डबी काढून त्याच्या हातांत देत म्हटलें, 'उद्यां फॉर्म नि फी द्यायला हवी. संध्याकाळीं येतांना पैसे घेऊन या.'

त्यानें डबी उघडली. वरचा गुलाबी कागद बाजूला केला. आंत सोन्याच्या जाळीच्या बांगड्या लखलखत होत्या. तिच्या नकळत गेलीं दोन वर्षे थोड थोड पैसे साठवून त्यानें आपल्या पसंतीनुसार या बांगड्या करवून घेतल्या होत्या, नि दिवाळीच्या दिवशीं तिला भेट देऊन आश्चर्यचकित करून सोडलें होतें. त्या बांगड्यांकडे त्यानें थोडा वेळ टक लावून

पाहिलें. अन् मग एकादी गोड स्मृति न्याहाळून पुन्हां हलकेंच हृदयमंजूषेंत लपवून ठेवावी तशा त्या बांगड्या त्यानें पुन्हां कागदांत नीट गुंडाळल्या नि पेटी बंद करून तिच्या हातीं देत म्हटलें, 'या सध्यां राहूं देत. पैशाची दुसरी कांहीं तरी व्यवस्था मी करतों.'

पैशाची व्यवस्था करतों म्हटलें तरी ती करणें सोपें नाहीं हें त्याला माहीत होतें. त्या दिवशीं त्यानें आपल्या ऑफिसमधल्या एका मित्राकडून उसने पैसे आणून तिची फी भरली. वेळेला गरज भागली तरी ते पैसे केव्हां ना केव्हां तरी फेडणें प्राप्तच होतें. तीन वर्षें कॉलेजचा खर्च, शिवाय घरांत एक माणूस वाढल्यामुळें घरखर्चहि वाढणार हें उघड होतें. हा सर्व खर्च भागवायचा म्हणजे नोकरी सांभाळून दुसरा कांहीं तरी उद्योग बघणें प्राप्त होतें. चारपांच दिवस त्यानें या प्रश्नाचा विचार केला नि मग एक दिवस पहांटेच्या दूध सेंटरवर नोकरी धरली. शुभाच्या शिक्षणापायीं आपल्याला हे कष्ट करावे लागताहेत याची तिला जाणीव होऊं नये म्हणून ती कांहीं बोलण्यापूर्वीं पहिल्या दिवशीं त्यानेंच म्हटलें, 'घरीं बिछान्यावर आळशासारखें लोळत पडायचें तें आपलें मिल्कसेंटरवर जाऊन बसेन. शिवाय तूं आतां अभ्यासासाठीं उठशीलच. तुझ्याबरोबर मीहि उठेन.'

पण तो जें लपवूं पाहात होता तें तिच्या हृदयाला कळत होतें. रात्रीं तो वाटेल तितका वेळ जागूं शकतो, पण पहांटे उठणें त्याला जमत नाहीं नि आवडतहि नाहीं हें तिला माहीत होतें. त्याला सकाळीं जरा लवकर उठवायला गेलें तर डोळे घट्ट मिटून म्हणे, 'ए, जरा पांच मिनिटें झोपूं दे ना! प्लीज!'

अन् असें म्हणतांना त्याच्या स्वरांत जें बालसहज आर्जव उमटत असे त्याची तिच्या कानांना चांगली संवय झाली होती. पहांटेच्या प्रहरीं जागेपणीं डोळे मिटून पडण्यांत त्याला अपरिमित सुख वाटत असे, हें तिला माहित होतें. हें सुख त्यानें दूर ढकललें...आपल्यासाठीं करीत असलेल्या या स्वार्थत्यागाची, त्याच्या उत्कट प्रेमाची तिला जाणीव झाली. ती जाणीव तिच्या प्रत्येक कृतींत उमटूं लागली. सकाळीं तो

ऑफिसमध्यें जाई त्या वेळीं ती कॉलेजमध्यें गेलेली असे. पण ही उणीव ती संध्याकाळीं भरून काढी. तो ऑफिसांतून परते त्या वेळीं रोज अगदीं न चुकतां दारांत त्याचें हंसतमुखानें अन् सप्रेम नजरेनें स्वागत करी. त्यानें उतरविलेले कपडे जागच्या जागीं व्यवस्थित ठेवी. चहाबरोबर रोज नवीन नवीन खाणें तयार करून ठेवी. जेवणाच्या वेळीं दक्षता राखी. फुलाभोंवतीं भिरभिरणाऱ्या फुलपांखरासारखी ती त्याच्याभोंवतीं सारखी भिरभिरत राही.

पहांटे त्याच्याआधीं ती उठे, चहा तयार करी नि मग त्याला उठवायला जाई. निद्रासुखांत मग्न असलेल्या त्याच्या शांत समाधानी चेहऱ्याकडे टक लावून पाहात ती उभी राही. टेबलावर असलेल्या दिव्याच्या तिरकस प्रकाशांत त्याच्या श्यामल रेखीव चेहऱ्यावरची रेखा न् रेखा उमटून दिसे. एकाद्या सुंदर शिल्पाकृतीप्रमाणें दिसणाऱ्या त्या चेहऱ्याकडे पाहतांना तिच्या पूर्वस्मृती उचंबळून येत. हा आपला आहे असा अभिमान तिच्या हृदयांत उफाळे. वत्सल रस पाझरे. त्याला उठविण्याचें तिच्या अगदीं जिवावर येई. पण शेवटीं नाइलाज म्हणून उठवावें लागे.

रात्रीं जेवणानंतर एकादें मासिक अगर पुस्तक घेऊन तो कॉटवर वाचीत पडला कीं ती टेबलाजवळ अभ्यासाला बसे. पण अभ्यास करतां करतां त्याच्या नजरेंतला भाव तिच्या लक्षांत आला कीं चटकन् पुस्तक बंद करून उठे. तिच्या त्या तत्परतेमुळें आणि भावनाविष्कारामुळें त्याचें हृदय पुलकित होई. अशा वेळीं तो कधीं कधीं चेष्टेनें म्हणे, 'कॉलेजांत नवऱ्यावर एवढें उत्कट प्रेम करायलाहि शिकवतात हें माहीत नव्हतें बुवा.'

ती लाडिकपणें म्हणे, 'नसायचेंच माहीत. स्वतांजवळ सुगंध आहे याची फुलाला कुठें दाद असते? माझें हें उत्कट प्रेम तुमच्या स्वार्थत्यागाचें नि श्रमाचें फळ आहे.'

तो हंसून म्हणे, 'लबाड! मला बनवतेस काय? हें फळ तुझ्या आकांक्षापूर्तीचें आहे.'

ती निरुत्तर होई, पण दिलखुलास हंसे.

कधीं कधीं अभ्यास संपवून बिछान्याकडे वळायला तिला बारा वाजून जात. तिची वाट बघून तो झोपीं गेलेला असे. तिला तें जाणवे. मग पहांटे तो उठला कीं, दिलगिरी प्रदर्शित करून ती हलकेंच म्हणे, 'काल दुपारीं अभ्यासाला वेळच मिळाला नाहीं मला. 'मा'ला आपल्या इथें काम पडूं नये म्हणून शक्य तेवढें सगळें मीच करतें.'

ती घरच्या कामाकडे दुर्लक्ष करीत नाहीं; सगळें स्वतःच करते हें न सांगतांसुद्धां त्याला कळत असे. कारण घरची टापटीप, व्यवस्था पूर्वी-इतकीच उत्कृष्ट असे. प्रत्येकावर तिचा हात फिरलेला दिसे. खाण्याचे पदार्थ नि संध्याकाळच्या सैंपाकांतले बरेचसे पदार्थ तिच्याच हातचे असत. बाजारहाट वगैरे पूर्वीच्या कुठल्याहि कामांत हेळसांड होत नव्हती. तिच्या या कार्यक्षमतेचें त्यालाच नव्हे तर तिच्या आईलाहि मोठें कौतुक वाटे. आपल्या लेकीचा हा खेळीमेळीचा संसार, दोघांचें एकमेकांवरील उत्कट प्रेम पाहून तिला धन्यता वाटे.

तिची इन्टरची परीक्षा झाली. ती सेकन्ड क्लासांत आली. त्याच्या श्रमाचें नि प्रेमाचें तिनें चीज केलें. त्यानें तिचें कौतुक केलें. त्यावर तिनें हंसून म्हटलें, 'इश्श ! एवढें काय अगदीं हरभऱ्याच्या झाडावर चढवायचें तें !'

तो हंसला: 'अग, पुढें नवऱ्याच्या डोक्यावर चढूं नयेस म्हणून आधींच हरभऱ्याच्या झाडावर चढवून ठेवतों आहें.'

हळूहळू तिचा अभ्यास वाढला. पण तिची कार्यक्षमता, उत्कट प्रेम नि भावनाविष्कार कमी झाला नव्हता. दिवसामागून दिवस कसे भराभर निघून जात होते. दोन वर्षे केव्हां कशीं निघून गेलीं तें समजलेंसुद्धां नाहीं. शुभा बी. ए. झाली. सेकंड क्लास येण्याची खात्री असल्यामुळें तिनें नोकरीसाठीं आधींच खटपट चालविली होती. आणि पास झाल्याबरोबर नवीन निघालेल्या एका खाजगी शाळेंत तिला असिस्टंट हेडमिस्ट्रेसची जागा मिळाली. पहिल्या पगाराचे २०० रु. घेऊन एके दिवशीं संध्याकाळीं ती घरीं आली तेव्हां तिचें मन आनंदानें नि अभि-मानानें फुलून निघालें होतें. पर्समधून पैसे काढून तिनें टेबलावर ठेवले नि आपल्या प्रथम अपत्याकडे पाहणाऱ्या मातेच्या नजरेनें त्या पैशांकडे

कितीतरी वेळ पाहात राहिली. मुलीच्या श्रमाचें चीज झालेलें पाहून 'मा'नाहि मोठें समाधान वाटलें.

शेखर ऑफिसांतून येतांच त्याच्यापुढें नोटा करून तिनें हंसत म्हटलें, 'याचें काय आणायचें सांगा.'

त्यानें म्हटलें, 'तुला आवडेल तें. एकादा दागिना, साडी...'

तिनें म्हटलें, 'नाहीं. कोच, खुर्च्यांचा सेट.'

अन् पहिल्या पगारांत मऊ मऊ कोच अन् खुर्च्या घरांत आल्या. दुसऱ्या पगारांत आरशाचें मोठें कपाट आलें. एका पगारांत त्याचा एक सुन्दर सूट झाला. सूट तयार होऊन झाल्याबरोबर तिनें तो त्याला घालण्याचा आग्रह केला. त्यानें तो परिधान केल्याबरोबर तिनें मोठ्या अभिमानानें त्याच्याकडे पाहिलें. त्याच्याकडे म्हणजे सुटाकडे—नवऱ्याकडे नव्हे. त्या सुटावर नजर खिळवून तिनें म्हटलें, 'किती सुंदर दिसतो.'

हें आपणांला उद्देशून आहे असें समजून त्यानें चेष्टेनें म्हटलें, 'कोण मी? बघ हं! दृष्ट लागेल.'

तिनें ओठांना मुरड घालून म्हटलें, 'इश्श! मी सुटाचें सांगते आहें. किती सुंदर कापड आहे.'

अन् मग त्या सुटाचें, कापडाचें नि स्वतांच्या खरेदीचें वर्णन तिनें घरीं नि दारीं प्रत्येकाजवळ पुन:पुन्हां केलें. जें सुटाच्या बाबतींत तेंच इतर वस्तूंच्या बाबतींत! नवीन खरेदी केलेल्या कुठल्याहि वस्तूचें प्रदर्शन करण्यांत नि खुलवून वर्णन सांगण्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. मानवी स्वभावाचा तो एक गुणधर्म आहे. पण हें प्रदर्शन आणि वर्णन करण्यांत ही सर्व खरेदी आपणच आपल्या पगारांतून करतों आहोंत, हें वैभव, ही उच्च राहाणी आपल्यामुळेंच प्राप्त होत आहे, असें जें शुभा पुन:पुन्हां ध्वनित करी तें शेखरला थोडेंसें विचित्र वाटे. क्वचित् त्याचा डंखहि त्याला जाणवे.

घराचें वैभव वाढूं लागलें. त्याचबरोबर तिचा अभिमानहि वाढूं लागला. आपण आतां मिळवत्या झालों आहोंत, ह्या नवीन भावनेचे

अंकुर तिच्या मनांत रुजूं लागले. पूर्वीच्या लीनतेच्या मृदु भावनांना ताठरपणा येऊं लागला. तिच्या मनाचा ऋतु हळूहळू बदलूं लागला.

पूर्वीं तो येतांच दारांत त्याचें हंसतमुखानें स्वागत करणारी शुभा आतां दारांतच नव्हे तर घरांत सुद्धां सांपडत नसे. शाळा सुटल्याबरोबर घरीं येणें तिला अशक्य नव्हतें; पण तिला लवकर घरीं परतण्याची आवश्यकता वाटत नव्हती. त्याला सुरुवातीला चुकल्यासारखें वाटे; पण तिला कांहीं कामामुळें उशीर झाला असेल अशी तो मनाची समजूत घाली अन् सासूबाईंनीं चहा घेण्याचा आग्रह केला तरी आधीं न घेतां तिच्यासाठीं मुद्दाम थांबे. कधीं ती अर्धा तास उशीरां येई तर कधीं जेवणाच्या वेळेपर्यंत येतच नसे. मग तो वाट बघून कंटाळून–सासूबाईंनीं तीनदां गरम केलेला चहा निमूटपणें घेई. खाद्यपदार्थांची प्लेट तशीच पडून राही. पोटांत भूक असूनसुद्धां ते त्याला खावेंसें वाटत नसत. मग तो बाहेर निघून जाई.

रात्रीं जेवणाच्या वेळीं तो परते तेव्हां ती टेबलाजवळ शाळेचें कसलें तरी काम घेऊन त्यांत डोकें खुपसून बसलेली असे. लहर असली तर काम आवरून ठेवून बोले, नाहींतर कामांत तशीच मग्न राही. आणि मग तिचें काम संपण्याची वाट बघत बाजूला आरामखुर्चीत पडल्या पडल्या तो विचारांत गढून जाई. जेवतांनाहि पुष्कळ वेळां तिचें लक्ष स्वतःच्या जेवणाकडे अगर त्याच्या जेवणाकडे नसे. तें टेबलावर पडलेल्या शाळेच्या कामांत अगर लवकरच बी. टी. चा अभ्यासक्रम सुरू करण्याच्या बेतांत गुंतलेलें असे. रात्रीं जेवणानंतरहि पुन्हां ती वह्या तपाशीत अगर पुस्तक वाचीत बसे. पूर्वीं ती अभ्यासाला अशीच बसत असे. पण तेव्हां ती त्याच्या भावनांची किती जपणूक करी! आतां तिचें कळत नकळत दुर्लक्ष होऊं लागलें होतें. सुरुवातीला त्याला वाटे, नोकरीचा–शाळेच्या कामाचा–नवीन उत्साह आहे तेव्हां उत्साहाच्या भरांत होतें दुर्लक्ष! पूर्वींसुद्धां कधीं कधीं अभ्यासाच्या भरांत असें दुर्लक्ष होत असे. त्या वेळीं असा तिला उशीर झाला कीं कांहीं एक न बोलतां तो टेबलावरचें घड्याळ हळूंच तिच्यापुढें सरकवी. ती घड्याळाकडे बघे नि दचकून

जीभ चावून झटकन् उठे! तोच प्रयोग त्यानें आतां केला. प्रयोग तोच होता, व्यक्ति तीच होती; पण भावनेंत बदल झालेला त्याला दिसला. पूर्वीसारखें झटकन् न उठतां, पुढें सरकवलेलें घड्याळ घेऊन तिनें दुसऱ्या कोपऱ्यांत धडकन् उपडें ठेवलें नि कपाळाला आंठ्या घालून तोंड मुरडून त्रासिकपणें म्हटलें, ' इथें माझ्यापुढें कामाचा ढीग पडलेला दिसतो आहे ना डोळ्यांना? तुम्हांला नाहीं उद्योग!'

उघड्या अंगाला पावसाळी थंडगार वारा झोंबावा तसे ते शब्द त्याच्या हृदयाला झोंबले. बरोबर होतें तिचें म्हणणें! त्याला सध्यां नोकरी-शिवाय दुसरा उद्योग नव्हता. कारण तिला नोकरी लागल्यावर त्यानें दूध सेंटरवरची नोकरी सोडली होती. तिचा उद्योग वाढला होता—नव्हे तिनें तो वाढवला होता. शाळेच्या नोकरीखेरीज सकाळच्या एका कोचिंग क्लासमध्यें ती शिकवायला जात असे असा या दोन कामांचाच तिला उद्योग होता. घरचा सगळा उद्योग तिनें सोडून दिला होता. घरच्या सर्व कामांसाठीं तिनें महिना २५ रु. देऊन एक नोकर ठेवला होता. पण नोकर चुकारपणांत हुशार असल्यामुळें पुष्कळशीं कामें शेखरलाच करावी लागत. जें काम पूर्वी तो करूं लागला कीं तिच्या सुगृहिणी मनाला अवघडल्यासारखें वाटे, शरमल्यासारखें वाटे, तें काम तो आतां करीत असतांना ती निःसंकोच मनानें पाहात राही अगर दुर्लक्ष करी. पुष्कळ वेळां मा त्याबद्दल तिला बोलत. पण त्या बोलल्या कीं शुभा लगेच फणकाऱ्यानें म्हणे, ' मग केलें म्हणून बिघडलें कुठें? स्वतांचेंच करताहेत! पूर्वीसारखी चोवीस तास त्यांच्या दिमतीला राहायला मी रिकामी नाहीं.'

मायलेकींच्या संभाषणांत तो भाग घेत नसे. पण अशीं संभाषणें आपल्या पश्चातहि होत असलीं पाहिजेत हें त्याला कळे. कारण शुभाच्या बदललेल्या वर्तनाची झळ तिच्या आईलाहि लागत असलेली त्याला दिसून येई. लेकीचें वर्तन अन् त्यामुळें त्यांच्या मनाची चाललेली ओढाताण त्याला दिसत असे. पूर्वीपेक्षां त्या आपल्याशीं जास्त जिव्हाळ्यानें वागतात हें पण त्याला कळे. म्हणूनच कुठल्याहि बाबतींत शुभाशीं वाद न घालतां, आपल्या मनाची व्यथा लपवून, शक्य तितक्या हंसऱ्या चेहऱ्यानें तो घरांत वावरे.

ऑफीस सुटलें कीं त्याला घरीं येण्याची पूर्वीसारखी ओढ आतां राहिली नव्हती. तो कधीं उशीरां घरीं येई तर कधीं बाहेरच्या एखाद्या रेस्टॉरॉमध्यें चहा घेऊन मित्राच्या घरीं गप्पा मारीत बसे नि जेवणाच्या वेळीं घरीं परते. घरांत पाऊल टाकतांना एखाद्या कुबट, कोंदट जागेंत शिरतों आहोंत असें त्याला वाटे. प्रखर विद्युत्प्रकाशांत झळकणाऱ्या साऱ्या वस्तूंचा त्याला तिटकारा येई. मऊमऊ कोचावर बसणें त्याला नकोसें होई. या वैभवानेंच आपल्या नि शुभाच्या मध्यें वितुष्ट आणलें असें कांहींसें त्याला वाटे. त्याच्या मनांत कडवटपणा भरूं लागला. हळूहळूं तो घराबाहेर जास्त वेळ काढूं लागला. मित्रांच्या सहवासांत आनंद शोधूं लागला. शाळेंत, कॉलेजांत असतांना त्याला पत्ते खेळण्याचा विलक्षण छंद होता. त्या वेळीं ब्रिज खेळण्यांत तो पटाईत होता. तो जुना छंद जिवलग मित्रासारखा या ऐन वेळीं पुढें आला. रात्रीं जेवणानंतर तो पत्ते खेळायला जाई नी उशीरां परत येई. सुटीच्या दिवशीं तर बहुधा सबंध दिवस बाहेरच राही. हातांतल्या पत्त्याबरोबर मनाच्या आनंदासाठीं तोंडांत सिगारेट आली नि वागण्यांत बेफिकीरी आली. त्याची ही बेपर्वाईची वागणूक नि वाटेल तेव्हां—वेळीं अवेळीं घरीं येणें तिच्या मनाला झोंबे. तिला वाटे आपण आतां मिळवत्या झालों, संसाराचा भार उचलूं लागलों तसा हा बेफिकीर बनला. जणू कांहीं संसार त्याचा नाहीं असेंच तो वागतोय. आपण नोकरी करतों आहोंत हें त्याला खपत नाहीं. त्याच्या-पेक्षां आपणांला जास्त पगार मिळतो आहे त्याचें त्याला वैषम्य वाटतेंय. आपलें वर्चस्व त्याच्या डोळ्यांत खुपतेंय. हे विचार मनांत येतांच तिच्या मनांतल्या अढीला पीळ पडला नि त्याचा अवमान करण्याची, आपलें वर्चस्व दाखविण्याची सुप्त इच्छा तिच्या मनांत उत्पन्न झाली. आणि ती क्वचित् तिच्या बोलण्यांतहि व्यक्त होऊं लागली.

दोघांत अबोलाच असे; जेव्हां बोलत तेव्हां एकमेकांवर वाक्प्रहार करण्यासाठींच ! मा झगडा सोडविण्यासाठीं मध्यें पडत. पण न्यायाचा कांटा निःपक्षपातामुळें शेखरकडे झुके; शुभाची वक्रदृष्टि तिच्यावर वळे नि मग झगडा वाढे. त्या झगड्याचे पडसाद शेजाऱ्यांच्या भिंतींत उमटत.

अलिकडे शेखर बराच वाळलेला दिसूं लागला होता. खाण्यापिण्यांत लक्ष नसल्यामुळें चेहऱ्यावरची सतेजता कुणाच्याहि लक्षांत येण्याइतकी कमी झाली होती. त्याच्या या प्रकृतीबदलाचें खापर शुभा त्याच्या सिगरेटच्या नि पत्त्यांच्या व्यसनांवर फोडी. त्यांत हल्लीं त्याचें ऑफिसमधलेंहि काम वाढलें होतें. पुष्कळ वेळां अगदीं उशीरपर्यंत तिथें काम करीत बसावें लागे. ऑफिसच्या कांहीं कामासाठीं त्याला मद्रासला जायचें होतें. त्याच्या आदल्या रात्रीं त्याला घरीं यायला बराच उशीर झाला होता. कामाच्या त्रासानें त्याचें डोकें ठणकूं लागलें होतें. जेवणासाठीं मा तिष्ठत बसल्या होत्या. उशीर होण्याचें कारण सांगून दिलगिरी प्रदर्शित करीत त्यानें दोन घांस खाऊन घेतले नि डोकें दाबून तो आरामखुर्चींत पडला. तेवढ्यांत शेजारीं कुठें गेलेली शुभा आंत आली. 'मा'नीं म्हटलें, 'शुभा, शेखरचें डोकें दुखतें आहे वाटतें, बघ जरा.'

त्याच्याकडे न पाहतांच तिनें रागानें म्हटलें, 'मोठे कष्ट करून आलेत कीं नाहीं! डोकें दुखत होतें तर आतांपर्यंत पत्ते कुटीत बसायला कुणीं सांगितलें होतें? यावें लवकर घरीं!'

'मां'नीं कांहीं उत्तर देण्यापूर्वींच शेखरनें कडवटपणानें म्हटलें, 'मा, कशाला सांगतां तिला? तिला आतां नवऱ्याची पर्वा नाहीं. तो मेला तरी तिचें कांहीं अडणार नाहीं. ती मिळवती आहे, माझ्यापेक्षां दुप्पट पैसे मिळवते आहे—'

शुभा मध्येंच कडाडली, 'त्याचाच तुम्हांला मत्सर वाटतो आहे. माझे पैसे तुमच्या नजरेंत खुपतात. पण मी पैसे मिळवतें म्हणूनच तुम्ही सिगरेट पत्त्यांत हवे तसे पैसे उधळतां; मित्रांच्या टोळक्यांत चैन करीत फिरतां, बायकोच्या जिवावर चैन...'

मा ओरडल्या, 'शुभे, शुभे, कार्टे जरा भान ठेवून बोल. तुझें पाऊल घरांत नसतें तर त्यांनीं तरी आपलें मन कसें रिझवायचें?'

शुभा आईवर कडाडली, 'चढव, जांवयाला आणखीन् डोक्यावर चढव. आज सिगारेट नि पत्त्याच्या जुगारापर्यंत पोंचलेयत. उद्यां त्याच्या पुढची पायरी गांठतील.'

तो भडकून ओरडला, 'गांठीन. तशी इच्छा झाली तर तीहि पायरी गांठीन.'

तिनें म्हटलें, 'इतक्या नीच मनोवृत्तीचे तुम्ही आहांत हें मला आधीं माहीत असतें तर तुमच्याशीं मीं लग्न केलें नसतें.'

त्यानें उपहासानें म्हटलें, 'मग आतां घटस्फोट घे. कायद्यानें तशी सोय केलेली आहे. तुला—'

पण तेवढ्यांतच त्याच्या ऑफिसमधला एक मित्र दारांत येऊन ठेपल्यामुळें पुढचे शब्द त्याच्या तोंडांत राहिले. मन आवरून कपडे करून तो बाहेर गेला. दीड तासानें तो घरीं परतला तेव्हां त्याच्या हातांत सिगरेटचा एक मोठा डबा होता. खिडकीजवळ आरामखुर्चीत पडून त्यानें तो सबंध डबा ओढून फस्त केला.

सकाळीं तो उठला तेव्हां शुभा नेहमींप्रमाणें क्लासला निघून गेली होती. मा संकोचवृत्तीनें नि चिंतामग्न चेहऱ्यानें घरांत वावरत होत्या. रात्रीं जणूं कसलेंहि वादळ झालें नाहीं अशा तऱ्हेनें तो त्यांच्याशीं बोलत होता. त्यानें प्रवासाची तयारी केली, नि जेवणानंतर सामान घेऊन घराबाहेर पडला.

त्याला ऑफीसच्या कामासाठीं मद्रासला जायचें आहे हें आठ दिवसांपूर्वींच त्यानें घरांत सांगितलें होतें. तें त्यांना माहीत होतें. तरी सुद्धां आतां तो जातांच कसल्यातरी एका विचित्र भीतीनें त्यांचें हृदय थरकलें. त्याच्या रूपानें घरांतला उरला सुरला आनंद निघून जात आहे असा त्यांना भास झाला. आपल्या मुलीचा दोष त्यांना दिसत होता. पण तो कसा घालवावा, तिचे दोष तिला कशा तऱ्हेनें पटवून द्यावेत हें मात्र त्यांना कळेनासें झालें होतें; कारण प्रत्येक सरळ गोष्टीकडे ती विकृत नजरेनें पाहात होती. शिक्षणाच्या हौसेंतून संसारसुखाला गिळणारा हा भलताच भस्मासुर उत्पन्न झालेला पाहून त्या गोंधळून गेल्या होत्या. आतां या भस्मासुराला आवरायचें कसें हें त्यांना कळेना.

शुभाचा दैनंदिन कार्यक्रम चालू होता. घरांतलें वातावरण सध्यां शांत नि कांहींसें अबोल होतें. कारण मा तिच्याशीं जेवढ्यास तेवढेंच बोलत.

उरला वेळ महाभारत वाचीत बसत. पण त्यांचें चित्त वाचण्यांत नसून मुलीच्या भवितव्याच्या विचारांत गुंतलेलें असे. तिला उपदेशाचे दोन शब्द सांगावेत असें त्यांच्या मनांत येई. पण आतां नवरा दूर गेल्यानंतर कदाचित् तिची विचारशक्ति ताळ्यावर येईल अशा आशेनें त्या स्वस्थ बसत. शेखर गेल्यानंतर चौथे दिवशीं त्यांच्या नांवाचें पत्र आलें. नेहमीप्रमाणें मुलाचें असेल असें त्यांना वाटलें, पण पाकीट जाड होतें, नि पत्त्यावरचें हस्ताक्षर शेखरचें होतें. शंकाकुशंकांनीं त्यांचें मन शहारलें. मटकन् त्या कोचावर बसल्या. दिङ्मूढ होऊन कितीतरी वेळ त्या पाकिटाकडे पाहात राहिल्या. नंतर धीर करून त्यांनीं तें पाकीट फोडलें नि डोळ्याला चष्मा लावून वाचायला सुरुवात केली. शेखरनें लिहिलें होतें.

'सोबतचं हें पत्र वास्तविक शुभाच्या नांवावर पाठवायला हवं. पण कदाचित् न वाचतां ती फाडून टाकील म्हणून हें तुमच्या नांवावर पाठवीत आहे. शिवाय हें तुम्हीहि वाचावं अशी इच्छा आहे. तेव्हां हें वाचून शुभाला द्यावें.'

त्यांनीं सोबतच्या पत्राची घडी उलगडली.

प्रिय शुभा,

कदाचित् माझें तुला हें अखेरचेंच पत्र असेल. इतक्या थराला गोष्टी जातील याची मला स्वप्नांतहि कल्पना नव्हती. तुला सुखी नि संतुष्ट करण्याचा मीं प्रयत्न केला. तेवढ्यासाठीं सकाळच्या दूधसेंटरच्या नोकरीचे कष्ट घेऊन तुझं शिक्षण पुरं केलं. तुझ्यासाठीं मीं कष्ट केले, यांत मीं विशेष कांहीं केलं असं मुळींच नाहीं. मी माझं कर्तव्य—छे: छे:! पतिपत्नींनीं एकमेकांसाठीं झीज सोसणें, कष्ट करणं ही दांपत्यजीवनांतली एक नैसर्गिक भावना असते. पण तुझी इच्छा पूर्ण होऊन, तूं मिळवती होऊनहि सुखी नाहींस, आणि दुर्दैवानें मीहि सुखी नाहीं. विवाहित स्त्रीनें नोकरी करूं नये, अशा मताचा मी नाहीं. पण पैसे कमावून संसार चालवणं हा पुरुष स्वतांचा धर्म आहे असं समजतों. त्यांत त्याला आपण कांहीं मोठा पराक्रम करतों आहोंत अगर उपकार करतों आहोंत असं वाटत नाहीं. वृथा अभिमानाची भावना नसते. पण स्त्रीला तें एक गर्वाचं, अभिमानाचं

साधन वाटतं. आणि जोंपर्यंत अशी ही भावना तिच्या मनांत कायम राहील, जरूर पडल्यास पतीच्या संसारांत आर्थिक मदत करणं हा आपला सुद्धां एक धर्म आहे असं तिला वाटणार नाहीं, तोंपर्यंत मिळवती स्त्री आपल्या संसारांत कधींहि सुख निर्माण करूं शकणार नाहीं. वास्तविक तुला नोकरी करण्याची कांहींच जरूरी नव्हती. पण तुला गरज वाटली. गरज ही एक कधींहि न संपणारी वाट आहे. गरजेची वाट कितीहि चालत राहिलं तरी संपत नाहीं. वैभव वाढवण्यासाठीं तूं नोकरी धरलीस, पण वैभवप्राप्तींत स्त्रीची आणि पुरुषाची दृष्टि फार वेगळी असते. वैभवाचा उपभोग घेणें, त्यांतून शक्य तेवढा आनंद, सुख निर्माण करणें हा पुरुषाचा हेतु असतो. स्त्रीची दृष्टि प्रदर्शनाची असते.

माझ्याशीं लग्न केल्याचा तुला पश्चात्ताप वाटतो. इतकी कटुता निर्माण झाल्यावर आपण एकत्र राहाणं चांगलं आहे असं वाटत नाहीं. एकत्र राहून एकमेकांचा तिरस्कार करण्यापेक्षां अलग झालेलं चांगलं. घटस्फोट घेऊन तूं सुखी होत असशील तर त्यालाहि माझी तयारी आहे. गेल्या वर्षापर्यंत आपलं जीवन म्हणजे एक मधुर स्वप्न होतं. पण एखाद्याच्या नशिबांत अपघातच फार असतात. ज्यांनीं मला लाडांत वाढवलं, माझ्या-विषयीं मोठमोठ्या आकांक्षा बाळगल्या त्या माझ्या मातापित्यांचं प्रेमळ छत्र एकदम नाहींसं होईल याची तरी मला कुठं कल्पना होती? पण रेल्वे-अपघात झाला नि एका रात्रींत मी पोरका झालों. उच्च शिक्षणाचीं स्वप्नं विरलीं नि मिळेल ती नोकरी धरावी लागली. ती जखम जणूं भरून काढण्यासाठींच तूं माझ्या जीवनांत आलीस. पण उत्कट प्रेमाचा आस्वाद मिळतो तों हा दुसरा अपघात! चालायचंच! ...तें जाऊं दे! मी इथं मद्रासला बदली करून घेण्याच्या खटपटींत आहे, तूं कुठंहि असशील तिथं सुखी राहावीस हीच इच्छा आहे. तुला–'

माना पुढें तें पत्र वाचवेना. कोचाच्या पाठीवर मान टाकून डोळे मिटून त्या स्वस्थ पडल्या. शेखरविषयीं वात्सल्य त्यांच्या हृदयांत दाटून आलें. नेत्र ओलावले, मुलीच्या भवितव्याच्या काळजीबरोबरच तिच्या-विषयींचा क्रोध त्यांच्या मनांत उमटला.

संध्याकाळीं शुभा शाळेंतून आली तरी त्या कोचावर पडून होत्या. उठून कांहीं करावं असा त्यांना उत्साहच वाटत नव्हता. त्यांना झोंपलेल्या पाहातांच शुभा लगबगीनें जवळ गेली नि त्यांच्याजवळ बसून त्यांच्या कपाळाला हात लावीत तिनें म्हटलें, 'मा, झोंपलीस का ग? बरं नाहीं वाटत? मग तूं उठूं नकोस, मी पाहातें घरांतलं. तुला उपासच आहे. मी करतें सारं.'

त्या कांहीं न बोलतां डोळे मिटून स्वस्थ पडून राहिल्या. शुभानें त्यांना कॉफी करून दिली. फराळाचें करायला घातलें नि स्वत:चें जेवण उरकलें. मा बाहेर कॉटवर पडल्या होत्या. त्या कसल्या तरी विचारांत मग्न होत्या. काम आटपून शुभा बाहेर आल्यावर त्यांनीं म्हटलें, 'उद्यां मी पुण्याला जातें.'

शुभानें घाबरून विचारलें, 'का ग? काय झालं?

त्यांनीं म्हटलें, 'व्हायचं काय? आतां इथं चार वर्षं राहिलें. तीन वर्षं तुमचा सुखाचा संसार बघितला. नि गेल्या वर्षापासून चाललेले धिंडवडे पण पाहिले. डोळ्याचं पारणं फिटलं,' बोलतां बोलतां त्या उठून बसल्या.

शुभानें म्हटलें, 'पण मा हे अलिकडे कसं वागवतात तूं बघतेस ना?'

'त्यालाहि बघतें नि तुलाहि बघतें. आतां वीट आलाय त्या बघण्याचा.'

'पण त्यांचा दोष तुला दिसत नाहीं.'

'नाहीं कसा? त्याचा तर मोठा दोष आहे, नि त्याचीं तो वर्षभर फळें भोगतो आहे.'

शुभानं चढया आवाजांत म्हटलं, 'म्हणजे मीच वाईट?'

'नाहीं. आतां थोडया वेळानें वाईटपणा मला येणार आहे, आजपर्यंत मी गप्प बसलें. गेल्या वर्षापासून तुझीं लक्षणें पाहातें आहें. नोकरी करून चार पैसे मिळवायला लागल्याबरोबर तुझे डोळे फिरले. साधा गृहिणी-धर्म तूं विसरून चाललीयस. तुझा नवरा बिघडला नाहीं. तूं त्याला बिघडवलंस. आपण मिळवत्या आहोंत याची तुझ्या डोळ्यांवर धुंदी चढलीय. मिळवत्या स्त्रीला पत्नीधर्म पाळण्याचं वावडं आहे का?

विचारा येऊन तुझ्यासाठीं तिष्ठत बसायचा. तुझं पाऊल सारा दिवस घराबाहेर! बरं घरीं असल्यावर तरी त्याच्याशीं दोन शब्द गोडीनें कधीं बोललेयस? शिकत होतीस तेव्हां कशी सारा दिवस त्याच्या भोंवतीं-भोंवतीं फिरत होतीस! आणि आतां कधीं दोन गोड शब्द नाहींत. त्यानें घरीं राहून काय तुझ्या या जमवलेल्या प्रदर्शनाकडे पाहात बसायचं? जो आनंद त्याला घरांत मिळत नाहीं तो त्यानें बाहेर शोधला तर मी त्याला कधींहि दोष देणार नाहीं. त्याची प्रकृति किती खराब झालेय, हें डोळे उघडून बघितलंयस? कसला हा तुझा संसार? पैसे मिळवून आणतेस ते कांहीं कुणावर उपकार करतेस? वेळ प्रसंग पडला तर स्वतां मिळवून आणून संसार चालवणं, नवऱ्याला मदत करणं हा पत्नीचा धर्म आहे, असं आतांपर्यंत आम्ही जुन्या बायका मानीत आलों आहोत. आपल्या मोठ्या आजीची गोष्ट माहीत आहे ना तुला? कसलासा चीक उडून आजोबांचे दोन्ही डोळे गेले. त्यानंतर शेताच्या वसुलीचीं बाहेरचीं सारीं कामें आजी करीत असे. पण पत्नीधर्म ती कधीं विसरली नाहीं. माझ्यामुळं घर चालतं, संसार चालतो असा तिनें कधीं गर्व केला नाहीं कीं आजोबांचा एका शब्दानं कधीं अपमान केला नाहीं. उलट त्यांना ती किती जपत असे! आणि आजकालच्या तुम्हां मिळवत्या पोरींचा अभिमान–उथळ पाणी आहे हें. कसलं हें तुमचं शिक्षण! व्यर्थ आहे सगळं—'

मा सारखं बोलत होत्या. शुभा एक शब्द न बोलतां निमूटपणें ऐकत होती. आज त्या वृद्ध झाल्या होत्या. आतांपर्यंत मनांत सांठवून ठेवलेला सात्त्विक संताप बाहेर असा उफाळून निघत होता कीं शुभाला मध्यें एकहि शब्द बोलण्याचा आज धीर होत नव्हता. मनांतले सर्व विचार बोलून टाकल्यावर थकून थरथरत त्या पुन्हां बिछान्यावर आडव्या पडल्या.

शुभा विचारमग्न झाली होती. बराच वेळ तिला विचार करूं दिल्यावर त्यांनीं म्हटलं, 'शेखरचं दुपारीं पत्र आलंय. समोरच्या कोचावर कुशनखालीं आहे. बघ.'

ती एकदम दचकली. पत्र घेऊन तिनं तें वाचलं. मग वेगानं धांवत जाऊन आईच्या कुशींत तोंड खुपसून तिनें सद्गदित स्वरांत म्हटलं, 'मा, मा! मी चुकलें. मला शेखर हवेत.' अन् तिचे हुंदके अनावर झाले. त्या कांहींच बोलल्या नाहींत. थोड्या वेळानं तिनंच रडत रडत म्हटलं, 'मा, खरंच मी पुन्हां असं नाहीं वागणार. तुझ्या पायाची शपथ!'

त्यांनीं गंभीरपणें म्हटलं, 'बाई ग, पावसाचं पडणं नि स्त्रीचं रडणं सारखंच. पडायला लागला तर महापूर नाहींतर सगळं कोरडं ठणठणीत. दोघांची शाश्वती नाही.' शुभानें विचारलं, 'मग काय करूं मी? तूंच सांग मा.'

पण मग लगेंच टेबलाकडे जाऊन पत्र लेखनाचं साहित्य काढीत तिनं म्हटलं, 'नको नको; काय करायचं तें कळलं मला.'

★

पांच

# स्वप्न

◇ ◇ ◇

**बगलेंत** दोन उशा अन् एक पातळशी चादर घेऊन सतीश आपल्या केबिनमधून बाहेर पडला नि जिना चढून वर बाहेर डेकवर आला. डेकच्या दोन्ही टोकांपर्यंत डावी उजवीकडे त्यानें नजर टाकली. सगळे डेक प्रवाशांनीं फुलून गेलें होतें. छे! एकहि डेक-खुर्ची रिकामी नव्हती. मागच्या डेकवर तरी एखादी खुर्ची मिळतेय कीं काय हें पाहाण्यासाठीं त्यानें बोटींत एक प्रदक्षिणा पुरी केली. पण सगळ्या खुर्च्या प्रवाशांनीं अडवलेल्या होत्या. ज्यांना खुर्च्या मिळालेल्या नव्हत्या ते खालीं जमिनीवर बैठका आंथरून गप्पा मारीत बसले होते. कांहीं हातपाय लांब पसरून आरामांत पडले होते. 'स्ट्रेथमोर बोट' तांबड्या समुद्रांतून चालली होती. हवेंतला उकाडा वाढत होता. अंगाची तलखली होत होती. समुद्राचा नाहीं पण बोटींतल्या गोऱ्या प्रवाशांचा रंग मात्र या उष्म्यानें तांबडा बनला होता. वारुळांतून मुंग्या बाहेर पडाव्यात तसे केबिनमधून प्रवासी बाहेर पडले होते नि दिवस रात्र बहुतेक वेळ डेकवरच घालवीत होते.

खालच्या डेकवर कुठें जागा न मिळाल्यामुळें तो सगळ्यांत वरच्या छोट्या डेकवर गेला. सुदैवानें हा डेक मोकळाच होता. फक्त समोरच्या कोपऱ्यांत दोन चार प्रवासी अंधारांतच गप्पा मारीत बसले होते. इथें एकहि दिवा नव्हता, अगर असला तरी लावलेला नव्हता अन् असला

तर शोधून काढून तो लावण्याची जरूरी नव्हती. वर आकाशाच्या पोकळींत ज्या असंख्य तारे-तारका चमचमत होत्या त्यांचा अंधुक प्रकाश डेकवरच्या कांहीं भागांवर पडला होता. सतीश त्या अंधुक प्रकाशांत पुढें सरकून डाव्या हाताच्या कोपऱ्याकडे वळला. तिथें बाजूला असलेली एक खुर्ची त्यानें कठड्याजवळ ओढून घेतली. बगलेंतल्या उशा मस्तकाखालीं घेतल्या. डेकच्या कठड्याच्या रुंद लोखंडी जाळींत त्यानें पायाचीं बोटें गुंतविलीं नि पाय लांब करून तो आरामांत पडला. अमावास्येच्या जवळपासची रात्र असावी. कारण आसमंतांत अंधार दाटलेला होता नि नक्षत्रें व चांदण्यांनीं आकाश फुलून गेलें होतें. वातावरण निस्तब्ध होतें. समुद्र शांत होता. बोट यत्किंचितहि हालत नव्हती. ढगावरून चंद्र जसा सरकत जातो तशी ती भव्य बोट जललहरीवरून हलकेंच पुढें सरकत होती. जणूं ती सागराच्या पृष्ठभागावरून चालली नसून आकाशाच्या अंधाऱ्या पोकळींतून अधांतरीं तरळत चालली होती! कुठल्या तरी अज्ञात जगाकडे निघाली होती.

घर—भारतभूमीचा किनारा—खूप दूर, चार दिवसाच्या वाटेवर मागें पडला होता. पण घरच्या आठवणी मात्र अजून पुरत्या दूर सरकल्या नव्हत्या. बोटीवर पोंचवायला आलेल्या नातलगांचा नि मित्रांचा जमाव नजरेसमोर दिसे, तर क्षणांत वियोगाच्या अश्रूंनीं डबडबलेला पण मुद्दाम हंसरा बनविलेला आपल्या प्रियपत्नीचा—सुषमेचा—चेहरा दिसे. छोट्या माधुरीची बालमूर्ति आठवे. अन् या साऱ्या आठवणींनीं तो अधूनमधून अस्वस्थ होई. पण आतां या क्षणीं तर तो विलक्षण बेचैन बनला. प्रियजनांपासूनच नव्हे तर एकंदर जनसंपर्कापासून बाजूला पडून आपण एकटेच आकाशाच्या गूढ अनंत पोकळींत कुठें तरी चाललों आहोंत, आसपास सोबतीला कुणी कुणी नाहीं, एकटे अगदीं एकटे आहोंत, अशा एकलेपणाच्या जाणीवेनें तो बेचैन झाला, घाबरला.

ही जाणीव, ही भीति घालवण्यासाठीं मस्तक उचलून तो मोठ्यानें स्वतांशींच कांहीं तरी पुटपुटला. नीट व्यवस्थित असलेल्या मस्तकाखालच्या मऊ मऊ उशांची त्यानें उगीचच चाळवाचाळव केली. पुन्हां त्या होत्या

तशा नीट ठेवल्या. नाइट ड्रेसच्या खिशांतून सिगरेटची चांदीची डबी नि लायटर काढला. त्या लायटरचा डबीवर जोरजोरांत आघात करून त्यांतून तो विविधप्रकारचे निनाद काढूं लागला. अर्थात् त्यांतून कुठल्याहि संगीताचे सूर काढण्याचा त्याचा उद्देश नव्हता. संगीतांतलं त्याला फारसं कळतहि नव्हतं पण एकांताचा भंग करण्यासाठीं, एकलेपणाची जाणीव घालवण्यासाठीं, त्याचा हा सारा खटाटोप चालला होता. अन् म्हणून शक्य तेवढ्या मोठ्यानें तो आवाज करीत होता, गुणगुणत होता. कांहीं वेळानें त्यानें डबी उघडून सिगरेट काढली नि लायटर पेटवला. आवतीं-भोंवतीं प्रकाश पडला, तेव्हां त्याला बरं वाटलं. माणसाच्या मनांतला एकाकीपणा घालविण्याचें प्रकाशांत किती विलक्षण सामर्थ्य असतें याचा या क्षणीं त्याला प्रथमच अनुभव आला.

सिगरेट पेटवतां पेटवतां त्यानें सहज आसपास नजर टाकली, अन् तो एकदम दचकला. उजव्या बाजूला केवळ हातभर दूर एका आरामखुर्चीवर कुणीतरी पहुडलें होतें. निळसर गाऊन नि खांद्यावर रूळत असलेले केस अस्पष्ट दिसले. पण तेवढ्यावरूनहि ती व्यक्ति एक स्त्री आहे हें त्याच्या लक्षात आलें. त्यानें झटकन् लायटर बंद केला. आपल्या जवळ पलीकडे कुणी मानवीप्राणी असेल याची त्याला कल्पनाहि नव्हती. आपण अगदीं एकटे आहोंत अशा समजुतीनें त्यानें जे चाळे केले होते त्याची त्याला शरम वाटली. तो वरमला. मनांतून त्या स्त्रीवर चिडला. पण शिष्टाचार आठवून त्यानें लगेंच म्हटलें, ‘ माफ करा हं. आपण पलीकडे आहांत याची मला कल्पनाहि नव्हती. आपल्या एकांताचा माझ्या हातून भंग झाला.’

असें म्हणतां म्हणतां तो खुर्चीतून उठला आणि खुर्ची अलिकडे दूर ओढून घेऊं लागला. तेवढ्यांत त्या स्त्रीनें म्हटलें, ‘ छेः छेः ! माझ्यासाठीं तुम्ही नका जागा बदलूं, निर्मनुष्य एकान्त जागा समजून तुम्ही इथें आलांत, तेव्हां तुमच्याच एकान्ताचा भंग मीं केला.’

पुन्हां खुर्ची पहिल्या जागेवर सरकवून त्यांत बसत त्यानें हंसत म्हटलें, ‘ हो, खर आहे. पण त्याबद्दल मी तुमचे फार फार आभार मानतो.’

तीहि हंसली. त्यानें तिच्याकडे पाहिलें. पण त्या अंधुक प्रकाशांत रंग, रूप, वय कांहीं ओळखूं येत नव्हतें. फक्त पडछायारूप एक मानवी आकृति दिसत होती. पण तिच्या शब्दस्वरावरून व हास्यध्वनीवरून ती प्रौढ असावी असें त्याच्या लक्षांत आलें. तिचा आवाज किंचित् घोगरा आहे, पण स्नेहभाव उत्पन्न करणारा आहे हें त्याच्या कानांना कळलें नि त्याला बरें वाटलें. ती व्यक्ति प्रौढ असो, वृद्ध असो, स्त्री असो अगर पुरुष असो, पण एकलेपणा घालविणारा मानवी प्राणी आपल्या जवळपास आहे हें पाहून त्याचें चित्त स्वस्थ झालें. शेजारच्या खुर्चींत स्त्री असली तरी ती प्रौढ आहे या जाणिवेमुळें मनांतला संकोचहि नाहींसा झाला नि मग निःसंकोच मनानें तिच्याशीं संभाषण सुरू केलें.

खालीं नृत्यालयांत संगीत चालू होतें. त्या संगीताचे सूर हवेंत मृदु बनून कानांवर पडत होते. तें गीत तिला येत असावें. कारण बोलतां बोलतां मध्येंच ती स्तब्ध झाली नि त्या संगीताची साथ धरून तिनें एक कंपित लकेर घेतली. गातांना तिचा गळा अधिकच घोगरा होतो हें त्याला कळलें. तिचा आवाज मुळचाच घोगरा आहे कीं प्रौढावस्थेचें हें लक्षण आहे हें कळायला अर्थातच मार्ग नव्हता.

गातां गातां ती मध्येंच एकदम थांबली नि म्हणाली, ‘ माणूस मोठा विचित्र प्राणी आहे नाहीं? कित्येक वेळां त्याला सगळ्या कोलाहलापासून, सगळ्या आनन्दापासून, जनसम्पर्कापासून दूर जावंसं वाटतं.’

त्यानें हंसून म्हटलें, ‘ पण एकटं राहणं ही माणसाची सहज प्रवृत्ति नसल्यामुळें तो फार वेळ एकटा राहूंच शकत नाहीं. आणि म्हणून–’

तिनें मध्येंच म्हटलें, ‘ आणि म्हणून तो आपल्या अस्तित्वाची जाणीव दुसऱ्याला करून देत असतो.’

तिच्या वाक्यांतील खोच लक्षांत येऊन तो हंसला. त्यानें म्हटलें, ‘ दुसऱ्याला नाहीं. स्वतःलाच. स्वतःलाच अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठीं मघां धडपड चालली होती.’

ती थोडा वेळ स्तब्ध राहिली. नन्तर तिनें म्हटलें, ‘ तुमचा ‘ इंडिया ’ फार सुंदर आहे असं ऐकतें.’

'शंभर टक्के खरं आहे. तो किती सुंदर आहे हें प्रत्यक्ष बघितल्याशिवाय कल्पना येणार नाहीं.'

'तसा थोडासा बघितला आहे मीं. कांहीं पार्क्स् बघितले, ताजमहाल बघितला.'

'वाः मग बरेंच बघितलेंत असें म्हणायला हरकत नाहीं. कारण, ताजमहाल हें भारताचं एक सौंदर्य आहे. किती दिवस होतात भारतांत?'

'दिवस कुठचे? तास म्हणा. अवघे सहा तास मुंबईत बोट थांबली होती, तेव्हां आम्ही कांहीं मंडळींनीं किनाऱ्यावर उतरल्याबरोबर ताजमहालची चौकशी केली. आणि मग एका टॅक्सीवाल्यानें आम्हाला थेट ताजमहालच्या दाराशीं नेऊन सोडलं. फारच सुंदर आहे ताजमहाल! चित्रांत बघितले होते तसेच घुमट. मनोरे सुन्दर. पण आमची थोडीशी निराशा झाली.'

सतीशनें फुटणारें हंसू दाबलें. अंधार असल्यामुळें चेहऱ्यावरचें भाव लपविण्याचें कारण नव्हतें. त्यानें गंभीरपणें विचारलें, 'कां? निराशा कां झाली?'

'कारण तिथें आम्हाला कुठं राणीचं थडगं बघायला मिळालं नाहीं. ज्या राणीसाठीं बादशहानें हें उत्कट प्रीतीचं स्मारक बांधलं त्या राणीचं थडगं बघायला मिळालं असतं तर बरं झालं असतं. पण तिथं 'लंच' मात्र छान मिळालं.'

आतां मात्र त्याला हंसू दाबतां येईना. तो मोठ्यांदां हंसला. तें ऐकून ती स्त्री आश्चर्यानें निषेधदर्शक स्वरांत कांहींसें पुटपुटली. सतीशनें दिलगिरी प्रदर्शित केली आणि खरा ताजमहाल कुठें आहे तें त्यानें सांगितलें. तें सांगतां सांगतां भारताची पुष्कळशी माहिती त्यानें सांगून टाकली. ती मधूनमधून अनेक प्रश्न विचारीत होती. पण त्या प्रश्नांत प्रौढ माणसांत दिसून येणारी परिपक्वता अगर गाम्भीर्य नव्हतें. तरुणांची उत्सुकता नि किशोरांची बालिशताच अधिक होती. तो मनाशीं म्हणाला, 'पृथ्वीच्या पाठीवर कुठल्याहि स्त्रिया घ्या. स्त्रीजात इथूनतिथून सारखीच. स्त्री वयानें कितीहि वाढली तरी वृत्तीनें कांहींशी बालिशच राहते.'

मध्येंच तिनें विचारलें, 'तुम्ही प्रोफेसर आहांत ना?'

त्यानें आश्चर्यानें म्हटलें, 'तुम्हाला कसं माहीत?'

ती हंसली आणि म्हणाली, 'प्रोफेसरच्या पद्धतीनें तुम्ही माहिती सांगतां म्हणून, आणि—'

'आणि काय?'

'आणि तुम्ही मघांशींच म्हटलंत कीं मुंबईच्या कॉलेजमध्यें तुम्ही प्रोफेसर आहांत नि उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला चालला आहांत.'

आपल्या या विसरभोळेपणाबद्दल तो मनःपूर्वक हंसला. आपल्या देशाबद्दल त्याला कांहीं माहिती आहे का अशी तिनें पृच्छा केल्यावर तो हंसून म्हणाला, 'तुमचा देश मीं प्रत्यक्ष पाहिलेला नाहीं. पण न पाहिलेल्या देशाविषयीं कांहीं वाचतों ऐकतों तसं मींहि तुमच्या देशाविषयीं कांहीं वाचलंय्. ऑस्ट्रेलियन लोक खूप बोलके, मनमोकळे नि आनंदी असतात. म्हातारपणींसुद्धां ते मनानं तरुण राहूं शकतात. विशेषतः स्त्रिया.'

आतां त्यांच्यांत बराच मोकळेपणा निर्माण झाला होता. त्याचे शेवटचे उद्‌गार ऐकून ती हंसली व म्हणाली, 'मी म्हातारी दिसतें का?'

त्यानें हंसून म्हटलें, 'स्त्रियांचं वय सांगण्याचं महत्पाप कुठल्याहि पुरुषानं करूं नये.'

त्याच्याबरोबर तीहि मनमुक्त हंसली. गप्पा मारतां मारतां झोपेची गुंगी त्याच्या डोळ्यांवर चढली.

सकाळीं तो जागा झाला. तेव्हां शांत गाढ निद्रेनंतर येणारा टवटवीतपणा त्याच्या गात्रागात्रांना जाणवत होता. सूर्योदयापूर्वीच्या संधिप्रकाशानें वातावरण उजळलें होतें. मधूनच सागरावरून येणारी झुळूक मोठी सुखावह वाटत होती. समोरच्या शांत सागराचा नयनरम्य देखावा मनाला प्रसन्न बनवीत होता. गोड गुंगी डोळ्यांवर आली अन् त्यानें हलकेंच डोळे मिटले. एकटा असूनहि एकलेपणाची जाणीव होत नव्हती. रितें हृदय चैतन्यानें भरून गेलें होतें. रात्रींच्या आपल्या मनःस्थितीची त्याला आठवण झाली.

त्यानें एकदम डोळे उघडले, नि उशावर टेकलेलें मस्तक त्यानें झटकन् उजवीकडे वळवलें. रात्रीं त्याला सोबत करणारी, त्याचा एकाकीपणा घालवणारी स्त्री पलीकडे खुर्चीत गाढ निद्रेत होती. रात्रीं अंधारांत पडछायेप्रमाणें दिसणाऱ्या त्या स्त्रीच्या रेखा न् रेखा आतां स्पष्ट दिसत होत्या. विस्मयातिशयानें त्याची नजर तिच्यावर खिळली. आपण स्वप्नांत आहोंत कीं खरोखरच जागे झालों आहोंत हें त्याला कळेना. त्यानें डोळे मिटले, चोळले नि पुन्हां उघडले. स्वप्न नाहीं. सत्यच ! त्या स्त्रीच्या बाबतींत रात्रीं त्यानें केलेले अंदाज-सारे सारे अंदाज-चुकले होते. कारण ती स्त्री त्याच्या अंदाजाप्रमाणें वृद्ध नव्हती, प्रौढहि नव्हती. ती अगदींच तरुण, केवळ बावीस तेवीस वर्षांची होती; आणि ही तरुणी दुसरी तिसरी कुणी नसून जेवणाच्या दालनांत आपल्या पलीकडे चौथ्या टेबलावर चमकदार तांबूस सोनेरी केसांची, निळ्या डोळ्यांची, नि मृदु मुलायम गुलाबी गौर कांतीची, जी एक अत्यंत सुंदर मुलगी रोज जेवायला येऊन बसते तीच ही मुलगी आहे, असें त्याला दिसून आलें. बोटींत पाऊल टाकल्यापासून प्रत्येकजण ज्या सौंदर्याकडे टक लावून पाहातो तें सौंदर्य रात्रीं त्याच्या अगदीं निकट येऊन बसलें होतें. नुसतें मुग्धपणें बसलें होतें. तो कितीतरी वेळ तिच्याकडे टक लावून पाहात होता नि रात्रीचें बोलणें आठवून मनाशीं हंसत होता. थोड्या वेळानें तो हलकेंच उठून खालीं गेला.

त्यानें काळजीपूर्वक दाढी केली. स्नान आटपलें. तो कपडे चढवीत होता. तेवढ्यांत त्याच्याच केबीनमधला अय्यर बगलेंत उशा घेऊन आंत आला. उशा बर्थवर टाकून तो बर्थवर बसला नि सतीशच्या जादा नीटनेटकेपणाकडे निरखून पाहात त्यानें म्हटलें, ‘ काय रे, लंडनचा किनारा दिसूं लागला का ? ’

‘ कां ? ’

‘ नाहीं. तुझा हा जामानिमा चाललाय म्हणून विचारतों.’

‘ हा जामानिमा ? हा पायजमा नि हा नेहरू शर्ट याला जामानिमा म्हणतोस तूं ? कुठच्याहि राष्ट्रांत यापेक्षां साधा पोषाख सांपडणार नाही.’

30966 अनुक्रम ७७ विभाग प्रा वा 2396

‘खरं आहे… काय रे, सबंध रात्रभर तूं सांपडत मात्र नव्हतास कुठं ? अदृश्य कुठें झाला होतास रात्रभर ?’

‘आपण बोटींत आहोंत हें विसरूं नकोस. बोटींतून अदृश्य झालेली माणसें समुद्राच्या तळाशीं जातात.’

तेवढ्यांत न्याहारीची घंटा झाली. जेवणाच्या दालनांत जातांच त्यानें चौथ्या टेबलाकडे पाहिलें. तिची खुर्ची रिकामी होती. पण थोड्या वेळानें ती आली नि आपल्या जागेवर बसली. तिची आपली नजरानजर व्हावी नि रात्रीं झालेल्या ओळखीचें चिन्ह तिच्या नजरेंत दिसावें म्हणून तो वारंवार तिच्याकडे बघत होता. पण तिचें त्याच्याकडे लक्ष नव्हतें. आजूबाजूच्या मंडळींशीं ती गप्पा मारण्यांत गुंतली होती, रंगली होती. तिच्या आजूबाजूला बसलेल्या मंडळींकडे बघितलें कीं त्याला हंसूंच येई. लिलीच्या नाजूक रोपटाभोंवतीं वेडींवांकडीं झाडेंझुडपें उगवावींत तशी ती आजूबाजूची मंडळी त्याला वाटे. तिच्या डाव्या बाजूची बाई प्रमाणाबाहेर लठ्ठ नि बेढब होती. उजव्या हाताला बसलेला तरुण हाडकुळा नि घारीच्या नजरेचा होता. तिच्या समोर बसलेला प्रौढ गृहस्थ सबंध डोकेभर पसरलेल्या तुळतुळीत टकलामुळें म्हातारा वाटत होता. ही ठराविक मंडळी सबंध दिवस ब्रिज खेळत बसतात हें तो रोज पाहात होता. यापैकीं एकादा तिचा नातलग आहे कीं सगळे सहप्रवासी आहेत हें त्याला माहीत नव्हतें, नि त्याची जरुरीहि वाटली नाहीं. पण आज मात्र ही मंडळी त्याच्या डोळ्यांत सलूं लागली. रात्रीं अंधारांत झालेली ओळख अंधारांतच गडप होतां कामा नये असा मोह मनाला बजावूं लागला.

न्याहारीनंतर तो पुढच्या जिन्यानें वर दिवाणखान्यांत गेला. इतर प्रवासी आपआपली करमणूक करीत होते. पण त्याची नजर तिचा शोध घेत होती. ती त्याला तिथें दिसली नाहीं. तीच शोधक नजर फिरवीत तो बाहेर डेकवर आला. छे ! तिथेंहि कुठें ती नव्हती. समोर समुद्र अगदीं शांत होता. इतके दिवस पश्चिम दिशेकडे नाकासमोर जाणाऱ्या ‘स्ट्रेथमोर’ बोटीनें आता उत्तरेकडे तोंड वळवलें होतें. हवेंतहि आतां बराच बदल झाला होता. गेल्या दोन दिवसांचा उष्मा मागें तांबड्या समुद्रांत

राहिला होता नि हवेंत सुखद गारवा आला होता. आणि त्यामुळें प्रवाशांच्या मलूल वृत्ती पुन्हां टवटवीत झाल्या होत्या. बरेच प्रवासी सकाळच्या प्रसन्न हवेचा आस्वाद घेत बसले होते, गप्पांत रंगले होते. त्यानें सहज पण सहेतुक सबंध डेकवर चक्कर मारली, पण ती कुठें दिसली नाहीं. डेकच्या पुढच्या टोकाला जाऊन तिथल्या दरवाज्यानें तो आंत पुढच्या 'लाउंज' मध्यें शिरला. आणि ती तिथें त्याला दिसली. कसलेंसें एक मासिक चाळीत ती एका कोचावर अगदीं आरामांत रेलून पडली होती. तिची सडपातळ मूर्ति बिनबाह्याच्या गुलाबी फ्रॉकमुळें मोठी कमनीय दिसत होती. ते सोनेरी केस, ते निळे निळे डोळे—त्या सौंदर्यावरून नजर ढळवावी असें त्याला वाटेना.

त्याला पाहातांच तिनें हंसून अभिवादन केलें. त्या हास्यांत नुसता औपचारिकपणा नव्हता, पण रात्रीची ओळख स्पष्ट दिसून येत होती. त्याचें हृदय थरथरलें. त्याला बसायला जागा करून देण्यासाठीं ती उठली नि बाजूला सरकून बसली. पूर्वीं कधींहि न पाहिलेल्या त्याच्या नवीन धर्तीच्या पोषाखावर तिची नजर खिळली. तें पाहून तो हंसला नि तिच्या बाजूला बसला. त्याच्या पोषाखावरून आपली नजर न ढळवतां तिनें म्हटलें, 'इंडियन्स भल्या पहांटें उठणारे लोक आहेत असं मी ऐकत होतें तें खरं आहे.'

'ही संवय मोठी लाभदायक असते असं नाहीं वाटत तुम्हांला?'

त्याला आपादमस्तक न्याहाळून हंसत तिनें म्हटलें, 'तुमच्या देखण्या नि सुदृढ शरीराकडे बघून तसं वाटतं खरं!'

आपल्या देखणेपणाचा नि शरीरसम्पदेचा त्याला मोठा अभिमान होता. पण आतां या सौंदर्यवतीच्या तोण्डचे प्रशस्तीचे उद्गार ऐकतांच त्याचा अभिमान दुणावला. हृदय सुखावलें. कारण आपण तिच्या नजरेंत भरल्याची ही कबुलीच नव्हती का? त्यानें हंसून म्हटलें, 'छे हो! हा तर शाहाण्या लोकांनीं सर्वमान्य बनविलेला फायदा आहे. मी लाभ म्हणत होतों तो दुसराच.'

'आणखी कोणता?'

तो हंसला. 'लवकर उठलं कीं दूरचं सृष्टिसौंदर्य आणि जवळपास निद्रावस्थेंत असलेलं सौन्दर्य निःसंकोचपणानें न्याहाळतां येतें.'

शेवटचें वाक्य बोलतांना त्यानें आपल्या डोळ्यांत विशिष्ट भाव आणला नसता तरीसुद्धां ती त्याचा भावार्थ समजली असती. आपले मोठाले निळे डोळे त्याच्यावर रोखून ती अशा तऱ्हेनें हंसली कीं त्याचें सारें शरीर रोमांचित झालें. एकमेकांचीं हृदयें आकर्षित करायला शब्दांपेक्षांहि डोळ्यांतील भाव नि हावभाव अधिक प्रभावी नि परिणामकारक ठरतात, असा त्याला हळूहळूं अनुभव येऊं लागला. जिला आपण कल्पनेंत लिलीची उपमा दिली होती तिचें नांवहि लिली आहे हें ऐकून त्याला मोठी गंमत वाटली. बोट जसजशी पुढें सरकत होती तसतसा दोघांचा सहवास वाढत होता. अगदीं सुरळीत, बिनधोक, बिनविरोध!

पोहण्यासाठीं समुद्रांत पडलेल्या माणसानें स्वच्छन्दपणें पोहत एकसारखें पुढें पुढें जावें तसें तिच्या प्रणयरम्य सहवासांत तो धुंद बनून पुढें पुढें जात होता. त्याला मागच्या आयुष्याचा किनारा अगर पुढच्या जीवनाची जमीन, कांहीं म्हटल्या कांहीं दिसत नव्हतें. जीवनाचे दोन्ही किनारे दृष्टिपथापलीकडे गेले होते. त्याच्या दृष्टीला दिसत होतें तें फक्त वर निळें आकाश, खालीं निळा समुद्र अन् मध्यें त्याला बिलगून बसणारी नि आपल्या लाडीक हावभावांनीं वेड लावणारी निळ्या डोळ्यांची लिली. इतर प्रवाश्यांच्या नजरेंत भरण्याइतका दोघांचा सहवास वाढला होता. पण सागरावरील प्रवाश्यांची दृष्टि सागरासारखी विशाल असते. त्यांच्या दृष्टींत त्रयस्थपणा असतो अगर फार झालें तर बोटींतल्या इतर करमणुकीच्या साधनांसारखी ही पण एक गंमत आहे, असाहि भाव क्वचित् त्यांच्या नजरेंत दिसतो. पण खरें म्हणजे जो तो आपली करमणूक करण्यांत नि प्रवासांतले दिवस आनन्दांत घालविण्यांत गुन्तलेला असतो.

सतीशहि लिलीबरोबर विविध करमणुकींत भाग घेई. पण एखाद्या निवान्त कोपऱ्यांत बसून सागराची शोभा पाहात तास न् तास गप्पा मारणें अन् प्रणयरसाचा आस्वाद घेणें ही त्याची मुख्य करमणूक होती. तिची ज्या तऱ्हेनें प्रथम ओळख झाली तो अद्‌भुतरम्य प्रसंग त्याला

वारंवार आठवे अन् या गंमतीदार योगायोगांत ईश्वराचा कांहीं तरी हेतु असला पाहिजे असेंहि वाटे. गेल्या चौदा दिवसांत जें उत्कट प्रेम आपण अनुभविलें त्याची आपणाला स्वप्नांतसुद्धां कधीं कल्पना आली नव्हती. दिवस भराभर जात होते. सुएज गेलें, पोर्ट सैय्यद मागें पडलें. मार्सेल्सहि मागें पडलें. लंडन जसजसें जवळ येऊं लागलें तसतसा तो अस्वस्थ होऊं लागला. कारण लिली लंडनलाच उतरणार होती. पण 'ओकवुड'ला तिची आत्या होती, तिच्याकडे ती राहणार होती. म्हणजे ती 'ओकवुड'ला नि आपण लंडनला. तेव्हां तिथें कांहीं रोज भेटतां येणार नाहीं आणि आतां तिच्याशिवाय एक दिवसहि आपणांला एकटें राहतां येणार नाहीं अशा अवस्थेला आपलें प्रेम पोहोंचलें आहे.

तिच्यापासून दूर राहावें लागणार ही कल्पना त्याला बेचैन करूं लागली. त्याचें प्रेम नजरेंत आणि विविध भावनाविकारांत व्यक्त होत असलें तरी शब्दांत तें त्यानें स्पष्टपणें व्यक्त केलें नव्हतें. पण आतां तसें केल्यावांचून गत्यन्तर नाहीं हें त्याला कळून चुकलें. त्या दिवशीं रात्रीं नृत्याचा कार्यक्रम आटोपल्यावर दोघें आपआपल्या केबिनकडे जायला निघाले तेव्हां जिन्यावर दबकून तिनें विचारलें, 'आज तूं असा अस्वस्थ कां दिसतो आहेस ? मघां नृत्याकडे तुझं बिलकुल लक्ष नव्हतं. असं कां ? काय झालं ?'

तिच्या रंगविलेल्या लालचुटुक ओठांवर नजर खिळवून तो पुढें वाकला. पण लगेंच पुन्हां सरळ होत त्यानें म्हटलें, 'आतां नको. सकाळीं सांगेन.'

ती समजली, हंसली नि आपल्या केबिनकडे निघून गेली.

ती गेल्यावर त्याला वाटलें कीं आतांच सांगून टाकलें असतें तर फार बरें झालें असतें. मग बिछान्यावर पडल्या पडल्या सकाळीं काय सांगायचें हें त्यानें निश्चित केलें. लंडनला गेल्यावर तिथें रोज कसें भेटतां येईल याचा तो विचार करूं लागला. विचार करतां करतां एकदम त्याच्या लक्षांत आलें कीं, आपणा दोघांना एकत्र राहाणें अगदीं सहज शक्य आहे. कारण लिलीच्या आत्याचें घर मोठें आहे अन् ती पेइंग गेस्टस्

घेते असें बोलतां बोलतां लिलीनें आपणांला सांगितलें होतें. तेव्हां सकाळीं तिला सांगायचें कीं तुझ्या आत्याच्या घरांत मला खोली मिळवून दे. लिली पहिल्या प्रथमच आत्याच्या घरीं जात असली तरी खोली मिळवून देण्याचें काम निश्चित करील. कारण घरांत पाऊल टाकल्याबरोबर एक पेइंग गेस्ट मिळवून दिल्याबद्दल आत्या भाचीच्या व्यवहारदक्षतेचें कौतुकच करील. एकत्र राहाण्याचा हा मार्ग दिसल्याबरोबर त्याची अस्वस्थता एकदम कमी झाली. एकाच घरांत तिच्याजवळ आपण राहात आहोंत हें चित्र आणि त्याच्या पुढचींहि कित्येक चित्रें तो मिटल्या डोळ्यांनीं पाहूं लागला.

सकाळीं तो जागा झाला तो कुणीतरी ढकलून दिल्याचा भास होऊन दचकून जागा झाला. त्यानें डोळे उघडून पाहिलें; चांगलेंच उजाडलें होतें, अन् बोट विलक्षण हालत होती. त्यानें मस्तक उंचावून 'पोर्ट होल' कडे पाहिलें. बाहेर उसळणाऱ्या उंच उंच लाटांखेरीज कांहीं दिसत नव्हतें. बर्थ क्षणांत एका बाजूला तर क्षणांत दुसऱ्या बाजूला एवढा झुकत होता कीं, कोसळून बर्थवरून खालीं पडूं कीं काय असें वाटत होतें. केबिन-मधल्या वस्तु जागच्या जागीं डोलत होत्या, तर कित्येक धडाधड कोसळत होत्या. त्यानें इतर बर्थवर नजर फिरवली. अद्याप कुणीहि डोकें उचललेलें नव्हतें. त्यानें घड्याळांत पाहिलें. साडेआठ वाजून गेले होते. म्हणजे न्याहारीची घंटा झोंपेंतच होऊन गेली असावी. तो उठला. छे: छे: ! स्थिर उभें तरी कुठें राहतां येत होतें ! दारुड्यासारख्या झोकांड्या जात होत्या. तेवढ्यांत स्टुअर्ड हातांत कागदाचे मोठमोठाले द्रोण घेऊन आंत आला नि प्रत्येकाच्या बर्थवर त्यानें एक एक द्रोण ठेवून दिला. बोट लागून उलट्या होणाऱ्यासाठीं ही पूर्वतयारी होती हें त्याला आतां माहीत झालें होतें. त्यानें कसेंबसें तोंड धुतलें. चहा-टोस्ट घेतला नि तो केबिन-बाहेर पडला. आजूबाजूच्या केबिन्समधून उलट्यांचे आवाज येत होते.

जिकडे तिकडे शुकशुकाट होता. जणूं बोटींत कुणी प्रवासीच नव्हते ! बोटीवरचा नोकरवर्ग मात्र रोजच्याप्रमाणें चपल हालचाल करीत आप-आपल्या कामांत व्यग्र होता. तें पाहातांना त्याच्या मनांत आलें, सदोदित

सागराच्या पाठीवर राहणारे हे लोक! समुद्र शांत असो अगर उफाळलेला असो. बोट घरासारखी स्थिर असली तरी अगर अशी पिसाटासारखी हालत असली तरी या लोकांची शांति ढळत नाहीं, यांची कार्यक्षमता कमी होत नाहीं, कीं यांच्या चपल हालचालींत मंदपणा येत नाहीं. सागराच्या लहरीपणाचा, त्याच्या रागलोभाचा या लोकांवर कांहीं परिणाम होत नाहीं. खरेंच साधूंनाहि असली स्थितप्रज्ञता साधणार नाहीं!

जिना चढून तो वर बैठकीच्या दालनांत आला. सारे कोच रिकामे पडले होते. खिडकींतून त्यानें बाहेर डोकावलें. बाहेर डेकवर जाण्याची सोय नव्हती. साऱ्या डेकवर जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें होतें. सभोंवार सागराचें तांडव चाललें होतें. किती उग्र! किती भीषण! साऱ्या दिशा कोंदून गेल्या होत्या. क्षणांत समुद्र उसळत उसळत थेट आकाशाला भिडे अन् आकाश त्याच्या पोटांत गडप होई. वर पाणी, खालीं पाणी, सारें ब्रह्मांड जलमय होऊन जाई, तर दुसऱ्याच क्षणाला आकाश समुद्राला दाबीत इतकें खालीं उतरे कीं सागर लुप्त होऊन आकाश डेकच्या कडेला टेकलेलें दिसे. जणूं सागर अन् आकाश यांचें द्वंद्वयुद्ध चाललें होतें! उंच उसळणाऱ्या लाटांचे तडाखे बोटीला बसत होते नि पाण्याच्या फवाऱ्यांनीं डेक धुतलें जात होतें. खारट पाण्याचे तुषार त्याच्या तोंडावर उडत होते. लाटांच्या तडाख्यांनीं बोट इतकी झुकत होती कीं बघतां बघतां उलटी होऊन तळ गांठणार कीं काय असें वाटत होतें.

बोटींत पाऊल ठेवल्यापासून गेल्या २६ दिवसांत त्यानें सागराचें विविध रंग नि विविध रूपें बघितलीं होतीं. अरबी सागराचा हिरवट निळसर रूपरंग नि उच्छृंखल वृत्ति त्याच्या तरुण हृदयाला समानस्वभावी दिसली अन् म्हणूनच उल्लसित करणारी वाटली. भूमध्य समुद्राचा घननीळ वर्ण अन् शांत, धीरोदात्त पण प्रसन्न स्वभाव पाहातांना कुणाचेंहि मन प्रसन्न व्हावें. सागराचीं हीं दोन्ही रूपें त्यानें पाहिलीं. अन् आतां 'बिस्के'च्या उपसागरांत उभें राहून अटलांटिक महासागराचें रौद्र भीषण स्वरूप तो पाहात होता. त्या खवळलेल्या अफाट महासागरावर ती बोट

कल्पटासमान वाटत होती. या महासागरानें ही बोट अशीच गिळली तर! कुठल्याहि क्षणीं तें शक्य होतें. म्हणजे इथेंच जलसमाधि! इथेंच मृत्यु!

या विचारासरशी तो झटकन् खिडकीजवळून दूर झाला नि जवळच असलेल्या कोचावर मटकन् बसला. पण बसल्या बसल्याहि समोरचें भयानक दृश्य दिसत होतें. त्यानें आपले डोळे मिटून घेतले नि कुशनवर डोकें टेकून तो पडून राहिला. पण मिटल्या डोळ्यांनाहि मृत्यूची छाया दिसत होती. संकटाच्या भीतीनें त्याचें मन चरकलें. अन् त्या मनाच्या अवस्थेंत त्याला एकदम आपल्या घरची आठवण झाली, आपल्या पत्नीची आठवण झाली, छोट्या मुलीची आठवण झाली. ही आठवण होतांच दुसऱ्या अनेक गोष्टी आठवल्या.

बोटींत पाऊल ठेवल्यापासून आजमितीला आपण घरीं एकहि पत्र पाठवलें नाहीं. बोटींत चढतांना आपण सुषमाला आश्वासन दिलें होतें कीं बोटींतून जेव्हां जेव्हां टपाल निघेल तेव्हां तेव्हां तुला मी पत्र पाठवीत राहीन. पण अजून आपण एकहि पत्र पाठविलें नाहीं. कोणकोणत्या दिवशीं तिला पत्रें मिळतील त्याच्या तारखाहि आपण तिला सांगितल्या होत्या. त्या त्या दिवशीं तिनें वाट पाहिली असेल. पण तिन्हीहि तारखा तशाच निघून गेलेल्या पाहून ती निराश झाली असेल. निराशा, राग, रुसवा, कुठचीहि भावना तिच्या मनांत दाटली कीं रात्रीं उशींत डोकें खुपसून अश्रु गाळण्यांत त्या भावनांचा शेवट होतो.

आपलें इंग्लंडला येण्याचें नक्की झालें. पॅसेज मिळाला, तेव्हांपासून अगदीं बोटींत बसेपर्यंत तिचें मन रोज कांहीं ना कांहीं कारणावरून बोलतां बोलतां भरून येत असे; आपणाला वाटे, बराच काल आपण दूर राहणार, तेव्हां वियोगाच्या विचारानें तिचें मन भरून येणें स्वाभाविक आहे. एक दिवस असेंच बोलतां बोलतां तिचे डोळे पाण्यानें भरून आले. तेव्हां आपण म्हटलें, 'सुषमा, वेडी आहेस का तूं? आपल्या माधुरीच्या खेपेला तूं माहेरीं सहा महिने माझ्यापासून दूर राहिली नव्हतीस का?'

डोळे पुसून तिनें म्हटलें, 'ती गोष्ट वेगळी होती. तुम्ही इथें होतात—या देशांत होतात. पण आतां तुम्ही इंग्लंडला जाणार म्हणून भीति वाटते.' बोलतां बोलतां पुनः तिचे डोळे भरून आले.

आपण म्हटलें, 'भीति कसली वाटते? बोट बुडेलबिडेल म्हणून?'

आपल्या तोंडावर चटकन् हात ठेवून तिनें म्हटलें, 'भलतंच काय बोलतां?... नाहीं. ती भीति नाहीं'

'मग? मग कसली भीति?'

'तुम्ही मला दुरावाल—विसराल—'

तिच्या आर्त कंपित स्वरावरून तिच्या म्हणण्याचा अर्थ आपल्या लक्षांत आला. पण आपण चेष्टेनें म्हटलें, 'म्हणजे! पुरुष इतका विसरभोळा असतो कीं काय?'

तिनें म्हटलें 'तो तसा नसला तरी मोह त्यांना विसरभोळा बनवतो. इंग्लंड ही मोहनगरी आहे. पुरुषांना बिघडवणाऱ्या अनेक गोष्टी तिथें असतात, सुंदर सुंदर विलासी स्त्रिया, दारू, नाच—'

आपण मध्येंच चेष्टेनें म्हटलें, 'छेः छेः! फारच भयंकर वर्णन करते आहेस तूं, आपल्या माजी राज्यकर्त्यांच्या देशाचें.'

तिनें ठांसून म्हटलें, 'भयंकर असलं तरी सत्य आहे. सिंधूचा नवरा इंग्लंडला शिकण्यासाठीं म्हणून गेला, तिकडेच राहिला. आज आठ वर्षे होऊन गेलीं. पुरुषांना मोह—'

'पुरुषांना मोह होतो नि स्त्रीला कधीं मोह होत नाहीं?'

'होतो. मनुष्यमात्राला मोह होतो. पण दोघांच्या मनोवृत्ती भिन्न असतात पुरुषाची मनोवृत्ति पाण्यावर तरंगत जाणाऱ्या बोटीसारखी असते, अन् स्त्री ही पाणबुड्या बोटीसारखी असते. पुरुषांत जीवनाचा खोल विचार, संयम नसतो. स्त्री भावनाशील असली तरी भटकत—वाहात जात नाहीं. ती संयमशील असते.'

आपणांत संयम नाहीं, हेंच तिला सांगायचें होतें. तें पाहून आपण रागानें म्हटलें. 'तुझ्या त्या सिंधूच्या नवऱ्यासारखा मी पण वाहात जाईन असें तुला वाटत असेल तर मी जातच नाहीं!'

'नाहीं. नाहीं. तुम्ही जा. पण–' बोलतां बोलतां तिचा स्वर कांपरा झाला. डोळे भरले. तिनें म्हटलें, 'जा. पण कुठल्याहि मोहांत पडूं नका. पतीचें चारित्र्य स्त्रीला मोलाचें वाटतें. निष्कलंक चारित्र्याचा अन् एकनिष्ठ प्रेम करणारा पुरुष गरीब असला, काळा कुरूप असला तरीसुद्धां त्याचा पत्नीला अभिमान वाटतो, तिला धन्यता वाटते.'

तिला आपण जवळ घेऊन म्हटलें, 'तुला माझा अभिमान वाटेल, धन्यता वाटेल असाच मी राहीन.'

पण आपण थोडें घसरलोंच. मोहांत पडलोंच. मोह हा धुक्यासारखा असतो. धुकें हां हां म्हणतां अगदीं नकळत पसरतें, घनदाट बनतें. मोहाचेंहि तसेंच असतें. गेल्या पंधरा दिवसांत मोहाचें जें धुकें आपणां-भोंवतीं दाटत गेलें...

तो हंसला. पण धुकें कांहीं फार वेळ टिकत नाहीं. प्रकाश आला कीं धुकें वितळतें. नाहीसें होतें.

संकटाच्या वेळीं माणसाला आपल्या घरच्या माणसांची आठवण व्हावी या गोष्टीचें त्याला कांहींसें नवल वाटलें. पण हृदय ढवळून निघतें, तेव्हां खऱ्या प्रेमाचेंच दर्शन होतें. मोहाचें धुकें आतां नाहींसें झालें होतें.

गेल्या पंधरा दिवसांतल्या प्रसंगाकडे त्यानें मागें वळून पाहिलें. त्या प्रसंगाचा विचार करतांना त्याच्या मनांत आलें माणसाच्या आयुष्यांत येणारे हे असले मोहप्रसंग–हे मोहक्षण–म्हणजे जागृतावस्थेंतील स्वप्नें आहेत. आणि स्वप्नें कांहीं खरीं नसतात, कायमचीं नसतात.

विचार करतां करतां बऱ्याच वेळानें त्यानें डोळे उघडले. ॲटलांटिक महासागर आतां बराच शान्त झाला होता, आणि पंधरा दिवसांच्या स्वप्नांतून तोहि आतां सम्पूर्ण जागा झाला होता.

★

सहा

# प्रकाश

◇ ◇ ◇

'काय करतोय्स रे ?'

प्रकाश गच्चीच्या कट्ट्यावर बसून खालीं मान घालून कसलेंसें चित्र बघण्यांत गुंग झाला होता. त्यानें मान वर न करतांच म्हटलें, 'आली का गोरी मडम ?'

अन् मग मागें वळून दाराच्या चौकटींत उभ्या असलेल्या गोऱ्या मडमेकडे त्यानें बघितलें. आपले मूळचे फुगीर गाल फुगवीत, नाकपुड्या फुलवीत मडमेनें म्हटलें, 'बघ हं गोरी मडम म्हटलेंस तर ! अशानें घरीं निघून जाईन मी !'

'हात्तिच्या ! जाईनास का ! तुलाच गंमत नाहीं बघायला मिळायची. आमचं काय जातंय् !' त्यानें पुन्हां चित्रांत डोकें खुपसलें. पण मडम पुढें येते कीं खरोखरच निघून जाते याचा शोध डोळ्यांचे कोपरे घेतच होते.

'न मिळेना, अडलंय् माझं !' म्हणण्याचा तिचा स्वभाव. पण—पण प्रकाशला तसें म्हणून कसें चालेल ? तो रोज कितीतरी गंमती दाखवतो, किती छान छान गोष्टी सांगतो, अन् तेवढ्यासाठीं शाळा सुटली रे सुटली कीं घरीं केव्हां एकदा दप्तर फेकून, घाईघाईनें चहा पिऊन प्रकाशकडे केव्हा धाव घेतें असें तिला व्हायचें. ती दारांतून बाहेर गच्चीवर आली, त्याच्याजवळ जात तिनें विचारलें, 'काय आहे रे तें ?'

बाजूला सरकून त्यानें तिला आपल्या शेजारीं बसायला जागा करून दिली अन् ती बसल्यावर त्यानें तिच्यासमोर तें चित्र धरलें, 'हें बघ न्नू, हें काय आहे ?'

'अय्या ! बोट !! केवढी मोठी रे ! याच बोटींतून तुमचे दादा परवां विलायतेला गेले का रे ?'

त्यानें मान हालविली. त्याचा चेहरा एकदम खुलला. तो म्हणाला, 'या बोटीचं नांव काय आहे माहीत आहे का ? सिलेशिआ !'

'शिलशा ?'

'नाहीं ग, सि-ले-शि-आ ! म्हण बघूं...हं. केवढी मोठी बोट आहे ही. बोट म्हणायचीच नुसती. पण जरासुद्धां हालत नाहीं. जणू मोठा राजवाडाच. आपण त्या जलदेवतेच्या गोष्टींत समुद्राच्या तळाला असलेल्या राजवाड्याचं वर्णन वाचलं होतं ना, अगदीं तसाच ग. अन् आंत दिवे तरी किती ! सगळीकडे झगझगाट. दिवाळी नुसती. अन् कितीतरी खोल्या–आकाशांतल्या चांदण्यांसारख्या — मोजतांसुद्धां यायच्या नाहींत एवढ्या. आणि माणसं तरी किती ! जणूं जत्राच भरलेली. सगळ्या आपल्या गोऱ्या मडमा !' लतूकडे वांकून बघत त्यानें खट्याळपणें म्हटलें, 'लते, तूं मोठी झालीस म्हणजे अगदीं त्या मडमेसारखी दिसणार बघ.' बोलतां बोलतां मधेंच थांबून त्यानें त्या चित्रांतल्या बोटीकडे निरखून बघितलें अन् बोट ठेवून म्हटलें, 'हीं गोलगोल भोकं दिसताहेत ना, यांना म्हणतात पोर्टहोल.'

'पोर्टहोल म्हणजे काय रे ?'

'म्हणजे– अं– अं– अग, गोल खिडकी. आपल्या घरांना खिडक्या नसतात का वारा-उजेड यायला ? तशा बोटींना पण या गोल खिडक्या असतात हो. बघ ही तिसऱ्या मजल्यावरची चौथी खिडकी आहे ना ? इथं आमच्या दादांची आहे कॅबिन. कॅबिन म्हणजे खोली ह. पण आपल्या घरांतल्या खोलीसारखी नसते कांहीं. राजवाड्यांतल्या खोलीसारखी असते.'

लतू चित्रांतल्या त्या गोल खिडकींतून आंतली ती खोली दिसतेय् कीं काय हें खालीं वांकून, निरखून बघत होती. प्रकाशनें समोर आकाशांत नजर टाकली. सूर्य नुकतांच क्षितिजाखालीं उतरला होता. तिकडे बघतां बघतां कोपरानें लतूला ढोसून त्यानें म्हटलें, 'लते, लते ! समोर बघ.

दूर समुद्र दिसतोय्. दिसतोय् ना? आणि त्यांतून बघ बोट चाललीय्. अं! दिसतेय ना?'

लतूनें डोळे संकुचित करुन नजरेची दुर्बीण करुन बघितलें अन् हसून म्हटलें, 'अहा रे वेड्या! तो समुद्र का? अरे आकाश आहे तें! आतां सूर्य मावळलाय ना? म्हणून तसा रंग दिसतोय्.'

त्यानें गंभीरपणें विचारलें, 'समोरची दिशा कोणती?'

'ए हे ऽऽ रे! एवढं माहीत नाहीं? अरे पश्चिम!'

'मला माहीत आहे ग. पण तुला माहीत आहे कीं नाहीं तें पाहिलं. पश्चिमेला आहे अरबी समुद्र अन् आईनं सांगितलं आहे कीं इंग्लंड पश्चिमेला आहे नि इंग्लंडला निघालेली बोट अरबी समुद्रांतूनच जाते. मग आतां दादांची बोट तिथून जात नसणार का? तूं बघ ना नीट. दूरवर बघ. समुद्र दिसतोय नि त्याच्यांतून बोट चाललीय्!'

लतूनें डोळ्यांची दुर्बीण क्षितिजरेषेवर स्थिर केली; पण छे! फक्त डोळेच दुखले. त्रासून नि कांहीं निराश होऊन ती म्हणाली, 'तुलाच कसं दिसतं रे? मला नाहीं कांहीं दिसत!'

त्यानें म्हटलें, 'अग, तुझे डोळे निळे आहेत ना? म्हणून नसेल दिसत तुला. माझे डोळे काळे आहेत.'

तिला पटलें. तिनें म्हटलें, 'खरं रे खरं. शेजारचा वसंत नखाला काजळ लावतो तेव्हां त्यांत तुलाच हनुमान् हात जोडून उभा असलेला दिसतो, नाहीं? आणि जोशीकाकांकडे परवां ते आजोबा आले होते त्यांच्या डोळ्यांत हनुमान् यायचा तो तुलाच दिसायचा नि मग सगळे तुलाच बघायला सांगायचे नि खूपखूप प्रश्न विचारायचे, नाहीं रे? तुलाच दिसतं सारं. बघूं तुझे डोळे!'

छोट्या प्रकाशनें आपले काळेभोर मोठाले डोळे तिच्यावर रोखले. तेजानें, प्रखर प्रकाशानें डोळे दिपल्यासारखें होतात तशी डोळ्यांची उघडझांप करीत नजर काढून घेत तिनें म्हटलें, 'किती काळेकाळे रे तुझे डोळे!'

अन् मग अगदीं अंधार पडायला आला नि लतू आपल्या घरीं गेली तरीसुद्धां त्याच्या काळ्याकाळ्या डोळ्यांना क्षितिजाजवळून संथपणें सरकणारी ती मोठी बोट दिसत होती. अन् मनांत पण त्या बोटीएवढाले मोठेमोठे विचार चालले होते. दादा विलायतेला खूपखूप शिकायला गेलेयत. बॅरिस्टर होऊन येणार. मग कोण या काकांच्या नि आजोबांच्या घरांत राहतंय् ? शरद्, अरू सारखे भांडतात, नि खोड्या काढतात. नि आजोबांना सांगितलें तर ते कांहीं बोलत नाहींत कीं रागवत नाहींत. अन् अरू तरी किती घाणेरडा. दुसऱ्याच्या सदऱ्याला नाक पुसतो. आणि घर तरी कसलें जुनें ! नाहींतर मामांचा बंगला ! किती छान आहे. बगीचा तरी किती सुरेख ! दादा आले कीं मामांच्यासारखाच बंगला घ्यायचा. दादांनीं सांगितलेंच आहे नाहींतरी. मग किती गंमत येईल !

अन् मग रात्रीं तो बिछान्यावर पडला तेव्हां बोट क्षितिजापलिकडे अदृश्य होऊन तिथें आतां बंगलाच दिसूं लागला. किती वेळ झाली तरी झोपच येईना. शेवटीं अगदीं कंटाळून त्यानें डोळे उघडले. आई टेबलाजवळ बसून कांहींतरी लिहीत होती. दादा होते तेव्हां ते तिथेंच लिहीत बसायचे. आईचा चेहरा किती हंसरा दिसतोय. आई त्याला खूपखूप, दादांपेक्षां जास्त आवडायची. काकू कशी शरदला नि अरूला मारते अन् सदा ओरडते. आई आपल्याला कधींसुद्धां मारीत नाहीं. उलट अभ्यास शिकवते, छानछान गोष्टी सांगते नि पुस्तकें वाचायला आणून देते. आई पण खूप शिकलीय. दादांच्याबरोबरच आपण कॉलेजांत होतों म्हणून ती नव्हती का सांगत ? त्यानें हळूंच हांक मारली, 'आई, मला झोप येत नाहीं ग. माझ्याशीं थोड्या गोष्टी बोल ना ?'

लेखन थांबवून, उठून त्याच्या कॉटकडे जात तिनें हंसून म्हटलें, 'झोप बोटींतून पळाली का ? अन् आज लतू नव्हती का आली गोष्टी बोलायला ?'

'आली होती कीं ! आम्ही किनई खूप गोष्टी बोललों !' अन् लतूला सांगितलेल्या मोठमोठ्या बेतांची खात्री करून घेण्यासाठीं त्यानें विचारलें,

'आई ग, दादा आल्यावर आपण मोठ्या छान बंगल्यांत राहणार, नाहीं का ग?' तिनें हंसून कौतुकानें त्याच्या कपाळावरचे केस मागें सारून थोपटीत म्हटलें, 'अगदीं खरं! तुला मामाचा बंगला आवडतो ना? तसा बंगला घ्यायचा हं. पण हें बघ, मोठ्या बंगल्यांत राहणारीं मुलं किनई शाहाणीं असतात. तसं तुला झालं पाहिजे.'

गाल फुगवून लाडानें रुसव्या स्वरांत त्यानें म्हटलें, 'मग मी शाहाणा नाहीं वाटतं? शरद्-अरुसारखा मी कधींतरी हट्ट करतों का? रडतों का? त्यांच्यासारखे कपडे मळवतों का?'

तिला हंसूं आलें. प्रेमभरानें तिनें म्हटलें, 'छे! मुळींच नाहीं! तसा माझा प्रकाश खूपखूप शाहाणा आहे. हें बघ. आतां डोळे मिटून गुपचुप शाहाण्यासारखं झोपायचं हं.'

सागरावरून निर्वेध, निश्चितपणानें संथपणें सरकणाऱ्या 'सिलेशिआ' प्रमाणेंच दिवस सरकत होते, त्याची आई उल्हासानें पुढची तयारी करीत होती. तिनें नवीन टेबलक्लॉथ, कुशनकव्हरें कितीतरी भरायला घेतलें होतें. बंगल्यांत राहायला जायचे तर मग पुढची तयारी नको करायला? दिवसां भरतकाम करायची नि रात्रीं दादांना पत्र लिहीत बसायची. पोस्टाचीं तिकिटें जमविणें हा प्रकाशचा नवा उद्योग झाला होता. त्याच्याकडे इंग्लंडचीं कितीतरी तिकिटें जमलीं होतीं.

दहा महिने केव्हांच निघून गेले. दिवाळी पण आली नि गेली. पण या दिवाळीला कांहीं गंमतच नाहीं आली. काकांनीं फटाके थोडेच आणले नि शरद-अरुनें भांडून जास्त घेतले; नि आजोबा पण कसे त्यांचीच कड घेतात! जाऊं दे. दादा आले कीं दिवाळीला खूप फटाके उडवायचे.

त्या दिवशीं रविवार होता. प्रकाश आल्बममधें तिकिटें चिकटवीत होता. तितक्यांत आई आली नि तिनें म्हटलें, 'जा रे, प्रकाश; आजोबा खालीं आहेत का पाहा!'

खालीं जातांना तो मनाशींच विचार करीत होता, आईचें आजोबांकडे आतां काय बरें काम असावें? परवां आपण काकांकडे पुस्तक विकत घ्यायला पैसे मागितले तर 'आतां नाहींत माझ्याकडे सुटे' म्हणून त्यांनीं

आपणाला झिडाकारलें, तें तर आजोबांना सांगायला आई जात नसेल? छे! आपली आई कांहीं अशी चहाडखोर नाहीं. किती किती चांगली आहे. त्या दिवशीं काकांनीं असें झिडकारलें तेव्हां आईचा चेहरा कसा उदास झाला होता अन् म्हणून आपण खोटेंखोटें म्हटलें, 'अग आई, मला कांहीं आतांच पुस्तक नको आहे.'

अन् मग 'आजोबा खालीं आहेत' असा निरोप आणल्यानंतर जेव्हां आई खालीं गेली तेव्हा तोहि तिच्याबरोबर खालीं उतरला. त्या वेळीं त्याच्या मनांत विचार येत होता. आईचा चेहरा अलीकडे उदास दिसतो. असें कां? पूर्वींसारखी ती आनंदी दिसत नाहीं.

आई आजोबांच्या खोलींत दाराशींच उभी राहिली. 'आपणाला एक विचारायचें आहे.' आई आजोबांशीं नेहमींच हळू आवाजांत नि नम्रपणें बोलायची.

'काय?' आजोबांनीं चाळशी नाकावरून काढून बाजूला ठेवली.

'इथल्या मुलींच्या शाळेंत शिकवायला जावें म्हणतें मी.'

'नोकरी?' कांहींशा आश्चर्यानें आजोबांनीं विचारलें. 'ती कशाला? आम्ही असतांना तुला नोकरी करण्याची काय जरुरी?'

'छेः छेः! त्यासाठीं नव्हे कांहीं. आपण सर्व आहांतच. पण दुपारचें कांहीं विशेष काम नसतें, नि घरीं बसून माझा वेळ पण जात नाहीं, म्हणून म्हणतें.'

'बघ. जसा तुझा विचार.'

संध्याकाळीं नित्याप्रमाणें लतू आल्यावर त्यानें ती बातमी सांगितली. ती सांगतांना त्याचा गंभीर नि उदास झालेला चेहरा बघून तिनें कांहींशा आश्चर्यानें विचारलें, 'अरे, सुधाकाकू आपल्या शाळेंत बाई होणार म्हणून तुला आनंद नाहीं वाटत?'

'छे, मुळींच नाहीं.' त्यानें गंभीरपणें म्हटलें.

'अय्या! तें कां?'

तो किंचित् थांबला. कसला तरी विचार त्याच्या मनांत चालला असावा. थोड्या वेळानें त्यानें म्हटलें, 'दुपारीं आई आजोबांना विचारायला

गेली ना, तेव्हां आजोबाच म्हणाले, ‘ आम्ही असतांना तुला नोकरी करण्याची काय जरुरी ?’ दादा इथें होते तेव्हां कुठें आई नोकरी करीत होती ? अन् काकू नाहीं वाटत शिकलेली ? ती जातेय् का नोकरी करायला ? मला माहीत आहे, आई कां नोकरी करणार तें ! सांगूं ? परवा मीं काकांच्याजवळ पुस्तकाला पैसे मागितले ना, ते त्यांनीं दिले नाहींत; तेव्हां आईला फार वाईट वाटलं. शरद्-अरूला वाटेल त्या वस्तु काका आणून देतात; मला मात्र नाहीं. मग आईला वाईट वाटणारच. नाहीं का ग ? आमचे दादा इथं नाहींत म्हणून ना ! म्हणून आई नोकरी करणार हो. पण लतू ! बघ हं कुण्णाकुण्णाजवळ हें बोलायचं नाहीं ! माझ्या गळ्याची शपथ. ठेव माझ्या गळ्यावर हात !’

एकाग्र चित्तानें ऐकत असलेल्या लतूनें आपला चिमुकला गोरापान हात तत्परतेनें चटकन् त्याच्या गळ्यावर ठेवीत म्हटलें, ‘ तुझ्या गळ्याची शपथ, कुणाला सांगणार नाहीं मी. अन् आपण आपलीं एकमेकांचीं गुपितं दुसऱ्या कुणाला सांगतों वाटतं कधीं ?’

तिच्या निळ्या डोळ्यांत विश्वासाचें एकमेव स्थान त्याला दिसलें नि त्याचा उदासपणा किंचित् कमी झाला.

त्याची आई लतूच्या शाळेंत शिकवायला जाऊं लागल्याला आतां बरेच महिने होत आले. प्रकाश पहिलींतून पहिल्या नंबरनें पास होऊन दुसरींत गेला होता. आतां हवी असणारी प्रत्येक वस्तु त्याला चटकन् मिळत असे. तरीसुद्धां पूर्वींची आनंदी वृत्ति त्याच्यांत परत आली नव्हती; कारण आई. आई कुठें आनंदी असते ? प्रकाशचें सुकुमार हळवें हृदय सूर्यप्रकाशानुरूप फुलणाऱ्या नि कोमेजणाऱ्या सूर्यफुलाप्रमाणें होतें. आई आनंदी दिसली कीं त्याची वृत्ति पण उल्लसित बने; पण अलीकडे ती आनंदी दिसत नसे. पूर्वींचा तिचा उत्साह पण अलीकडे कितीतरी कमी झाला होता. तिचें तें भरतकाम, तीं टेबलक्लॉथ्स नि कुशनकव्हरें—अजून त्यांतलीं कांहीं अर्धवट भरायचीं राहिलीं होतीं; पण तिनें तीं तश्शींच बॅगेंत भरून ठेवलीं. खरें म्हणजे दादा येण्याचे दिवस आतां जवळजवळ येत चालले; मग आईनें उत्साहानें तयारी नको का करायला ? पण आई

आपली उदासच! आतां तिचा पगार येतो; कितीतरी पैसे येतात. आतां कांहीं काकांच्याकडे नाहींतर आजोबांकडे पैसे मागायला लागत नाहींत. तरी आई आनंदी नाहींच!

एक दिवस रात्रीं अभ्यास करतां करतां त्याला दादांच्या पत्राची एकदम आठवण आली. त्यानें आपल्या एका मित्राला इंग्लंडच्या पोस्टाचें तिकीट द्यायचें गेल्या पंधरा दिवसांपासून कबूल केलें होतें पण दादांचें अजून पत्रच आलें नव्हतें. आई पलीकडेच टेबलावर शाळेतल्या वह्या तपाशीत बसली होती. त्यानें विचारलें, 'आई दादांचें पत्र आलेंय्?'

'छे रे!' तिनें मान वर न करतांच उत्तर दिलें.

'पूर्वीं दादा किती लवकर लवकर पत्रें पाठवायचे आणि आम्हांला खूप तिकिटें मिळत असत. अन् आतां कां ग ते लवकर पत्रें पाठवत नाहींत?' त्यानें तक्रारीच्या स्वरांत विचारलें.

या अनपेक्षित प्रश्नाचें उत्तर तिला चट्कन् सुचलें नसावें. वहीच्या पानांची तिनें उगीचच चाळवाचाळव केली अन् मग म्हटलें, 'पहिल्या-सारखा त्यांना वेळ मिळत नाहीं अलीकडे लवकर लवकर पत्र पाठवायला.'

'काय खोटें सांगतेस ग!'

तिनें चमकून त्याच्याकडे पाहिलें. त्यानें आठवल्यासारखें करून म्हटलें, 'आई, तूंच सांगितलें होतेंस ना, कीं इंग्लंडमध्यें उन्हाळ्यांत दिवस खूपखूप मोठे असतात. सकाळीं ३॥ ला उजाडते नि रात्रीं १०॥ पर्यंत उजेड असतो. मग आतां एवढा दिवस मोठा असून दादांना वेळ मिळत नाहीं?'

तिनें सुटकेचा निःश्वास टाकून हंसण्याचा प्रयत्न करीत म्हटलें, 'अरे, आतां परीक्षा जवळ आलीय ना त्यांची; मग अभ्यास नको का करायला? पत्रें लिहिण्यांत वेळ घालवून कसें चालेल?'

त्याला पटलें.

'म्हणून तूं पण फार पत्रें लिहीत नाहींस. खरें ना?'

'हं. त्यांना अभ्यासांत त्रास होईल ना! बरें. जा; तुझा आतां अभ्यास कर बघूं.'

आपल्याप्रमाणेंच दादांची परीक्षा जवळ आलीय् म्हणजे परीक्षा झाल्यावर दादा लवकर येणार ; तरीसुद्धां आई कांहीं तयारी करीतच नाहीं अन् जास्तजास्त उदास दिसते. असें कां ? त्याला विचारावेंसें वाटे. पण तिला दुःख होईल या भीतीनें त्याला विचारण्याचा धीर होत नसे नि मग स्वतःच्या मनाशींच तो तर्क करीत बसे. कधींकधीं रात्रीं टेबलाजवळ बसून शाळेचें काम करतांना आई रडत असल्याचा त्याला भास होई. त्याच्या जिवाची कालवाकालव होई. त्याच्या विश्वासाचें स्थान लतू. तीहि आपल्या चिमुकल्या मेंदूंतून सुधाकाकूंच्या दुःखाचें कारण शोधून काढण्याचा प्रयत्न करी.

प्रकाशची परीक्षा आटोपली त्या दिवशींचीच गोष्ट. संध्याकाळीं शाळा लवकर सुटल्यामुळें घरीं येऊन तो जुनीं पुस्तकें गोळा करीत होता. आई कपाटाजवळ कांहींतरी करीत होती. इतक्यांत आजोबा आंत आले. त्यांनीं विचारलें, ' काय ग, मधूचें कांहीं पत्रबित्र आलें का ? '

तिनें हलक्या आवाजांत म्हटलें, ' गेल्या दीड महिन्यांत त्यांचें पत्र नाहीं. आपणांला आलंय् का ? '

आईनें पुढें सरकवलेल्या खुर्चीवर बसत आजोबांनीं म्हटलें, ' आम्हाला कधीं रडायला त्याचीं फारशीं पत्रं येताहेत ? '

कांहीं कमीजास्त असल्याशिवाय आजोबा यायचे नाहींत म्हणून भयाकुल होऊन तिनें विचारलें, ' त्यांच्या खुशालीच्या संबंधीं आपणांला कांहीं कळलंय का ? '

' कळलंय्, पुष्कळ कळलंय्. विलायतेंत चिरंजीव चांगले गुण उधळत आहेत. एका गोऱ्या मडमेच्या नादीं लागले आहेत. नि तिथेंच कायमचे राहणार असें कळतेंय्. माझी त्याला विलायतेला पाठवण्याची बिलकुल इच्छा नव्हती. पण आम्हांला विचारतो कोण ? बायकोच्या सांगण्याप्रमाणं नाचणारा तो ! तूं श्रीमंताची लेक. माहेरचे मिळालेले दागिने विकून त्याला पैसे दिलेस. मोठेपणाची हाव होती ना तुला ! '

तिनें हलकेंच शांतपणें म्हटलें, ' मोठेपणासाठीं नव्हे, पण उच्च शिक्षण घेण्याची त्यांची आकांक्षा होती. ती पुरी करण्यासाठीं—कर्तव्यासाठीं—'

'केलंत मोठं कर्तव्य. मुलगा हातचा गेला आणि–' तितक्यांत तिची नजर प्रकाशकडे गेली. तिनें त्याला बाहेर जाण्यासाठीं डोळ्यानें खुणावलें. तो चटकन् उठून निमूटपणें बाहेर गेला. आजोबा आईला बोलतच होते. त्याच्या जिवाची कालवाकालव झाली. बाहेर गच्चीवर बसून तो विचार करूं लागला. आईच्या उदासीनतेचें आणि रडण्याचें कारण आतां त्याच्या हळूहळू लक्षांत येऊं लागलें. आईनें दागिने विकून शिकायला पैसे दिले. किती आई चांगली ! म्हणूनच आईच्या अंगावर एकहि दागिना नसतो. शिवाय आई आपल्याकरतांच नौकरी करते. त्या कुठल्याशा गोऱ्या मडमेनें दादांना तिथें ठेवून घेतलें. दुष्ट कुठली. दादा तिथेंच कायमचे राहाणार असें आजोबा म्हणत होते. खरेंच ते तिथें राहिले तर आपलें कसें होणार ? मग कसला बंगला नि कसला बगीचा ! मग आईला अशीच नौकरी करत राहावें लागणार नि आपल्याला इथेंच काका-आजोबांकडे राहावें लागणार ! शरद्-अरू असेंच भांडणार. त्याचा जीव रडकुंडीला आला. त्याला गोऱ्या मडमेचा तिरस्कार आला. तिनें-तिनेंच...!

'काय करतोय्स रे प्रकाश ?' नित्याप्रमाणें लतू आली.

तो तिच्याकडे थोडा वेळ पाहात राहिला नि मग एकदम रागानें म्हणाला, 'मला नाहीं तुझ्याशीं बोलायचें !'

जवळ येत समजावणीच्या स्वरांत तिनें म्हटलें, 'असें रे काय रागावतोस ? तुझं मी कांहीं केलंय वाटतं ?'

'मला माहीत नाहीं जा.' तो तिरस्कारानें म्हणाला, 'गोरी मडम, जा इथून.'

तिचा चेहरा एकदम उतरला. पण उजव्या हाताच्या पहिल्या नि मधल्या बोटांचीं टोकें एकमेकांना चिकटवून त्यांची बदामाकृति–समजावणीचें शेवटचें अस्त्र–त्याच्या पुढें धरली. त्यानें मध्यें बोट घालून ताडकन् गट्टी तोडली नि तो वेगानें घरांत गेला. खोलींत आई कॉटवर झोपली होती. कदाचित् रडत असावी. घायाळ झालेल्या चिमण्या पिलाच्या

व्याकुळतेनें तो आईला बिलगला. त्यानें विचारलें, ‘आई, दादा कधींच परत येणार नाहींत का ग?’

‘कोण जाणे! ईश्वराला माहीत! माझ्या आकांक्षेच्या मनोहर चित्रांचा चक्काचूर उडाला. आशेचे, ध्येयाचे अनेक दीप उजळायला गेलें, पण सारे फुटून तुटून अंधार...’ तिच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला.

तिचें बोलणें त्याला फारसें कळलें नाहीं. पण तिच्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या अविरत अश्रुप्रवाहांत त्याची व्याकुळता मात्र वाहून गेली. त्यानें आईचे अश्रु आपल्या शर्टच्या टोकानें पुशीत म्हटलें, ‘आई, तूं रडतेस कशाला? न येऊं दे दादांना. मी तुझा एवढा प्रकाश आहे ना! मी खूपखूप शिकेन, मोठा होईन नि मग आपण मोठा बंगला बांधूं नि राहूं.’

*

सात

# गेला दर्यापार

◇ ◇ ◇

**घाईघाईनें** तिकीट काढून मार्गारेट भूमिगत आगगाडीच्या चेरिंग क्रॉसच्या फलाटावर आली.

संध्याकाळची वेळ. फलाट माणसांनीं नुसता फुलून गेला होता. जणूं अफाट दर्याच पसरला होता. दर तीन-चार मिनिटांनीं अंधाऱ्या बोगद्यांत डोळा लालभडक करीत गाडी तुफान वेगानें धडाडत येऊन थांबली कीं माणसांची प्रचंड लाट उसळायची. ती विरते न विरते तोंच दुसरी. त्या लाटांबरोबर हेलकावे खात, त्या मानवी सागरांत आपल्या फास्ट गाडीची वाट पाहात ती उभी राहिली. फलाटावर मध्यभागीं लटकत असलेल्या विजेच्या घड्याळाकडे तिनें नजर टाकली. तिची गाडी यायला बराच अवकाश होता; म्हणून हातांतली डिटेक्टिव्ह कादंबरी उघडून त्यांत तिनें डोकें खुपसलें. गाड्या येत होत्या, जात होत्या. थोड्या वेळानें कंटाळून तिनें पुस्तक बंद केलें नि घड्याळाकडे नजर टाकली. छे! अजून दहा मिनिटें अवकाश होता. कंटाळलेल्या आळसलेल्या नजरेनें तिनें इकडे तिकडे गर्दीकडे सहज पाहिलें. मान वळवून डावीकडे नजर टाकली. अन्...अन्–तो–नक्की तोच! इथें श्यामलवर्णी हिंदी माणूस काय ओळखूं येत नाहीं!

कंटाळलेली, आळसानें मंदावलेली नजर आशाकिरणांनीं चमकली, प्रज्वलित बनली. अगदीं नक्की तोच याची तिला खात्री पटली. विजेच्या प्रकाशांत निस्तेज वाटणारा फलाट एकदम प्रकाशित झाल्यासारखा वाटला. जणूं विजेच्या दिव्यांत एकदम शक्ति आली! त्याच्यावर नजर ठेवून

ती त्याच्या दिशेनें निघाली. आशा, उत्सुकता, अधीरता—अनेक भावनांची हृदयांत गर्दी झाली. न जाणो गर्दींत त्याच्यापर्यंत पोचायच्या आंत त्याची गाडी आली नि तो निघून गेला तर ! सारी शक्ति एकवटून ती गर्दींतून रेटारेटी करीत पायाची गति शक्यतों वाढवीत होती. दर पदक्षेपाबरोबर हृदयाची धडधड वाढत होती. जवळ जातांच त्याच्या पाठीमागें ती थबकली नि त्याची पाठमोरी आकृति तिनें नीट न्याहाळून बघितली. ओव्हरकोटाच्या उभ्या केलेल्या कॉलरमध्यें त्याची हनुवटी झांकली गेली होती; पण म्हणून काय ओळखूं येत नाहीं तो ? तोच श्यामल उभा चेहरा, उंच बांधा. मनाची खात्री पटतांच तिचें मन आनंदानें भरून आलें. त्याच्या अगदीं जवळ जाऊन तिनें म्हटलें, 'एक्स्क्यूज मी.'

त्यानें चटकन् उजवीकडे पाहिलें.

तिनें त्याचा चेहरा आतां संपूर्णपणें न्याहाळीत म्हटलें, 'माफ कर. पण तूं इंडियन आहेस ना ?'

तिच्या विशाल निळ्या डोळ्यांतली अधीरता, आशा नि स्वरांतली उत्सुकता त्या गर्दींतहि त्याला स्पष्ट जाणवली. भरावदार सोनेरी केस नि निळे निळे डोळे यांमुळें अत्यंत सुंदर दिसणाऱ्या तिच्या रेखीव चेहेऱ्याकडे पाहात त्यानें आठवण्याचा प्रयत्न केला, पण ओळख पटेना.

गोंधळून त्यानें म्हटलें, 'हो !'

तिनें अधीरतेनें विचारलें, 'मिस्टर डॅनीला तूं ओळखतोस ?'

'मि. डॅनी ?' तो अधिकच आश्चर्यचकित झाला; गोंधळांत पडला. पण त्यानें नकारार्थी मान हालवायच्या पूर्वींच तिनें घाईनें म्हटलें, 'हो. मि. डॅनी—तोसुद्धां इंडियनच आहे. मला वाटतें, सहा महिन्यांपूर्वीं इंडियांतून आलेल्या त्याच्या एका मित्राला घ्यायला टिलबरी डॉकला मी नि मि. डॅनी गेलों होतों, तो मित्र अगदीं तुझ्यासारखाच दिसत होता. म्हणून विचारतें,—मि. डॅनीला तूं ओळखतोस ? मि. डॅनी—मोहन डॅनी !'

त्यानें आठवण्याचा प्रयत्न केला. 'डॅनी मोहन डॅनी-मोहन दाणी—' अन् मग एकदम हंसून नि आपल्या नेहमीच्या पद्धतीनुसार जोरांत मान हालवून त्यानें म्हटलें, 'यस्, तोच मी.'

# गेला दर्यापार

अनुक्रम 3072
विभाग

अत्यानंदानें तिचें शरीर रोमांचित झालें. अधीरतेनं तिनं विचारलं, ' डॅनीची बातमी तुला मिळाली का ? तो इंडियाला पोंचला का ? ' दर वाक्यागणिक तिच्या स्वरांतली अधीरता वाढत होती.

पण त्यानें उत्तर देण्यापूर्वींच त्याची गाडी धडाडत स्टेशनांत शिरली. ' तो इंडियाला पोंचला. खुशाल आहे ! ' हे शब्द अगदीं अस्पष्टसे तिला ऐकूं आले. हंसून, तिचा निरोप घेऊन तो जाऊं लागला. पण चटकन् त्याच्या खांद्याला स्पर्श करून त्याला थांबवीत तिनें अत्यंत आर्जवीपणें म्हटलें, ' प्लीज, प्लीज, एकच मिनिट थांब. मला डॅनीविषयीं खूपखूप विचारायचं आहे. तो अगदीं माझा जिवलग मित्र होता. खूप विचारायचं आहे, बोलायचं आहे. उद्यां तूं माझ्याकडे डिनरला ये ना ? ..नाहीं म्हणूं नकोस, प्लीज.' एका दमांत भराभर ती बोलत होती अन् बोलतां बोलतां हातांतल्या पुस्तकांत खुणेसाठीं ठेवलेली पेन्सिल काढून चटकन् त्याच्या हातांतल्या वर्तमान पत्रावर तिनें स्वतःचा पत्ता लिहिला.

' हो, नाहीं ' म्हणायला त्याला अवधीच नव्हता. अन् असता तरी तिच्या त्या आर्जवयुक्त निर्दोष चेहऱ्याकडे पाहून त्याला नाहीं म्हणवलेंच नसतें. ' बरं, बरं ' म्हणत तो घाईघाईनें गाडींत शिरला.

ती घरीं पोंचली तरी तिचा आनंद, अधीरता ओसरली नव्हती. मोठ्या खुषींत होती ती ! गाण्याची एक सुरेल लकेर घेत तिनें 'लॅच की'नें दरवाजा उघडला नि जिन्यावरून धांवत स्वतःच्या खोलीकडे ती पळाली. उजव्या हाताच्या कोपऱ्यांतलें बटन दाबतांच खोली प्रकाशानें भरून गेली. पर्स नि रबरी हातमोजे काढून कोचावर टाकतां टाकतां समोर टेबलावर असणाऱ्या फोटोकडे तिनें पाहिलें. ' एस् माय लव्ह ! ' स्वतःशींच म्हणत गॅसची किल्ली फिरवून तिनें काडी ओढून लावली नि मग धांवत जाऊन तिनें तो फोटो उचलला; अन् लाडिकपणें म्हटलें, ' डॅनी, डॅनी, माय लव्ह ! शेवटीं शोधून काढला तुला ! दर्यापार लपला होतास नाहीं ? माय लव्ह ! ' भावनाभरांत आवेगानें तिनें आपले ओठ त्या फोटोवर जोरानें दाबले. फोटो घेऊन ओव्हरकोटासकट शेगडी-जवळच्या कोचावर अगदीं आरामांत तिनें अंग लोटून दिलें. फोटो तिनें

नजरेसमोर धरला. जाड थरांत लिपस्टिक लावून रंगविलेल्या ओठांचा ठसा अगदीं स्पष्ट उमटला होता अन् फोटोच्या हालचालीबरोबर तो वरखालीं सरकत होता. ती मोठ्या गंमतीनें त्याच्याकडे पाहात होती. क्षणांत डॅनीच्या कुरळ्या कुरळ्या काळ्या केसांवर, तर क्षणांत त्याच्या रुंद कपाळावर. हळूच तो ठसा त्याच्या ओठांवर सरकला. त्या ठशाखालीं त्याचे ओठ झांकले गेले. तें दृश्य पाहतां पाहतां, प्रत्यक्षांत डॅनी इथें असतांना आपले चिमुकले ओठ त्याच्या ओठांत कसे सामावून जात, याची गोड रोमांचकारी आठवण येतांच तिनें डोळे मिटले नि दीर्घ निःश्वास सोडला.

थोड्या वेळानें तिनें डोळे उघडले तेव्हां तो ठसा सरकून हळूंच त्याच्या कोटाच्या डाव्या खिशांतून ऐटींत डोकावणाऱ्या रुमालावर स्थिर झाला होता. तें पाहून ती मनाशींच हंसली. एक गोडगोड चित्रपट तिच्या नजरेसमोर उभा राहिला. त्या दिवशीं डॅनी नि आपण बगीचांत बसलों होतों; आजूबाजूला डॅफोडिल् नि ट्यूलिप्सचे ताटवे बहरले होते. दोन दिवसापूर्वींच त्याच्याबरोबर पाहिलेल्या चित्रपटांतील एका गीताच्या मधल्याच ओळी आपण गुणगुणत होतों. बोलतां बोलतां तो मध्येंच म्हणाला, ' तुला माहीत आहे, ओठ हें हृदयांत जाण्याच्या राजमार्गाचें प्रवेशद्वार आहे ? '

तिनें हंसून विचारलें, 'प्रेमावर/एखादं काव्य लिहायचा विचार आहे का ?'

तिच्या रंगवलेल्या लालचुटुक कमानदार ओठांकडे त्यानें पाहिलें. तिच्या विशाल निळ्यानिळ्या डोळ्यांतून हृदयाचा वेध घेत, पुढें सरकत त्यानें म्हटलें, ' मी काव्य कृतींत उतरविण्यांत धन्यता मानतों; काव्य करण्यांत नाहीं, डार्लिंग ! '

त्याच राजमार्गावरून नित्य येऊन त्यानें आपल्या हृदयांत प्रवेश केला —कायमचा प्रवेश केला. हे हिंदी विद्यार्थी मोठे लाघवी असतात ! दुसऱ्याचें हृदय हां हां म्हणतां काबीज करण्याची, घायाळ करण्याची काय जादू असते त्यांच्यांत !... नाहींतरी हिंदुस्थान हा जादुगारांचाच देश ना ! अन् बोलणें तरी किती गोड !

वाचनालय शाखा.
७५८९



त्याची पहिली भेट झाली तो दिवस तिला आठवला. रविवार म्हणजे सुटीचा, आनंदाचा, चैनीचा दिवस. त्या दिवशीं कधीं कुण्णी घरीं सांपडायचा नाहीं. गांवांतले नि गांवाबाहेरचे बगीचे, टेकड्या, झू, समुद्रकिनारा, सिनेमागृहें, थिएटरें—सारें सारें माणसांनीं नुसतें फुलून जायचें. झूमध्यें जाऊन पशुपक्ष्यांची गंमत बघत, चॉकोलेट खात, रमत-गमत फिरणें हा तिचा आवडता छंद. नि त्यांत ॲक्वेरिअम्‌मध्यें जाऊन विविध रंगाचे, आकाराचे मासे बघत बसण्याचें तिला अति वेड! हें माशांचें वेड तिला अगदीं लहानपणापासून होतें. विविध जातीच्या माशांनीं भरपूर भरलेल्या नजीकच्या एका खेड्यात तिचा जन्म झाला होता. तिचा चारपांच पिढ्यांचा धंदा मच्छीमारीचा. लहानपणीं घरा-मागच्या तलावावर आपलें चिमुकलें जाळें घेऊन छोटी मार्गा तास न् तास बसून राही मासे पकडण्यापेक्षां त्यांचा खेळ, त्यांची क्रीडा, धांवपळ बघण्यांतच तिला अपरिमित आनंद होई. हरवलेली मार्गा हटकून तळ्याच्या काठीं बसलेली मिळायची! मोठी झाल्यावर शिक्षणासाठीं ती लंडन शहरांत आली नि मग टायपिस्ट म्हणून एका फर्ममध्यें नोकरी करूं लागली. टायपिंगच्या कामांत ती अति चपळ होती. दर महिन्याला सलूनमध्यें जाऊन, घासून आकारबद्ध केलेल्या नि रंगवलेल्या नखांमुळें अधिकच सुंदर दिसणारीं लांबसडक नाजूक बोटें चपळ गतीनें टाइप-रायटरवर फिरूं लागलीं कीं जलाशयांत विद्युद्‌गतीनें धावणाऱ्या नाजूक लांब माशांची तिला आठवण होई.

त्या दिवशीं रविवारीं ती अशीच ॲक्वेरिअम्‌मध्यें मासे बघत होती. नील वर्ण पाण्यांत शेवाळी खडकामागून विद्युद्‌गतीनें अव्याहत पळणारे मासे बघत होती. जणूं पाठशिवणीचा खेळच चाललाय्. लहानपणचा घरामागचा तलाव तिच्या नजरेसमोर उभा राहिला. तल्लीन होऊन एखाद्या चित्रासारखी ती अचल उभी होती. तितक्यांत मागें कुणीतरी म्हटलें, 'ओह! किती सुंदर!' अन् सिगरेटचा मंद सुगंध तिच्या डाव्या बाजूस दरवळला. चटकन् मान वळवून तिनें डावीकडे पाहिलें. एक देखणा हिंदी तरुण उभा होता. तिला वाटलें, त्या धांवणाऱ्या

माशांनाच त्यानें उद्देशून हें म्हटलें. आपल्याप्रमाणें यालाहि माशांची आवड दिसते. तिचे डोळे आनंदानें चमकले. आपल्याला अत्यंत प्रिय असणाऱ्या वस्तूंची, विषयांची आवड, आपल्यासारखेच विचार दुसऱ्या व्यक्तींत पाहिले कीं आनंदाच्या भरांत मनमोकळेपणा आपोआपच उत्पन्न होतो. तिनें हर्षभरानें म्हटलें, ‘ खरंच ! किती सुंदर आहे, नाहीं ? ’

तो त्या झूमध्यें नि ॲक्वेरिअमूमध्यें पहिल्यांदांच येत होता व निरनिराळ्या जातीच्या माशांची त्याला माहितीहि नव्हती. मग माशांच्या विषयावर तिचा वाक्‌प्रवाह सुरू झाला नि टेम्स नदीला भरती यावी तसा वाढत गेला. माहिती देत देत सारा विभाग संपवून, तीं दोघें पायऱ्या चढून बाहेर केव्हां आलीं तें पण त्यांना समजलें नाहीं. बाहेर खुल्या हवेंत, संपूर्ण उजेडांत आल्यावर तिला तो तरुण स्पष्ट दिसला. काळे काळे डोळे कुरळे कुरळे केस. तसा कांहीं फार उंच नव्हता तो. साधारण ठेंगूच नि भडक रंगाचा. चित्रविचित्र डिझाइनचा अमेरिकन टाय त्याला किती खुलून दिसत होता ! तिला तो एकदम आवडला.

ओळख झाली. सहवास वाढला. लंडनच्या अफाट जनसागरांत हे दोन मासे पिकॅडेली सर्कस, हाईड पार्क, पिक्चर हाऊस यांसारख्या ठिकाणीं एकमेकांना वारंवार भेटूं लागले अन् ‘ वीक एंड ’च्या भरतीच्या वेळीं तर हे दोन मासे अलगद ब्रायटनच्या समुद्रकिनारीं जाऊन पडत. हनी डॅनी—म्हणजे मोहन दाणी—बॅरिस्टर होण्यासाठीं आला होता. इतर कायद्यांबरोबर प्रेमाचे, प्रणयाचे कायदे पण तो इथें लंडनमध्यें—शिकत होता ! अशा अभ्यासाला इथें वाव नि वेळ—दोन्ही भरपूर. दोन्ही अभ्यास संपूर्ण झाल्यावर मार्गरेटला हिंदुस्थानांत नेऊन तिच्याबरोबर लग्न करण्याचें त्यानें ठरवलें होतें. दोघांच्या आवडत्या हाईड पार्कमध्यें अगर दुसऱ्या एखाद्या बगीच्यांत हिरवळीवर आरामांत पसरून त्याच्या गोड गोड लाघवी गुजगोष्टी ऐकतांच तिचें मन कल्पनांच्या लाटांबरोबर झोके घेत घेत दर्यापार होऊन हिंदुस्थानांत—त्या अद्‌भुतरम्य देशांत—पोंचायचें, दर्या-किनारीं बॅरिस्टर डॅनीचा मोठा बंगला तिला दिसूं लागायचा ! तें अद्‌भुतरम्य वातावरण.. त्या वातावरणांत मन रोमांचित होऊन, देहभान

विसरून, भावनावेग अनावर होऊन, त्याला घट्ट पकडून ती उद्गारायची 'हनी, हनी, माय लव्ह !' पुढचे सारे शब्द भावनावेगांत वाहून जात.

त्याच्या जाण्याचा दिवस तिला आठवला. तिला बरोबर नेण्याची त्याला खूपखूप इच्छा होती. पण तो तरी करणार काय ? हिंदुस्थानांत जाऊन स्थिर झाल्याशिवाय, जम बसल्याशिवाय, तिला नेणार कसें नि कुठें ? भावी सुखाच्या आशेंत जड अंतःकरणानें तिनें त्याला निरोप दिला. विरहकाळांत प्रणयवल्लरी टवटवीत राहावी म्हणून त्याच्या ओष्ठ-संपुटांतलें अमृत जेवढें म्हणून शोषून घेतां येईल तेवढें तिनें शोषून घेतलें.

दिवसांमागून दिवस जात होते. सहा महिने उलटून गेले; पण त्याचें पत्र नाहीं. बरें, आपण त्याला पत्र पाठवावें तर त्याचा पत्ता माहीत नाहीं ! जातांना त्यानें दिला होता कुठें ? हिंदुस्थानांत पोंचल्यावर तुला पत्ता कळवीन असेंच नव्हतें का त्यानें सांगितलें ? पण...हिंदुस्थानांत सुखरूप पोंचला असेल का तो ? अलीकडे विमानांचे, बोटींचे किती अपघात होतात ! बरें, चौकशी तरी करणार कुठें नि विचारणार तरी कुणाला ? तिचें प्रेमव्याकुळ, मूक हृदय तर्कवितर्कांच्या वाऱ्यावर भिरभिरे नि थकून निराश होऊन स्वस्थ बसे. पण आज अचानक ध्यानीं मनीं नसतां त्याचा मित्र भेटला नि तिच्या लाडक्या हनीचा शोध लागला ! हनी सुखरूप पोंचला, मग त्यानें पत्र कां पाठवूं नये ? अनेकदां तो चेष्टेनें म्हणायचा, 'मार्गा, इंडियांत गेल्यावर मी तुला पत्रच पाठवणार नाहीं ! अन् मग एक दिवस प्लेननें येऊन दारांत उभा राहीन नि तुला विस्मय-चकित करून म्हणेन, 'हॅलो डार्लिंग !' अन् मग माझ्या डार्लिंगला घेऊन इंडियांत उडेन !' श्रीमंत आहे तो. त्याला काय ?

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ऑफिसांतून ती तडक घरीं आली. हनीच्या मित्राला तिनें जेवायला बोलावलें होतें ना ! घड्याळाचा काटा जसजसा सरकूं लागला तसतशी तिची उत्सुकता वाढूं लागली. बरोबर सातच्या टोल्यांत दारावरच्या घंटेचा निनाद मिसळला. धांवत जाऊन तिनें दार उघडतांच झोंबणाऱ्या असह्य थंडगार वाऱ्याचा झोत आंत आला. पण तिला या क्षणीं तो मोठा सुखद वाटला. बाहेर बर्फ पडत होतें. तिनें

त्याचा ओव्हरकोट घेतला नि बर्फ झटकून नीट ठेवला. काल गर्दीत वाटला त्यापेक्षांहि आतां तो कितीतरी उंच दिसत होता. शेकोटीजवळच्या कोचावर त्याला बसवून स्वतः जवळच्या खुर्चीवर बसत तिनें म्हटलें, 'माफ कर हं. पण काल धांदलींत आपण एकमेकांची ओळख—'

तिचें वाक्य पुरें होण्यापूर्वीच काल तिनें पत्ता लिहिलेला वर्तमानपत्राचा तुकडा खिशांतून काढून त्यानें हंसत म्हटलें, 'या पत्त्यानें तुझी ओळख करून दिली आहेच, मिस् कनिंगहॅम. खरं ना? मी मिस्टर जोशी–मिस्टर डॅनीचा मित्र.'

ती हंसली. तिला वाटलें, हे हिंदी तरुण किती चतुर! समोरच्या फोटोकडे बोट करून तिनें म्हटलें, 'तो पाहा तुझा मित्र तिथें आहेच.'

मग चटकन् ती उठली नि म्हणाली, 'खूप थंडी पडलीय्, नाहीं? तूं गारठून गेला असशील?' अन् कोपऱ्यांत टेबलावर आधींच काढून ठेवलेली बाटली नि दोन ग्लास घेऊन ती आली.

शेगडीवर हात धरून त्यांना ऊब आणीत त्यानें हंसून म्हटलें, 'माफ कर हं, पण मी ड्रिंक घेत नाहीं.'

भुवयांची कमान करीत तिनें आश्चर्यानें म्हटलें, 'म्हणजे! डॅनी–डॅनीला ड्रिंक खूप आवडायचं. खूप शोकीन होता तो. तीन गोष्टींची त्याला फार आवड. म्हणून मी त्याला तीन 'डी'चा डॅनी म्हणायची–'ड्रिंक्, डान्स नि डेट्स्!'

'डेट्स्?' अर्थ चटकन् ध्यानांत न येऊन त्यानें विचारलें.

'हं. डेट्स्. डेट् हा अमेरिकन शब्द आहे, माहीत नाहीं तुला?' अन् डोळे मिचकावून ती मिस्किलपणें हंसली.

गर्भितार्थ लक्षांत येतांच त्यालाहि हंसूं आलें. त्यानें हंसून म्हटलें, 'अस्सं! पण माफ कर, मला यांपैकीं एकाचीहि आवड नाहीं.'

मग जेवायला बसल्यावर तिनें म्हटलें, 'आज मुद्दाम तुझ्यासाठीं मासे केलेत मीं. डॅनीला खूपखूप आवडायचे!' अन् मग पाण्यांत फिरणाऱ्या माशांच्या वेगानें तिनें त्याला डॅनेशीं झालेली ओळख, मैत्री, प्रेम, सारें कांहीं सांगितलें. डॅनीचा हिंदी मित्र तो, त्याला आपली प्रेमकथा नाहीं सांगायची

तर कुणाला? सारें सांगून झाल्यावर ती म्हणाली, 'डॅनीनें पत्र नको होतें का पाठवायला? मित्राला पाठवतां येतें पत्र अन् प्रेयसीला तेवढें नाहीं?'

पण लगेंच ती हंसून म्हणाली, 'गैरसमज करून घेऊं नकोस. डॅनी कधी मला विसरणार नाहींच. पण तो लबाड आहे! तो एकदां चेष्टेनें म्हणाला त्याप्रमाणें अचानक येऊन मला चकित करण्याचा त्याचा बेत असावा.'

ती थोडा वेळ थांबली. कसली तरी कल्पना तिच्या डोक्यांत आली. ते निळेनिळे डोळे आनंददायी कल्पनेनें चमकले. टेबलावर पुढें वांकून तिनें म्हटलें, 'मि. जोशी, एक सुंदर कल्पना सुचलीय् मला. मीच इंडियांत जातें नि डॅनीच्या दारांत उभी राहून त्याला अशी विस्मयचकित करतें नि म्हणतें, 'हॅलो, डनी! माय लव्ह!' असा विस्मयचकित होईल तो! खरंच किती गंमत होईल! डॅनीचा पत्ता तुला माहीत आहेच. मला दे तो.'

तो एकदम दचकला. मग चटकन् स्वतःला सांवरून हंसून त्यानें म्हटलें, 'भटक्या जीव तो. अजून एके ठिकाणीं स्थिर झालाय् कुठें? अन् अलीकडचा त्याचा पत्ता माहीत नाहीं मला. पत्र येऊन बरेच दिवस झाले.'

थोडा वेळ दोघें स्तब्ध होतीं. तो कसल्या तरी विचारांत मग्न झाला होता. थोड्या वेळानें मनाशीं कसला तरी निश्चय करून गंभीरपणें त्यानें म्हटलें, 'मिस् कनिंगहॅम, आतांपर्यंत तुला मि. डॅनीनें पत्र कां पाठवलें नाहीं याची कल्पना आहे तुला?'

संभाषणाचा ओघ अगदीं विचित्र दिशेनें वळत आहे असें बघून तिनें आश्चर्यानें म्हटलें, 'नाहीं. कां? तुला माहीत आहे?'

त्यानें मान हालविली, 'हो. तुझ्यावर आत्यंतिक प्रेम असल्यामुळेंच आतांपर्यंत तो तुला पत्र पाठवूं शकला नाहीं.'

'किती विचित्र!'

'विचित्र खरंच. तूं ज्या मनःस्थितींत आज इथें दिवस काढीत आहेस, त्याच मनःस्थितींत मि. दाणी हिंदुस्थानांत दिवस घालवीत आहे. इथून जातांना त्यानें अनेक बेत केले होते; पण त्याचें कुटुंब अत्यंत जुन्या पद्धतीचें आहे. एका परदेशी मुलीशीं आपल्या मुलानें लग्न करणें त्याच्या आईवडिलांना पसंत नाहीं. त्यांचीं खूप भांडणें झालीं. रागाच्या भरांत

वडील आत्महत्या करण्यास निघाले. आपल्यासाठीं आईवडील, बहीण-भाऊ या साऱ्या मोठ्या कुटुंबाचा नाश करण्यापेक्षां स्वतःच्या प्रेमावर तिलांजलि देण्याचें त्यानें ठरवलें. साऱ्या कुटुंबाकरितां स्वार्थत्याग करायला तो तयार झाला आणि वडिलांनीं ठरवलेल्या हिंदु मुलीशीं त्यानें लग्न केलें! मुलगी सुंदर आहे, शिकलेली आहे, गुणी आहे; पण तुझ्यावरचें आत्यंतिक प्रेम त्याला विसरतां येत नाहीं. त्याच्या 'मार्गा'ची मूर्ति त्याच्या हृदयांत कायम आहे. तुला पत्र पाठवून तुझ्या हृदयाच्या चिंधड्या उडविण्याचा त्याला धीर होईना. तुला पत्र पाठविलें नाहीं, तर कांहीं काळानें रागानें तूं त्याला विसरून जाशील ही त्याची कल्पना. मिस् कनिंगहॅम, त्यानें तुझी मूर्ति आपल्या हृदयांत ठेवलीय् तशी तूंहि त्याची मूर्ति आपल्या हृदयांत सदोदित ठेव अन् इथें एखाद्या अनुरूप इंग्लिश तरुणाशीं विवाहबद्ध हो. मि. दाणीच्या सहवासांत घालविलेले दिवस एक मधुर स्वप्न म्हणून स्मृतिसंपुटांत जतन करून ठेव.'

मग थोड्या वेळानें तो तिचा निरोप घेऊन बाहेर पडला. बाहेर बर्फ पडण्याचें आतां थांबलें होतें. उबदार ओव्हरकोट असूनहि त्याचें शरीर गारठलें होतें. हृदय गारठलें होतें. दाणीचें नुकतेंच लग्न झालेलें नाहीं हें त्याला माहीत होतें; तो इथें बॅरिस्टर होण्यासाठीं आला होता तेव्हांच तो संसारी होता नि त्याला दोन मुलें होतीं. जोशीला त्याचा विलासी स्वच्छंदी स्वभाव माहीत होता. आपण स्वतः अविवाहित आहें असें भासवून अन् मार्गारेटला लग्नाच्या गोड गोड थापा देऊन जें त्याला मिळवायचें होतें तें तो मिळवीत होता अन् पत्ता न देण्यांत अन् एकहि प्रेमपत्र न पाठविण्यांत त्यानें कमालीची हुशारी दाखविली होती! भोळी मार्गा त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती; पण तिचा 'हनी' दर्यापार गेला तो गेला! जोशीच्या हृदयांत कसलें तरी शल्य टोचलें; पण आपल्या देशबंधूची बाजू राखून, मार्गारेटच्या प्रेमविव्हल हृदयाला थोडें तरी शांत केल्याचें समाधान त्याला लाभलें.

✱

आठ

# काळे ढग

◇ ◇ ◇

एकाएकी बाहेर अंधारून आलें. क्षणापूर्वी मावळत्या सूर्याचीं सोनेरी किरणें खिडकींतून आंत येत होतीं तीं लुप्त झालीं. खोलींत काळोख पसरला. मकरंद चामड्याच्या प्रवासी बॅगेंत कपडे भरण्यांत गुंतला होता, तो उठला आणि उजेडासाठीं त्यानें भिंतीवरचें बटण दाबलें. पण विद्युत्-प्रवाह बंद होता. तेव्हां आकाश निवळेपर्यंत अगर विद्युत्प्रवाह सुरू होईपर्यंत थांबणें भाग होतें. विद्युत्प्रवाह केव्हां सुरू होईल याचा नेम नव्हता. तेव्हां आकाश तरी लवकर निवळेल कीं काय याचा अंदाज घेण्यासाठीं तो बॅग तशीच उघडी टाकून खिडकीजवळ गेला. आकाश काळ्याकुट्ट मेघांनीं भरून गेलें होतें. ते काळेकुट्ट मेघ प्रचंड खडकासारखे दिसत होते आणि त्या प्रचंड शिला हळूहळू पुढें सरकत होत्या. आसमंतात् काजळी छाया पडली होती. वातावरण उदास, भारावलेलें भासत होतें. इतक्यांत मेघगर्जना झाली—वर आकाशांत नव्हे, तर खिडकीखालीं असलेल्या मागच्या व्हरांड्याच्या शेवटच्या पायरीवर!

मकरंदनें खालीं वांकून पाहिलें. पायरीवर उभे राहून बाबासाहेब तावातावानें नोकराला बोलत होते. दोन महिन्यापूर्वींच त्यांची साठी उलटली होती. वार्धक्याचीं सारीं चिन्हें त्यांच्या गात्रांवर स्पष्ट उमटलीं होतीं; पण त्यांच्या मूळच्या करड्या, कर्णकटु आवाजाला मात्र त्या

वार्धक्याची यत्किंचितहि झळ लागलेली दिसत नव्हती. कुरूप माणसें म्हातारपणीं अधिकच कुरूप दिसतात. बाबासाहेब तसेच दिसत होते. वर्णानें ते गोरे होते, पण शरीरानें ठेंगणे आणि स्थूल होते; आणि पायजमा अगर पॅंट पोटावर ते अशा तऱ्हेनें सरकवून बसवीत कीं त्यामुळें शरीरापेक्षांहि पोटाचा स्थूलपणा प्रमाणाबाहेर उठून दिसे. त्यांचें मूळचें कांहीसें बुटकें आणि शेंड्याला फुगीर असलेलें नाक सुरकुत्यांमुळें अधिक फुगीर दिसत असे. त्यांच्या डोक्याला भलेंमोठें टक्कल होतें. त्यांचा आवाज कर्णकठोर नि कटु असला तरी चेहरा सौम्य होता. क्रोधाविष्काराच्या वेळीं त्या चेहऱ्याला थोडीशी उग्रता येई तेवढीच.

आतां कशावरून तरी ते नोकरावर घसरले होते. ते चटकन् चिडत, वारंवार चिडत आणि कुणावरहि चिडत. चिडायला कसलेंहि क्षुल्लक कारण त्यांना पुरेसें होई. जणूं चिडण्यासाठीं ते कारण शोधीत बसत. सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोंपेपर्यंत कुठच्या ना कुठच्यातरी कारणावरून त्यांची ही चिडचिड नि चिरचिर चालू असे. पूर्वीं ते इतके चिडखोर नव्हते. पण अलीकडे गेल्या पांचसहा वर्षांत ते विलक्षण चिडके बनले होते. नोकरावर ताशेरा झाडतांझाडतां नोकराच्या नजरेच्या अनुरोधानें त्यांनीं वर खिडकीकडे पाहिलें.

नजरानजर होतांच मकरंद एकदम मागें सरकला. त्याचें रुंद कपाळ आठ्यांनीं संकुचित झालें. त्याच्या तोंडाला मुरड पडली. त्यानें खोलीभर नजर फिरवली. खोलींत अंधार दाटत चालला होता. पण विद्युत्प्रकाश अजून आला नव्हता. नोकराला हाक मारून वर दिवा आणायला सांगण्याची अगर स्वतः खालीं जाऊन दिवा घेऊन येण्याची त्याला इच्छा होईना. त्याला एकच इच्छा होत होती, ती म्हणजे या अंधारांत मिळतील, हाताला लागतील ते कपडे बॅगेंत कोंबावे, गाडी पकडून पुण्याला जावें नि हॉस्टेल गांठावें.

अंधारांत चाचपडत त्यानें आपली कॉट गांठली आणि त्यावर तो स्वस्थ पडला. खालीं बाबासाहेबांचा आवाज अजूनहि ऐकूं येत होता. त्या आवाजांतली प्रखरता कमी झाली नव्हती.

बाबासाहेब मकरंदचे आजोबा–छेः छे:!–ते त्याचे वडील होते. सुरुवातीला म्हणजे सतरा वर्षांपूर्वी आपल्या वयाच्या सहाव्या वर्षी, ज्या दिवशीं आपल्या आईचें बोट धरून त्यानें या घरांत प्रवेश केला त्या दिवशीं त्याची हीच कल्पना होती कीं बाबासाहेब आपले आजोबा आहेत. नुकतेंच कुठें सहावें वर्ष लागलेला बालक कितीहि तल्लख बुद्धीचा नि चौकस वृत्तीचा असला तरी त्या वयांत त्याची कल्पना नि स्मृति तेवढीच असायची. त्या दिवशींचा तो प्रसंग आतां आठवतांच त्याला हंसूं आलें, चीड आली नि तिटकाराहि वाटला.

आतां कॉटवर पडल्यापडल्या उघड्या डोळ्यांनीं अंधारलेल्या तक्तपोशीच्या काळ्या फळ्यावर गतस्मृतींचे प्रसंग लिहिण्याचा तो प्रयत्न करूं लागला. बाल्यकाळांतलीं चित्रें बघतांना, ते प्रसंग आठवतांना विशेष ताण पडत होता. सुसंगत असें फारसें आठवत नव्हतें. पण जेवढें आठवेल तेवढें आठवूं लागला. या घरांत पाऊल ठेवलें त्या दिवसापासूनचे पुढचे प्रसंग त्याला स्पष्ट दिसत होते; पण त्यापूर्वींचे प्रसंग, रंग उडून जाऊन अस्पष्ट झालेल्या चित्रासारखे, पुसट झालेल्या अक्षरांसारखे दिसत होते.

त्या वेळीं–हो त्या वेळीं आपण मुंबईला राहात होतों. तीन खोल्यांचें घर होतें; पण छान होतें घर. तें घर आठवतांना निळसर सूट घातलेल्या आपल्या वडिलांची उंच सुदृढ मूर्ति दाट धुक्यांतून दिसावी तशी त्याच्या नजरेसमोर उभी राहिली. हो, आपले पप्पा कुठच्याशा व्यापारी कंपनींत नोकरीला होते. मोठे मॅनेजर होते. एक दिवस कंपनीच्या कामासाठीं ते विमानांतून कलकत्त्याला गेले, ते परत आलेच नाहींत. विमान कोसळलें आणि इतर कांहीं प्रवाशांबरोबर तेहि त्यांत मृत्युमुखीं पडले. अपघाताची तार वाचल्यानंतर आपली आई बेशुद्ध पडली होती; ती दोन दिवसांनीं शुद्धीवर आली.

पप्पा गेल्यावर आपल्या घरांत दुसरींच कोणीतरी माणसें राहायला आलीं. दोन खोल्यांतून तीं माणसें राहात आणि एका खोलींत आई नि आपण राहात असूं. ज्या बालमंदिरांत आईनें आपणांला घातलें

होतें तिथेंच ती शिकवायला येऊं लागली आणि दुसरीकडे कुठेंशी शिकवायला जात असे. एक दिवस–किती दिवसांनीं कोण जाणे पण एक दिवस–बालमंदिर सुटल्यावर घरीं आलों तों आई आणि तिची मैत्रीण सुधामावशी-दोघीजणी सामान आवरीत होत्या. आई बॅगेत कपडे भरीत होती. पप्पा गेल्यापासून आईचा चेहरा गंभीर असे; पण त्या दिवशीं तर तो खूप गंभीर होता. आपण प्रवासाला जाणार, गाडींत बसायला मिळणार या विचारानें आपणाला आनंद झाला होता. आपण तिला प्रश्न विचारत होतों. पण त्या प्रश्नांचीं उत्तरें सुधामावशीच देत होती. आतां सगळें बोलणें आठवत नाहीं. पण सुधामावशीनें म्हटलें, 'आतां तूं आईबरोबर खूपखूप दूर जाणार आहेस.'

'मग इथें परत केव्हां येणार आम्ही?'

'आतां इथें परत नाहीं येणार तुम्ही!'

'म्हणजे सुधामावशी, आम्ही पप्पाकडे जाणार आहोंत का? कारण पप्पा गेले ते कुठें परत आले?'

'पप्पा देवाच्या घरीं गेले, तिथें सगळ्यांना जातां येत नाहीं.'

'मग कुणाला जातां येतें?'

'माणसें म्हातारी झालीं म्हणजे देवाच्या घरीं जातात.'

'पप्पा कुठें म्हातारे होते?'

तेवढ्यांत आईनें म्हटलें, 'जा हातपाय धू, नि खायला बैस.' तिच्या आवाजांत तीव्रता होती.

रात्रीं आईबरोबर आपण गाडींत बसलों. गाडी दूरदूर चालली होती. आपण झोंपलों, जागे झालों, पुन्हा झोंपलों, पुन्हां उठून खिडकीशीं बसलों, तरी प्रवास कांहीं संपेना. मग केव्हांतरी एकदांचा प्रवास संपला. कुठल्याशा एका स्टेशनावर गाडी थांबली, तेव्हां एक गृहस्थ आपल्या डब्याजवळ आले. आणि मग आईबरोबर आपण खालीं उतरलों. अक्षरें जोडूनजोडून आपणाला वाचतां येत असे. फलाटावरच्या पाटीवरचीं अक्षरें आपण जोडून वाचलीं 'ना–ग–पू–र!'

मग एका गर्द जांभळ्या कोऱ्या करकरीत मोटारींत आईजवळ आपण बसलों नि खूप खोल्या असलेल्या एका मोठ्या हॉटेलांत गेलों. आपणाला जेवायला घालून आईनें झोंपवलें. आपण जागे झालों तेव्हां इथें या बंगल्यांत याच खोलींत, याच सुंदर पलंगावर होतों. आई कुठें दिसत नव्हती. पण पुष्कळशीं खेळणीं घेऊन एक नोकर खालीं पलंगाजवळ बसला होता.

एखाद्या राजवाड्यासारखा दिसणारा एवढा मोठा नि सुंदर बंगला आपण पूर्वी कधीं पाहिला नव्हता आणि आजहि इतका सुसज्ज उत्कृष्ट बंगला अद्याप दुसरीकडे कुठें आपल्या पाहण्यांत आलेला नाहीं. तो बंगला पाहण्यांत, बगीचांतून फिरण्यांत, नवीन मिळालेलीं खेळणीं घेऊन खेळण्यांत, आपलें चित्त रमलें. आपण बगीचांत खेळत असतांनाच सकाळची ती गर्द जांभळी मोटर भर्रकन् आंत शिरली नि पोर्चमध्यें उभी राहिली. त्या मोटरींतून काळी टोपी नि काळा सूट घातलेले एक प्रौढ गृहस्थ खालीं उतरले. हेच ते बाबासाहेब. त्यांच्या मागोमाग आपली आई उतरली. आपण आश्चर्यानें तिच्याकडे पाहिलें. कारण आईनें सुंदर पोषाख केला होता. पप्पा गेल्यापासून आई पांढरीं पातळें नेसत असे नि एकहि दागिना घालीत नसे. पण त्या दिवशीं आई डाळिंबी रंगाचें जरीचें पातळ नेसली होती. तिच्या गळ्यांत मोत्याचा कंठा होता. कानांत मोत्याचीं कुडीं होतीं. हातांत मोत्याच्या बांगड्या होत्या. ज्याप्रमाणें या बंगल्याइतका सुंदर बंगला आपण पाहिला नव्हता, त्याचप्रमाणें आपल्या आईइतकी सुंदर स्त्रीहि आपण पाहिली नव्हती.

आई आपल्याजवळ आली नि बोटाला धरून तिनें आपणांला घरांत नेलें. नंतर–नंतर बाबासाहेबांकडे कोणीतरी बरीचशी मंडळी आली होती. आणि आई पण बाहेर दिवाणखान्यांत बसून त्या सर्वांशीं बोलत होती, हंसत होती. आपण बंगलाभर अगदीं मुक्तपणें फिरत होतों. हें घर कुणाचें? आपण कुणाकडे आलों आहोंत?–कशाचीहि आपणांला कल्पना नव्हती आणि आपलें चित्त रमविणाऱ्या, अंतःकरण आकृष्ट करणाऱ्या, मन गुंगविणाऱ्या इथें इतक्या गोष्टी होत्या कीं आपण कुठें

आलों हा प्रश्नहि आपल्या मनांत आला नाहीं. भूक लागली कीं नोकराला सांगावें, तो स्वैंपाकघरांत घेऊन जाई, स्वैंपाकी छान छान खायला देई. नोकर खेळायला नेई. नवीन जागेला अगर माणसाला बुजण्याचा आपला स्वभाव नाहीं; त्यामुळें सगळीकडे मोकळेपणें हिंडत होतों.

रात्रीं आई याच खोलींत आपणांला घेऊन आली नि पलंगावर झोपवूं लागली. आईशीं त्या वेळीं आपण खूप बोललों. पण काय बोललों तें आतां आठवत नाहीं. पण एवढें आठवतें आहे कीं आपण म्हटलें, 'आई, या आजोबांचें घर किती छान आहे, नाहीं? मला खूप खूप आवडलें. आपण या आजोबांच्याच घरीं राहूंया का ग?'

आईचा चेहरा एकदम गंभीर झाला. पण लगेंच ती हंसली नि आपणाला थोपटीत म्हणाली, 'तुला इथें राहायला आवडत असेल तर आपण राहूंया इथें?'

'हो, राहूंयाचं. पण आजोबा देतील का राहायला इथें?'

'देतील. मी सांगेन त्यांना. पण हें बघ मकरंद, त्यांना आजोबा नाहीं म्हणायचं.'

'मग?'

'त्यांना बाबासाहेब म्हण.'

'अग, पण ते आपले आजोबाच लागतात ना? आपल्या मुंबईला शेजारच्या अरुणचे आजोबा नाहींत का? तसेच हे आजोबा ना माझे?'

'नाहीं.'

'मग ते कोण लागतात ग आपले?'

तिनें आपल्या अंगावरचें पांघरून डोक्यापर्यंत ओढून घेतलें आणि आपणाला कुशीला वळवून आपलें तोंड भिंतीकडे वळवून जोरांत थोपटीत म्हटलें, 'आतां झोंप बघूं गुपचूप. मग उद्यां सांगेन.'

दुसऱ्या दिवशीं सकाळीं–हो सकाळींच असेल–आपण बागेंत झोपाळ्यावर खेळत होतों. तेवढ्यांत बाबासाहेब तिथें आले. थोडा वेळ आपणाकडे अगदीं टक लावून बघत उभे राहिले. नि मग आपल्याजवळ बसले. आपणांला इथें राहण्याची खूप इच्छा होती, पण हे आपले खरोखरचे

आजोबा असले तरच आपणांला इथें राहायला मिळेल असें आपणांला वाटत होतें. आणि आईनें तर म्हटलें होतें कीं हे आजोबा नाहींत म्हणून. आपण चटकन् म्हटलें, ‘ अहो आजोबा, आम्ही इथें राहिलों तर चालेल का ? मला तुमचें घर खूप आवडलें.’

ते हंसले नि आपणाला जवळ घेऊन आपले केस सारखे करीत म्हणाले, ‘तुला घर आवडलें ना? मग इथेंच राहा तूं आतां.’

‘पण आजोबा, तुम्ही आमचे कोण लागता हो ?’

बाबासाहेब हंसत होते, ते एकदम गंभीर झाले. थोडा वेळ गप्प राहिले नि पुन्हां हंसले. मग म्हणाले, ‘तुझ्या आईनें तुला सांगितलें नाहीं का ?’

‘नाहीं. तुम्ही आजोबा लागत नाहीं एवढें ती म्हणाली. तुम्ही कोण लागता म्हणून विचारलें तर म्हणाली उद्यां सांगेन.’

ते थोडा वेळ स्वस्थ राहिले. नंतर म्हणाले, ‘तुझे वडील आठवतात का तुला ?’

आपण म्हटलें, ‘ हो, त्यांना मी पप्पा म्हणत असें. ते देवाच्या घरीं गेले आहेत. आतां परत कधीं येणार नाहींत.’

ते म्हणाले, ‘ हो. तें मला माहीत आहे. आणि म्हणूनच तुझ्या पप्पांच्या जागीं देवानें मला पाठवून दिलें आहे.’

आपण त्यांच्याकडे पाहिलें नि रागानें म्हटलें, ‘ हट् ! तुम्ही नको मला पप्पा म्हणून. तुम्ही म्हातारे आहांत. म्हातारीं माणसें देवाच्या घरीं जातात. तुम्हीं जा देवाच्या घरीं आणि आमच्या पप्पांना पाठवून द्या. तुम्ही पप्पांना तिथें ठेवून आलांत. वाइट्ट आहांत तुम्ही अगदीं !’

आपण मोठमोठ्यानें ओरडून बोलत होतों. बोलतां बोलतां आपला आवाज रडका झाला नि तेवढ्यांत, कदाचित् आपल्या रडक्या आवाजांतलें ओरडणें ऐकूनहि असेल, पण आई घाईघाईनें तिथें आली. तिला पाहतांच आपण म्हटलें, ‘आई, हे आजोबा वाईट आहेत. हेच आपल्या पप्पांना देवाच्या घरीं ठेवून आले.’

आईनें झटकन् तिथून आपणांला घरांत नेलें, न बोलतां आपणांला कपडे चढवले नि गांवांत कुठलीशी सर्कस आली होती ती बघायला नोकराबरोबर पाठवून दिलें.

त्यानंतर या घरावरचें आपलें चित्त उडालें, इथें राहाण्यांतला आनंद निमाला; आणि आईला आपण एकसारखें म्हणूं लागलों कीं मुंबईला आपल्या घरीं जाऊंया. त्यानंतर एका आठवड्यांतच आपणांला एका बोर्डिंगमध्यें ठेवण्यांत आलें आणि तेव्हांपासून बोर्डिंग हेंच आपलें घर बनलें.

वाढत्या वयाबरोबर कळून आलें कीं बाबासाहेब हे आपले सावत्र वडील आहेत. वय वाढलें, समजूत आली तसा लहानपणचा मूर्खपणा निघून गेला होता. सावत्र वडिलांचें नातें त्याला विचित्र वाटे, तरीसुद्धां बाबासाहेब आपले वडील आहेत ही जाणीव मनांत ठेवून त्यांच्याशीं वागण्याचा तो प्रयत्न करी. पण त्यांच्याविषयीं त्याच्या बालमनांत उमटलेला तिरस्काराचा ठसा कायम होता. अढी कायम होती. मनांतला तिटकारा त्याला घालवितां येईना. वाढत्या वयाबरोबर तो तिटकाराहि वाढूं लागला आणि म्हणूनच तो सुटींत घरीं येई तेव्हां त्यांच्यासमोर जाण्याचें तो शक्य तितकें टाळण्याचा प्रयत्न करी. नाईलाजास्तव दोघे कधीं एकत्र आले–जेवणाच्या वेळीं एकत्र यावें लागे–तर त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याखेरीज तो कधीं अधिक बोलत नसे. त्याला बोलावेंसेंच वाटत नसे; आणि दर वर्षागणिक त्यांचा वाढता तापटपणा नि चिडखोरपणा पाहून तर अलीकडे त्याचें मन तिरस्कारानें भरून गेलें होतें. त्या तिरस्काराची छाया अलीकडे त्याच्या आईवरहि पडूं लागली होती.

सुरुवातीला तो सुटींत घरीं येई तेव्हां हरिणीकडे धांव घेणाऱ्या पाडसाची व्याकुळता नि अधीरता त्याच्या मनांत ओसंडून गेलेली असे. फुलांतला मध एकचित्तानें चाखणाऱ्या निरागस फुलपांखरासारखें त्याचें मन वात्सल्याचा रस चाखून घेई आणि सुटी संपली, कीं कांहींशा जड अंतःकरणानें परत जाई. पण वाढत्या वयाबरोबर जसजशी त्याची विचारशक्ति वाढली, तसतसें घरीं आल्यावर आजूबाजूला त्याचें लक्ष जाऊं लागलें. अनेक नवीन गोष्टी त्याच्या लक्षांत येऊं लागल्या. नवीन विचार डोक्यांत

भरूं लागले. आतापर्यंत या गोष्टी आपल्या लक्षांत कशा आल्या नाहींत असेंहि त्याला वाटूं लागलें. पहिली गोष्ट त्याच्या लक्षांत आली ती ही, कीं बाबासाहेबांविषयीं अनादराचा अगर प्रतिकूलपणाचा एकहि शब्द काढलेला आईला खपत नाहीं. कधीं असा प्रसंग घडला तर ती नाराज होते, धमकावते, राग स्पष्टपणें दाखवते. अशा वेळीं तो गप्प बसे; पण मनांतून म्हणे, 'तूं या म्हाताऱ्याशीं लग्न करून माझ्यावर पुत्राचें नातें लादलें आहेस; म्हणून पुत्रप्रेमाची भावना कांहीं माझ्या हृदयांत तुला उत्पन्न करतां येणार नाहीं.' आणि मग त्याच्या मनाची कटुता वाढे. बाबासाहेबांशीं बोलतांना त्याच्या शब्दांत आदर असला तरी त्याचा चेहरा कांहीं वेगळाच भाव दर्शवी.

दुसरी गोष्ट त्याला जाणवूं लागली, ती म्हणजे कौटुंबिक गोष्टींच्या कक्षेंत आई आपणांला कधीं येऊं देत नाहीं. घरगुती गोष्टींत ती आपणांला कधीं विश्वासांत घेत नाहीं. अशा गोष्टी कधीं आपणांशीं बोलत नाहीं. बोलण्याच्या ओघांत कधीं विषय निघाला तर विषय बदलण्याची ती घाई करते. कसला तरी आडपडदा टेवून ती वागते. दर सुटींत आपण घरीं येतों, हें घर आपलें स्वतःचें आहे असें मानण्याचा प्रयत्न करतों; पण कां कोण जाणे, या घराविषयीं आपणांला आत्मीयता वाटत नाहीं, आपल्या मनांत जिव्हाळा उत्पन्न होत नाहीं, इथल्या कुटुंबजीवनाशीं आपणांला समरस होतां येत नाहीं. ज्याच्या दोन बायका मेल्या अशा निपुत्रिक श्रीमंत म्हाताऱ्याचें तिसरें पत्नीपद आपल्या आईनें खुषीनें स्वीकारलें. कशासाठीं? तर केवळ पैशासाठीं. वैभवाचा उपभोग घेण्यासाठीं. केवळ ऐश्वर्यासाठीं या सुंदर तरुण बाईनें या धनेश्वराबरोबर लग्न केलें, ही सर्वतोमुखी झालेली गोष्ट त्याला नाकारतां येत नव्हती. ऐश्वर्याचा उपभोग संपूर्णपणें घेतां यावा म्हणूनच तिनें आपणांला दूर बोर्डिंगमध्यें ठेवलें हा विचार त्याच्या मनांत येई नि तो काट्यासारखा सलत राही.

बिंदूचा सिंधु नि काड्याचा नायटा व्हायला वेळ लागत नाहीं. चार महिन्यापूर्वींच त्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें एक प्रोफेसर

बदलून आले होते. मकरंद हा विमान-अपघातांत मेलेल्या आपल्या मित्राचा मुलगा आहे हें जेव्हां त्यांच्या लक्षांत आलें तेव्हां त्यांनीं मुद्दाम त्याला आपल्या घरीं बोलावून आपल्या मित्राच्या जुन्या आठवणींची उजळणी केली. आपल्या मित्राच्या पत्नीनें पुनर्विवाह केला आहे आणि तोहि एका निपुत्रिक श्रीमंत वयस्क गृहस्थांबरोबर, ही गोष्ट मकरंदच्या तोंडून कळतांच ते दचकले. एखादी नवलकथा ऐकावी अगर एखादी अविश्वासाची बातमी ऐकावी तसा विस्मयचकित भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला त्यानें पाहिला. विषादाची छायाहि झटकन् चेहऱ्यावर उमटून गेलेली त्याच्या दृष्टीस पडली. ते थोडा वेळ स्तब्ध राहिले. नंतर त्यांनीं म्हटलें, ' माझ्या मित्राचा प्रेमविवाह हा आम्हां मित्रमंडळींत एक कौतुकाचा विषय होता. त्याच्या पश्चात् त्याच्या उत्कट प्रेमाचा तिला विसर पडावा आणि केवळ ऐश्वर्यासाठीं...! पण फुलाला काटे, चंद्राला डाग नि सौंदर्याला चंचल वृत्तीचा शाप देवानेंच दिलेला आहे, त्याला कोण काय करणार ? '

प्रोफेसरमहाशयांकडून मकरंद बेचैन मनःस्थितींत आपल्या खोलीवर परत आला. मनांत सलत असलेल्या काट्याचा हां हां म्हणतां नायटा होऊं लागला. तृषार्त माणसानें जलाशयाकडे धाव घ्यावी त्याप्रमाणें आपल्या पित्याच्या जीवनांतल्या आठवणी ऐकायला मिळाव्यात म्हणून तो नेहमीं त्या प्रोफेसरांकडे जाई, स्मृतिजल प्राशन करी; पण खोलीवर आल्यावर विषप्राशनाचा दाह त्याच्या हृदयांत उसळे. मेघाच्छादित आकाशाप्रमाणें त्याचें हृदय हळूंहळूं तिरस्कारानें काळवंडून गेलें. ज्या मातृप्रेमाचे लोक गोडवे गातात ती जन्मदात्री आई आपल्या वांट्याला मात्र फार वेगळ्या तऱ्हेची यावी याचा त्याला विषाद वाटला, शरमहि वाटली.

सुटी झाली. पण घरीं जाण्याची त्याला इच्छा होईना. कांहींतरी कारण सांगून घरीं जाण्याचें टाळावें असा त्यानें विचार केला. इंजिनिअरिंगचें आपलें हें शेवटचें वर्ष आहे. हें वर्ष संपल्यावर कुठेंहि नोकरी मिळेल. पण लगेच त्याच्या मनांत विचार आला, कीं आपल्या भावना तिला कळल्या पाहिजेत. आपल्या बाबतींत झालेल्या अन्यायाचें माप

तिच्या पदरांत घातलें पाहिजे. तिचें हृदय कसें आहे हें तिला दाखवलें पाहिजे.

अशा विचारानें–नव्हे, अशा तयारीनें–तो घरीं आला. पण आईचा शांत गंभीर चेहरा पाहिला कीं त्याचें मन कच खाई; त्याला बोलण्याचा, तिरस्काराच्या भात्यांतले विषारी वाग्बाण सोडण्याचा, धीर होत नसे. आपली जीभ कुणीतरी मागें खेंचतें आहे असें दर वेळीं त्याला वाटे. शेवटीं परत जाऊन पत्र पाठवावें असा सोयिस्कर उपाय त्यानें ठरवला नि त्याप्रमाणें तो निघण्याची तयारी करीत होता.

अद्याप विद्युत्प्रवाह सुरू झाला नव्हता. नोकराला हांक मारण्यासाठीं तो उठला, तेवढ्यांत 'मकरंद, मकरंद' अशी आईची हांक त्याच्या कानीं आली आणि त्या हांकेच्या पाठोपाठ ती खोलींत शिरल्याची चाहूल त्याला लागली.

तिनें म्हटलें, 'मकरंद, अरे, इथें अंधारांत काय बसून राहिला आहेस?'

'माझ्या जीवनांत प्रकाश आहे कुठें? सगळा अंधारच आहे!' असें उत्तर त्याच्या जिभेच्या टोकावर आलें आणि तें बाहेर पडणार तेवढ्यांत डोक्यावरचा विद्युद्दीप झळकला नि खोली प्रकाशानें भरून गेली. आपली आई पलंगाजवळ उभी असलेली त्याला दिसली. जणूं एखाद्या कुशल शिल्पकारानें बनवलेली जयपुरी संगमरवराची सुबक रेखीव मूर्ति उभी आहे! पंचेचाळिशीजवळ पोंचत चाललेल्या या सौंदर्यवतीच्या शरीरावर पंचविशींतला टवटवीतपणा नि सतेजपणा कायम होता. इतके दिवस आपल्या आईच्या सौंदर्याचें त्याला मोठें कौतुक वाटे, अभिमान वाटे. ती नजरेस पडली कीं त्याचें मन मृदु बने. पण आतां या टवटवीत सौंदर्याकडे पाहातांना त्याच्या मनांत आलें कीं पूर्वायुष्यांतली कसलीहि आठवण या बाईला नाहीं. कसला खेद नाहीं. कसली खंत नाहीं. इथल्या ऐश्वर्याच्या उपभोगानें मिळालेल्या सुखासमाधानाचेंच हें लक्षण नाहीं का?

त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या. आतांपर्यंत ती त्याच्या कधी खोलींत आली कीं तो चटकन् उठून सांवरून बसे. पण तो आतां उठला नाहीं. हें सारें तिच्या नजरेंतून सुटलें नाहीं. आजपर्यंत तिच्या नजरेंतून

कांहींच सुटलें नव्हतें. तिनें आसपास नजर फिरवली. उघडी बॅग नि अर्धवट भरलेले कपडे पाहून तिनें कांहींशा आश्चर्यानें म्हटलें, 'म्हणजे! हें काय? तूं उद्यां जाणार आहेस?'

'उद्यां नाहीं. रात्रीच्या गाडीनें जाणार आहे.'

'म्हणजे? येऊन अजून चार दिवस झाले नाहींत नि इतक्यांत—'
त्यानें मध्येंच म्हटलें, 'माझें हें इंजिनिअरिंगचें शेवटचें वर्ष आहे. तेव्हां अभ्यासासाठीं लवकर जायला हवें. इथून मी रात्रीच्या गाडीनें आग्र्याला एका मित्राकडे जाणार आहे.'

त्याची आई किंचित्काल त्याच्याकडे बघत स्तब्ध उभी राहिली. नतर म्हणाली, 'बरें. हरबाला तिकिटाची व्यवस्था करायला सांगतें.' असें म्हणतां म्हणतां ती जाण्यासाठीं वळली. आई कांहींतरी बोलेल, आग्रह करील, अगर लटक्या रागानें चिडेल अशी त्याची अपेक्षा होती. पण तसें कांहीं घडलें नाहीं. हें घडलें नाहीं म्हणून तो चिडला आणि त्यानें जोरानें म्हटलें, 'मीं इथे राहावें असें तुला कां वाटतें?'

ती मागें वळली. शांतपणें तिनें म्हटलें, 'तूं आतां मोठा झाला आहेस. या प्रश्नाचें उत्तर तुलाहि सांगतां येईल. माझ्या तोंडूनच ऐकायचें असलें तर एवढेंच सांगतें मी कीं आईची माया आंधळी असते.'

'हूं! माया आंधळी असते!' स्वतःच्या स्वरांतला उपहास नि त्वेष त्याला स्पष्ट जाणवला नि त्या उपहासाला तीव्रतेची धार आणीत त्यानें पुढें विचारलें, 'अन् तिचें प्रेम कसें असतें?'

त्यानें फेकलेला वाग्बाण इच्छित जागीं लागला. पण नेहमीचा शांतपणा न ढळतां तिनें शांतपणें म्हटलें, 'डोळस असतें.'

त्यानें चिडून म्हटलें, 'अस्सं! त्या डोळस प्रेमाला वैभवाची अभिलाषा दिसते, श्रीमंतीचा उपभोग दिसतो. त्या डोळस प्रेमाला पूर्वायुष्यांतल्या प्रेमाचा नि एकनिष्ठपणाचा विसर पडतो. त्या प्रेमाला...'

तुफान गर्दींत एकानें दुसऱ्याला मागें ढकलून आपण पुढें जावें तसें एकामागून एक वाग्बाण त्याच्या जिभेवरून निसटत होते. बोलून संपलें तसें त्यानें समोर पाहिलें, तों तिथें कुणीहि नव्हतें. आई केव्हांच निघून

गेली होती. त्यांतच तिचा अपराध शाबीत होत नव्हता काय? स्वार्थ-त्यागाची ओळख नसणाऱ्या बाईला त्याची जाणीव प्रत्यक्ष तिच्या मुलानें करून दिली हा विचार त्याला आत्मगौरवाचा वाटला. मोठ्या समाधानानें त्यानें आपली बॅग भरली.

रात्रीं जेवणाच्या वेळीं तो उन्नत मस्तकानें जेवणाच्या दालनांत शिरला नि टेबलाशीं नेहमींच्या जागीं बसला. आतांपर्यंत त्याचें कोंडलेलें मन मोकळें झालें होतें नि तिथें अभिमान भरला होता. बाबासाहेब नेहमींप्रमाणें आपल्या जागीं बसले होते. त्यानें रोजच्याप्रमाणें त्यांना अभिवादन केलें नि त्यांच्या प्रश्नांना मोजकीं उत्तरें दिलीं. पण आज त्याच्या बोलण्यांत किंचित् मोकळेपणा होता. मधूनमधून तो किंचित् हंसतहि होता. हा बदल बाबासाहेबांना नवीन होता. तेवढ्यांत त्याची आई आली. नेहमींप्रमाणें शांतपणें ती आपल्या जागेवर बसली. सैंपाकी वाढीत होता, त्या पदार्थावर नजर लावून तिनें शक्य तितक्या सहजपणें नवऱ्याला म्हटलें, 'मकरंद आतां रात्रींच्या गाडीनें आग्र्याला जातो आहे–'

'आग्र्याला?' मकरंदकडे पाहात त्यांनीं आश्चर्यानें विचारलें. आपल्या या सावत्र मुलासंबंधीं त्यांना फारशी माहिती नसली तरी तो पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें शेवटच्या वर्षांत शिकत आहे हें त्यांना माहीत होतें.

मकरंद कांहीं बोलला नाहीं. आपले सावत्र वडील कसेहि असले तरी ते एक नामांकित वकील आहेत आणि वकिलाला वाटेल तसे उलटसुलट प्रश्न विचारण्याची संवय असते हें तो जाणून होता. शिवाय आतांपर्यंत त्याच्या वतीनें बोलण्याचें काम आईच करीत आलेली होती.

तिनें म्हटलें, 'हो, आग्र्याला आपल्या एका मित्राकडे जाणार आहे. तिथून पुण्याला जाईल. त्याचें हें शेवटचें वर्ष, तेव्हां अभ्यासाला लवकर लागायला हवें.'

हें सांगतां सांगतां विषय बदलून तिनें दुसरें बोलणें काढलें. आपणांला राहण्याचा आग्रह तर नाहींच, पण आपण लवकर जावें ही इच्छाच दिसून येते असें पाहून त्याच्या भावना दुखावल्या गेल्या नि मन

तिरस्कारानें भरलें. बाबासाहेब कांहीं बोलत नव्हते; पण मधूनमधून त्यांची नजर आपणांवर खिळते आहे हें त्याला जाणवत होतें. भुकेलेल्या माणसानें पंचपक्वान्नांच्या ताटाकडे ज्या नजरेनें पाहावें तशी ती नजर होती. आतांच नव्हे, तर आपणाकडे पाहतांना हाच भाव त्यांच्या नजरेंत दिसतो असें त्याला आढळून आलें होतें. अन् हें बघितलें कीं मनांतून तो चिडे. आतांहि त्याच्या भुंवया संकुचित झाल्या. त्यानें घाईघाईनें आपलें जेवण उरकलें आणि गाडीची वेळ होण्यापूर्वीच तो निघून गेला.

आग्र्याला मित्राच्या संगतींत तो रमला. तो ताजमहाल पाहायला गेला, तेव्हां उत्कट प्रीतीचें तें प्रतीक पाहतांना स्वतःच्या आईचें जीवन-चित्र त्याच्या नजरेसमोर उभें राहिलें. सुटीनंतर तो पुण्याला गेला तेव्हां आईचें पत्र खोलींत पडलेलें होतें. नेहमींप्रमाणें अगदीं साधें खुशालीचें पत्र होतें. तिच्या त्या मजकुरांत अगर नियमितपणें पत्र पाठविण्यांत खंड पडला नाहीं. तोहि मधूनमधून पोहोंचीदाखल एखादें कार्ड लिहून टाकी.

दिवाळीची रजा पडली त्या दिवशीं आपल्या त्या प्रोफेसर मित्राकडे जेवून नि गप्पा मारून बऱ्याच उशीरां तो खोलीवर आला. होस्टेल बहुतेक रिकामें झालें होतें. दार उघडून अंधारांत तो खोलींत शिरला नि दाराआडचें बटन दाबण्यासाठीं उजव्या बाजूला वळला. तेवढ्यांत पायांशीं कांहीं तरी जाड कागद लागला. दिवा लावून त्यानें पाहिलें तों एक लांबट मोठा लखोटा होता. किंचित् आश्चर्यानें त्यानें तो उचलला. त्यावरचा पत्ता टंकलिखित होता. पोस्टाचा छापहि अस्पष्ट होता. हा जाड लखोटा कुणाचा याचा अंदाज करीत त्यानें तो उघडला. आईचें हस्ताक्षर पाहातांच प्रथम तो चमकला; नंतर कांहींसा आश्चर्यचकित झाला. झटकन् घड्या उलगडून त्यानें वाचायला सुरुवात केली.

चि० मकरंद,

उद्यांपासून तुला रजा पडेल. या वेळीं तूं रजेंत येणार नाहींस हें तुझ्या पत्रावरून कळलें. पांच महिन्यांपूर्वी तूं इथून गेलास तेव्हांच मला कळून चुकलें कीं पुन्हां या घरीं येण्याची इच्छा तुझी नाहीं. अन् तुझी

ही इच्छा तूं अगदीं विचित्र तऱ्हेनें नि कडवटपणें व्यक्त केलीस. ज्या स्त्रीनें तुला जन्म दिला ती स्त्री अत्यंत स्वार्थी आहे, आपल्या स्वार्थासाठीं, वैभवाच्या अभिलाषेनें नि श्रीमंतीचा उपभोग घेण्यासाठीं पोटच्या पोराला तिनें दूर ढकललें; तिच्या इतकी सुखलोलुप, चंचल स्त्री दुसरी नाहीं, असें तूं ठरवून टाकलेस. प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यानें आपल्या जन्मदात्रींचें इतकें भयंकर चित्र रेखाटलेलें हें पहिलेंच उदाहरण असेल.

तुझाहि दोष नाहीं. जें चित्र तूं रेखाटलेंस त्याची दुसरी बाजूहि तुला दिसावी म्हणून मी हें पत्र आज लिहीत आहें. तुझ्या अभ्यासांत व्यत्यय नको म्हणून सुट्टी होईपर्यंत थांबलें.

माझा पहिला प्रेमविवाह झाला होता. केवळ बाह्य सौंदर्याला भुलून आम्ही एकत्र आलों नव्हतों. ईश्वरानें मला सौंदर्य दिलें आहे. आनंदहि (तुझे वडील) देखणा होता. तूं आज आरशासमोर उभा राहिलास तर त्यांत तुझें जें प्रतिबिंब तुला दिसेल तीच तुझ्या वडिलांची मूर्ति होती. एकमेकांचे गुणदोष पूर्ण पारखल्यावर आम्हीं दोघांनीं चिरस्थायी पायावर आमचें प्रीतिदंदिर उभारलें होतें नि संसाराला सुरुवात केली होती. आदर्श संसाराचीं अनेक चित्रें रेखाटलीं होतीं नि तुझा जन्म होतांच त्या चित्रांत आम्ही रंग भरूं लागलों होतों. आम्हीं आमच्या साऱ्या आकांक्षा तुझ्यावर केंद्रित केल्या होत्या. आनंदाचें एक सुखस्वप्न होतें. तें सुखस्वप्न म्हणजे तुला खूप शिकवायचें, इंजिनिअर करायचें, इंग्लंडला पाठवायचें. त्याचीं अनेक सुखस्वप्नें होतीं. तुला सुखांत ठेवण्यासाठीं तो किती धडपडे! तुला दुःखाची यत्किंचितहि झळ लागूं नये म्हणून किती जपे! नि मला वारंवार तसें बजावी. तो म्हणे, आपणांला जास्त मुलें नकोत. एकच मुलगा असावा. पण कुलदीपक निघावा! अन् कीर्तीच्या शिखरावर चढलेल्या एकुलत्या एक मुलांचीं उदाहरणें तो मला दाखवून देई.

तुझीं बाललक्षणें पाहून आमचें हें सुखस्वप्न तूं पुरें करणार याची आम्हांला खात्री वाटे. तूं वाढूं लागलास नि त्याबरोबर आमच्या आशा वाढूं लागल्या. पण एक दिवस हें सुखस्वप्न पुरें करण्याची सारी जबाबदारी

माझ्या एकटीवर टाकून आनंद एकाएकी कायमचा निघून गेला! त्या दिवशीं तो त्याच्या ऑफिसच्या कामासाठीं कलकत्त्याला जायला निघाला. विमानांतून तो प्रथमच जाणार होता. कां कोण जाणे, पण विमानाचा प्रवास म्हणून माझें मन सचिंत झालें होतें. माझी ही मनस्थिति मीं त्याच्यापासून छपविण्याचा प्रयत्न केला; पण त्यानें ती जाणली. निघतांना त्यानें चेष्टेनें म्हटलें, 'उद्यां आपला मकरंद मोठा झाला कीं नेहमीं त्याला विमानानें प्रवास करावा लागेल. त्या वेळीं काय रोज काळजी करीत बसणार तूं? तुझ्या मनाला संवय व्हावी म्हणून मी आज विमानानें चाललोंय्–अगदीं मुद्दाम.'

तो गेला–कायमचा गेला! कसली संवय नि कसलें काय? माझ्या मनाला कसलीच संवय नव्हती. त्या विमान-अपघातानें, त्याच्या मृत्यूनें, माझें हृदय कायमचें पिचलें. माझ्या मनाची हौस, उमंग, सुख–सारें सारें आनंदबरोबरच गेलें; पण तुझ्यासाठीं पुन्हां जगणें प्राप्त होतें. कारण आनंदाची इच्छा मला पुरी करायची होती. त्याचें सुखस्वप्न मला साकार करून दाखवायचें होतें; कारण त्याशिवाय त्याच्या आत्म्याला शांति मिळणार नाहीं असें माझें मन मला बजावूं लागलें.

तो गेला. त्याच्याबरोबरच माझें आर्थिक स्थैर्यहि गेलें. पैशाचें बळ असल्याशिवाय त्याच्या इच्छा पुऱ्या करणार कशा? मीं नोकरी धरली. पण बी. ए. झालें म्हणून पगार मिळूनमिळून असा कितीसा मिळणार नि मुंबईसारख्या ठिकाणीं घरखर्च भागून तुझ्या शिक्षणाचे पुढचे बेत पार पडणार कसे? काटकसर तरी किती करणार नि कुठें करणार? काटकसर करतांना आनंदचे शब्द कानांत घुमत, 'मंदा, मकरंदला दुःखाची झळ लागू देऊं नकोस. त्याला सुखांत ठेव!' कशा तऱ्हेनें सुखानें ठेवूं? कशाच्या बळावर सुखांत ठेवूं? रात्रंदिवस मन बेचैन होई. एक दिवस मी सुधा नांवाच्या माझ्या एका मैत्रिणीकडे गेलें होतें. तिथें तिच्या वडिलांकडे बाबासाहेब आले होते. माझ्या सौंदर्यावर ते मोहित झाले. नुकतीच त्यांची दुसरी पत्नी वारली होती नि ते विधुरावस्थेंत होते. त्यांनी सुधाच्या वडिलांकडून मला आपलें मनोगत कळवलें.

माहितीहि कळविली कीं नागपूरचे ते एक नामांकित वकील आहेत, श्रीमंत जमीनदार आहेत; पण निपुत्रिक आहेत. त्यांच्याशिवाय घरांत दुसरें कुणी नाहीं.

बाबासाहेबांचें पत्नीपद स्वीकारलें, त्यांच्या अफाट संपत्तीची स्वामिनी झालें, तर माझ्या आनंदाचें सुखस्वप्न मी साकार करूं शकेन, तुला सुखांत ठेवूं शकेन, खूप शिकवूं शकेन, त्याच्या साऱ्या आशा-आकांक्षा पूर्ण करूं शकेन हें स्पष्ट दिसत होतें. पण–पण त्याच्याविषयीं हृदयांत असलेली उत्कट प्रीति मागें खेचीत होती अन् त्याची इच्छा पुढें ढकलीत होती. या ओढाताणींत मन सांगूं लागलें कीं त्याची इच्छा पुरी करणें हेंच त्याच्या प्रीतीचें पूजन आहे. त्याची प्रीति जतन करावयाची असेल तर त्याची इच्छा पूर्ण कर. त्याच्या आत्म्याच्या शांतींतच माझ्या आत्म्याची शांति होती. त्याची इच्छा मींच पुरी करायची नाहीं कां? अन् केवळ यासाठींच मी इथली गृहस्वामिनी बनलें.

स्वतःच्या मनाच्या आनंदासाठीं, एकलेपणाचें दुःख विसरण्यासाठीं बाबासाहेबांनीं लग्न केलें. तेव्हां त्यांना आनंद होईल, त्यांचें मन प्रफुल्ल राहील अन् पत्नीची भूमिका योग्य तऱ्हेनें माझ्या हातून पार कशी पडेल हें बघणें माझें कर्तव्य होतें नि आहे. आनंदाच्या उत्कट प्रीतीची जपणूक अन् त्याचबरोबर नवीन पतीच्या सुखदुःखांशीं समरस होऊन त्यांच्या जीवनांत सुखशांति निर्माण करण्याचीं जागरूकता हीं दोन्ही कर्तव्यें मला एकाच वेळीं एकटीनें पार पाडण्याचें कठीण काम करायचें होतें अन् त्याप्रमाणें मी वागत आलें. केवळ त्यांच्या आनंदासाठीं मी श्रीमंतीचा थाटमाट करतें, रोज वस्त्रालंकारांचीं लेणीं चढवतें; पण माझें मन...!

बाबासाहेबांनीं हें तिसरें लग्न केलें, त्यांत स्वतःला मूल व्हावें हाहि त्यांचा हेतु होता. पण झालें नाहीं तर पुत्रसुखाची तहान तुझ्यावर भागवून घ्यावी, तें सुख तुझ्यापासून मिळवावें असा त्यांच्या मनांतला एक अव्यक्त विचार होता. तुला पहिल्यांदा त्यांनीं पाहिलें, इथें नव्हे, मुंबईला–मुंबईला तुला त्यांनीं केव्हां पाहिलें हें मलाहि माहीत नाहीं,

कदाचित् सुधाच्या घरीं पाहिलें असेल—पण पाहतांच वात्सल्य उत्पन्न व्हावें अशी तुझी गोंडस देखणी मूर्ति पाहतांच त्यांना तुझी ओढ वाटली. मला हें माहीत नव्हतें. पण लग्नानंतर इथें आल्यावर एक दिवस त्यांनीं चेष्टेनें म्हटलें, 'तुझ्या सौंदर्यामुळें मी तुझ्याकडे आकर्षित झालों अशी तुझी आणि इतर लोकांची कल्पना आहे ना?'

मीं म्हटलें, 'कल्पना नाहीं, सत्य आहे.'

त्यांनीं हंसून म्हटलें, 'नाहीं; केवळ अर्धसत्य आहे.'

मीं म्हटलें, 'उरलेलें सत्य कोणतें?'

उरलेलें सत्य सांगत त्यांनीं म्हटलें, 'तुझ्यापेक्षां तुझ्या मुलाकडे मी जास्त आकर्षित झालों होतों.'

पण—पण तूं आल्या दिवसापासून त्यांचा तिटकारा करूं लागलास. यांत दोष त्यांच्या घाईचा नि तुझ्या बालमनाच्या अविचाराचा. बालमन हें वाटेल तसें वळवतां येणाऱ्या वेलीसारखें नसतें तर तें नाजूक, पातळ काचेसारखें असतें. जरा धक्का लागला कीं त्याला तडे जातात, तें फुटतें. त्या दिवशीं अगदीं प्रथम तूं त्यांना बघितल्याबरोबर आपलें नातें ज्या तऱ्हेनें त्यांनीं व्यक्त केलें त्यामुळें तुझ्या मनाला धक्का बसला नि तडा गेला.

तो तडा जोडण्याचा, सांधण्याचा मीं प्रयत्न करून पाहिला; पण यश येईना. उलट तो तडा वाढत जाऊं लागला. तेव्हां तिरस्काराची भावना वाढण्यापेक्षां तुला कांहीं काळ दूर ठेवावें, तूं मोठा झालास म्हणजे तुला आपोआप समजून येईल, अशा विचारानें मीं तुला बोर्डिंगमध्यें ठेवलें. एखाद्या सरदार-पुत्रासारखी तुझी व्यवस्था ठेवण्या इतकी माझी आतां आर्थिक परिस्थिति सुधारलेली असल्यामुळें तुला बोर्डिंगमध्यें ठेवतांना मला जड वाटलें नाहीं.

पण वाढत्या वयाबरोबर तुझ्या भावना मृदु न होतां उलट कडवट होत गेल्या. यांचें वय होत गेलें तशी स्वतःला मूल होण्याची यांची आशा दूरच गेली. आशेनें घरीं आणलें त्या सावत्र मुलाचें प्रेम नाहीं नि स्वतःला मूल होत नाहीं, अशा मनःस्थितींत ते चिडखोर बनूं लागले. तुला मी मुद्दाम त्यांच्यापासून दूर ठेवतें असाहि एक संशय त्यांच्या

चिडखोर मनांत घुसला. ते वारंवार चिडतात. हृदयाला घरें पडतील असें मला बोलतात; तरी पण मला त्यांचा यत्किंचितहि राग येत नाहीं. उलट अनुकंपा वाटते, करुणा येते नि कधींकधीं अपराध्यासारखें वाटतें.

मकरंद, सावत्र आईवर मुलें सख्ख्या आईसारखें प्रेम करूं शकतात, हें मी अनुभवानें सांगतें. कारण, माझी आई सावत्र होती. मग सावत्र पित्यावर मुलांना प्रेम कां करतां येऊं नये? वाढत्या वयाबरोबर, वाढत्या विचारांबरोबर माणसाचें मन विशाल बनलें पाहिजे. एकाच्या स्मृति-सागरांत वाहात जातांना दुसऱ्याच्या आयुष्याचा सहारा बनवूं नये असा मी माझ्या जीवनाचा अर्थ मानीत आलें आहें. एकाचीं स्मृतिपुष्पें गुंफतांना दुसऱ्याच्या जीवनमार्गावर काटे पसरूं नयेत हाच जीवनाचा खरा अर्थ आहे.

आतां सहा महिन्यांनीं तूं इंजिनिअर होशील. आनंदची इच्छा मीं पूर्ण केली. त्याच्या ऋणांतून मुक्त झालें. परवा तूं जें बोलून गेलास, मकरंद! पतीनें केलेला धिक्कार, त्याचा तिरस्कार पत्नी सहन करूं शकते; पण प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यानें केलेला तिरस्कार स्त्री सहन करूं शकत नाहीं. त्यापेक्षां मरण बरें असें तिला वाटतें.

तुझ्या सुखासाठीं मीं हें सारें केलें. पण यांत तुम्ही दोघे दुःखी झालांत. तूं आणि हे. पणती अखंड जळते तेव्हांच दुसऱ्याला प्रकाश मिळतो. जगाला जलधारा देण्यासाठीं मेघाला आपलें जीवन काळेकुट्ट बनवावें लागतें. तूं कुठेंहि राहा, पण सुखी राहा. कळावें.

—तुझी आई

मकरंदच्या डोळ्यांतून अश्रु टिपकूं लागले. भरून आलेलें आकाश हळूहळूं उजळावें तसें त्याचें मन अश्रुसिंचनानें हळूहळूं स्वच्छ बनलें. मनाचे काळेकुट्ट ढग पांढरे शुभ्र बनले. त्यानें आपलें सामान आंवरलें. बॅग भरली. पहाटें पांचचा गजर लावून ठेवला नि सहाची गाडी पकडली. प्रवासांत त्याचें विचारचक्र चालू होतें. तो मनाशीं सारखा म्हणत होता, माणसाचें मन किती संकुचित असतें! किती एकतर्फी विचार करतें!

नागपूर स्टेशनवर तो उतरला तेव्हां फलाटांवर हरबाला पाहून त्याला आश्चर्य वाटलें, नि तो खालीं मान घालून सचिंत मुद्रेनें उभा असलेला पाहून एका विचित्र कल्पनेनें त्याचें हृदय चरकलें. त्यानें म्हटलें, 'तूं कसा या वेळीं इथें ?'

'साहेबांनी पाठवलें. काल तुम्हास्नी तार केली होती !......'

'तार ! तार कशासाठीं ?'

'बाईसाहेब आजारी हायेत. परवां जिन्यावरून पडल्या तवापासः बेशुध हायेत......'

हरबा काय सांगतो आहे हें पुरतें त्याच्या मेंदूला कळेना. एका अशुभ शंकेनें त्याचें चित्त भयाकुल बनलें होतें. घरीं पोचतांच जिन्यावरून धांवत तो वर आईच्या खोलीकडे गेला. तिचा पलंग पांढऱ्याशुभ्र मच्छरदाणीनें झांकलेला होता. जवळ एका आरामखुर्चीवर बाबासाहेब डोळे मिटून पडले होते. त्याची चाहूल लागतांच त्यांनीं डोळे उघडले. तो घाईघाईनें पुढें येत होता. त्याला खुणेनें थांबवून ते उठले नि पलीकडच्या खोलींत येण्याची त्याला खूण करून ते पुढें झाले. त्याच्या छातींत चर्र झालें. शेजारच्या खोलींत गेल्यावर ते तिथल्या खुर्चीत मटकन् बसले. त्यांच्या खुर्चीजवळ मकरंद दिङ्मूढ होऊन उभा राहिला. त्याच्या पायांतलीच नव्हे तर सान्या शरीरांतली शक्ति नाहींशी झाली होती. आतां पुढें कोणती बातमी ऐकायला मिळणार याची कल्पनाहि करण्याचा त्याला धीर होत नव्हता; पण ती बातमी ऐकण्यासाठीं त्याचे प्राण कानांत गोळा झाले होते. बाबासाहेबांनीं त्याच्याकडे न पाहतां हलकेंच म्हटलें, 'तिला आतां कांहीं धोका नाहीं. थोड्या वेळापूर्वींच ती शुद्धीवर आलीय. आतां जरा तिचा डोळा लागलाय्............ डॉक्टर नुकतेच गेले.........काल ती सीरिअस् होती, म्हणून तुला तार केली.'

बोलतां बोलतां त्यांनीं त्याच्याकडे पाहिलें. त्यांच्या नजरेंत नेहमींचा आशाळभूतपणा नव्हता. कुठचाच भाव [illegible] र होती. त्याच्यावरची आपली नजर का [illegible] त त्यांनीं म्हटलें, 'गेल्या चारपांच महि [illegible] ते

IRBK-0115981